# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## अधिसभा बैठक- इतिवृत्त
**(दिनांक २०-०३-२०१८)**

मा. कुलपतींनी मान्यता दिल्याप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक दिनांक २०-०३-२०१८ रोजी सकाळी ११:०० वाजता कुलगुरू प्राध्यापक बी. ए. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदरील बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.:-

| | | |
|---|---|---|
| | **कुलगुरू** | |
| १ | प्राध्यापक बी. ए. चोपडे | उपस्थित |
| | **प्र- कुलगुरू** | |
| २ | डॉ. अशोक तेजनकर | उपस्थित |
| | **अधिष्ठाता- ०४** | |
| ३ | प्राध्यापक मझहर फारुकी- अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | उपस्थित |
| ४ | प्राध्यापक साधना पांडे- अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | उपस्थित |
| ५ | प्राध्यापक संजय साळुंके- अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | उपस्थित |
| ६ | प्राध्यापक वाल्मिक सरवदे- अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | उपस्थित |
| | **संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ** | |
| ७ | डॉ. दिगंबर नेटके | उपस्थित |
| | **वित्त व लेखा अधिकारी** | |
| ८ | डॉ. नंदकुमार राठी | उपस्थित |
| | **संचालक, विद्यापीठ उपपरिसर उस्मानाबाद** | |
| ९ | डॉ. अनार साळुंके | उपस्थित |
| | **संचालक- नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य** | |
| १० | रिक्त | |
| | **सहसंचालक (उच्च शिक्षण)** | |
| ११ | डॉ. आर. एस. धामणस्कर | उपस्थित |
| | **सहसंचालक (तंत्र शिक्षण)** | |
| १२ | एम. डी. शिवणकर | अनुपस्थित |
| | **संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र** | |
| १३ | डॉ. धर्मराज वीर | उपस्थित |
| | **संचालक, विद्यार्थी विकास मंडळ** | |
| १४ | डॉ. मुस्तजीब खान | उपस्थित |
| | **संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण** | |
| १५ | डॉ. दयानंद कांबळे | उपस्थित |
| | **संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ** | |
| १६ | डॉ. एस. ए. मून | उपस्थित |
| | **प्राचार्य- १०** | |
| १७ | डॉ. अली झाकीर अब्बास अली | अनुपस्थित |
| १८ | डॉ. देशमुख जयसिंग श्रीराम | उपस्थित |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | |
|---|---|---|
| १९ | डॉ. देशमुख प्राप्ती देविदासराव | उपस्थित |
| २० | डॉ. इप्पर रामचंद्र किशनराव | उपस्थित |
| २१ | डॉ. कांबळे कमलाकर लक्ष्मणराव | उपस्थित |
| २२ | डॉ. खंदारे भारत दत्तराव | उपस्थित |
| २३ | डॉ. पंडित अशोक अप्पाराव | उपस्थित |
| २४ | डॉ. शिरसाठ शिवदास झुलाल | उपस्थित |
| २५ | डॉ. टकले सुभाष रामकिसन | उपस्थित |
| २६ | डॉ. विधाते हरिदास गोपीनाथ | उपस्थित |
| | **व्यवस्थापन प्रतिनिधी- ०६** | |
| २७ | श्री. आकात कपील बाबासाहेब | उपस्थित |
| २८ | श्री. देशमुख गोविंद बाळासाहेब | उपस्थित |
| २९ | श्री. म्हस्के राहूल जनार्धन | उपस्थित |
| ३० | श्री. निंबाळकर संजय प्रकाश | उपस्थित |
| ३१ | श्री. राजळे भाऊसाहेब बाबासाहेब | उपस्थित |
| ३२ | श्रीमती टोपे मनिषा राजेश | उपस्थित |
| | **अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी- ०१** | |
| ३३ | रिक्त | |
| | **सचिव, विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी- ०१** | |
| ३४ | रिक्त | |
| | **अध्यापक- १०** | |
| ३५ | डॉ. डोभाळ भगवान शिवसिंग | उपस्थित |
| ३६ | डॉ. धोंडगे मुंजा बाबुराव | उपस्थित |
| ३७ | डॉ. काळे गोविंद हरिबा | उपस्थित |
| ३८ | डॉ. करपे राजाभाऊ नारायणराव | उपस्थित |
| ३९ | डॉ. कोकाटे बाबासाहेब दगडू | उपस्थित |
| ४० | डॉ. मुसांडे विजया भास्कर | उपस्थित |
| ४१ | डॉ. पठाण फेरोज खान साहेबलाल | उपस्थित |
| ४२ | डॉ. सलामपुरे फुलचंद भगीरथ | उपस्थित |
| ४३ | डॉ. सरकटे सदाशिव हरिभाऊ | उपस्थित |
| ४४ | डॉ. शिंदे लक्ष्मीकांत विठ्ठलराव | उपस्थित |
| | **विद्यापीठ अध्यापक- ०३** | |
| ४५ | डॉ. अवचार स्मिता सुरेश | उपस्थित |
| ४६ | डॉ. दांडगे सतीश येडुबा | उपस्थित |
| ४७ | डॉ. चव्हाण रामराव जनार्धनराव | उपस्थित |
| | **नोंदणीकृत पदवीधर- १०** | |
| ४८ | श्री. भोसले संभाजी शिवाजीराव | उपस्थित |
| ४९ | श्री. भुतेकर रमेश खुशालराव | उपस्थित |
| ५० | श्री. काळबांडे संजय संपतराव | उपस्थित |
| ५१ | डॉ. काळे नरेंद्र हिरालाल | उपस्थित |
| ५२ | श्री. खैरनार भारत रामदास | उपस्थित |
| ५३ | श्री. मगरे सुनिल यादवराव | उपस्थित |
| ५४ | श्रीमती माने (सोनवणे) शितल अच्युतराव | उपस्थित |
| ५५ | श्री. निकम सुनिल पुंडलिकराव | उपस्थित |
| ५६ | श्री. राऊत सुभाष किशनराव | अनुपस्थित |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

| | | |
|---|---|---|
| ५७ | श्री. शेख जहूर खालिद | उपस्थित |
| | **कुलपतींद्वारे नामनिर्देशित व्यक्ती- १०** | |
| ५८ | डॉ. बारवाले (झेर) उषा | अनुपस्थित |
| ५९ | श्री. भारसाखळे पंकज | उपस्थित |
| ६० | डॉ. देहाडे जितेंद्र अंकुशराव | उपस्थित |
| ६१ | श्री. गायकवाड संजय | उपस्थित |
| ६२ | डॉ. गर्गे रंजन | उपस्थित |
| ६३ | श्री. शिवपुरे नरहरी | उपस्थित |
| ६४ | ॲड. सुबुकडे पाटील विजय | उपस्थित |
| ६५ | रिक्त | |
| ६६ | रिक्त | |
| ६७ | रिक्त (श्री. शिरीष बोराळकर यांचा राजीनामा) | |
| | **विद्यापीठातील अध्यापकेतर कर्मचारी- ०१** | |
| ६८ | श्रीमती सरवदे सुनंदा रविकिरण | उपस्थित |
| | **महाविद्यालयीन अध्यापकेतर कर्मचारी- ०१** | |
| ६९ | श्री. कचकुरे कुंडलिक काशिनाथराव | उपस्थित |
| | **विधानसभा सदस्य- ०२** | |
| ७० | श्री. भाऊसाहेब चिकटगावकर- पाटील | अनुपस्थित |
| ७१ | श्री. अतुल सावे | अनुपस्थित |
| | **विधानपरिषद सदस्य- ०१** | |
| ७२ | श्री. अमरसिंह पंडित | अनुपस्थित |
| | **नगरपालिका/ महानगरपालिका सदस्य- ०१** | |
| ७३ | श्री. दानवे भास्करराव मुकुंदराव | उपस्थित |
| | **जिल्हा परिषदेच्या शिक्षण समित्यांचा प्रतिनिधी- ०१** | |
| ७४ | श्री. देशमुख राजेसाहेब | अनुपस्थित |
| | **कुलसचिव (सदस्य सचिव)** | |
| ७५ | डॉ. साधना पांडे | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली.

विद्यापीठ गीत झाल्यानंतर श्री. सुनिल मगरे व अन्य काही सदस्यांनी विद्यापीठाच्या प्रभारी प्रशासनाच्या निषेधार्थ घोषणा दिल्या.

**डॉ. भारत खैरनार व अन्य काही सदस्यः-**

सभागृहात पत्रकारांना उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात यावी.

**मा. कुलगुरूः-**

मित्रहो, लोकशाहीमध्ये आपण सगळ्यांनी लोकशाही मार्गाचा अवलंब केला पाहिजे. विद्यापीठ प्रशासन अधिसभेच्या प्रत्येक चर्चेसाठी तयार आहे, सक्षम आहे. मला असे वाटते की, आपले म्हणणे शांतपणे मांडावे. तुमच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले जाईल. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये अधिसभा बैठकीस पत्रकारांना allowed केले नाही.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. संभाजी भोसलेः-**

सन्माननीय कुलगुरू महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतास दिलेल्या संविधानाचे व घटनेचे जगात कौतुक होते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकसंख्येने मोठ्या असणाऱ्या भारत या देशात लोकशाही आहे. व ती अत्यंत प्रभावीपणे राबत आहे. संविधानाने निर्माण केलेल्या कायदेमंडळाने केलेल्या

कायद्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ हेसुद्धा महाराष्ट्राच्या कायदेमंडळाने निर्माण केलेले आहेत. व या अधिनियमानुसारच विद्यापीठाचे कामकाज चालले पाहिजे. परंतु खेदाने असे सांगावे वाटते की, नियमानुसार अधिसभा बैठकीची पूर्वसूचना किमान १५ दिवस सर्व सदस्यांना देणे बंधनकारक होते. परंतु विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये असा एक वर्ग आहे की, ते अधिसभा सदस्यांना वेळोवेळी दुय्यम लेखतात. त्यांच्या कामाकडे दुर्लक्ष करतात. मी गेली दहा वर्षे अधिसभेच्या सभागृहाचा सदस्य आहे. ज्या-ज्या वेळी असे प्रकार घडले त्या-त्यावेळी सभागृहातील सर्व अधिसभा सदस्यांनी एकत्र येऊन अशा प्रवृत्तीला रोखण्याचे काम केले. आम्हाला सोशल मिडियावरून बैठकीची दिनांक समजावी. त्याच दिवशी कुलगुरू महोदय आपणास फोनसुद्धा केला होता. आपण कुलसचिवांना फोन दिला त्यांनी मला मी माहिती घेते असे सांगितले. तरीही १४ मार्चपर्यंत बैठकीची सूचना किंवा पत्र मिळाले नाही.

विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये लोकमतामधून निवड न आलेला असा एक वर्ग आहे की तो गेली एक वर्षभर हे विद्यापीठ चालवतोय. तुम्ही सर्व सदस्यांच्या हक्कांचा भंग केला आहे. विद्यापीठ अधिनियमानुसार किमान १५ दिवस आधी बैठकीची सूचना देणे आवश्यक होते. यासाठी जबाबदार असणाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही केली पाहिजे. इतर विद्यापीठात सदस्यांनी एखादे पत्र दिल्यास त्यांना लेखी उत्तर घरपोच दिले जाते. पण आपल्या प्रशासनात काही मंडळीनी गेंड्याची कातडी पांघरलेली आहे. जी आपल्या अवतीभोवती आहे. त्यांना लोकांनी नाकारलेले आहे. संविधानानुसार विधिमंडळाची निर्मिती झाली. विधिमंडळाने विद्यापीठाचा ॲक्ट तयार केला आहे. त्यातील तरतुदीनुसार आम्ही लोकांसमोर गेलो. लोकशाही पद्धतीने निवडणूक लढवली. लोकांनी आम्हाला भरभरून मतांनी निवडून दिले. त्यानुसार आम्ही सभागृहामध्ये विद्यार्थ्यांचे, पालकांचे शिक्षणाबद्दलचे प्रश्न मांडण्यासाठी आम्ही इथे आलोत. पण जर आम्हास अवमानजनक वागणूक मिळणार असेल तर यापुढे सभागृहातील सदस्य हे स्वीकारणार नाही. हा सदस्यांचा अवमान नसून विधिमंडळाचा त्यांनी निर्माण केलेल्या विद्यापीठाच्या ॲक्टचा अवमान आहे. पर्यायाने संविधानाचा अवमान आहे. त्यामुळे त्यांचा योग्य सन्मान झाला पाहिजे. गेली एक वर्ष अधिकार मंडळे नसताना आपला मनमानी कारभार चालवत. परंतु यापुढे चालू देणार नाही. यापूर्वी सुद्धा पत्रकारांना सभागृहात सन्मानाने उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली होती. मग आता पत्रकारांना प्रवेश नाकारण्याचे कारण काय? पत्रकार म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा मान राखला पाहिजे. महाराष्ट्राच्या विधिमंडळाने माहितीच्या अधिकाराचा कायदा केला व आज संपूर्ण देशाने तो कायदा स्वीकारला. त्यामुळे सर्व ठिकाणी पारदर्शकता आहे. तरी या सभागृहातील कामकाजाची पारदर्शकता असली पाहिजे. यासाठी पत्रकारांना सभागृहात बसण्याची परवानगी द्यावी. यातून काहीही चुकीचा पायंडा पडणार नाही, तर पारदर्शकता वाढेल.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

ही अधिसभा कोणत्या परिनियमानुसार होत आहे? नवीन परिनियम आलेत का? जसे इलेक्शनचे परिनियम आलेत तसे सिनेट मीटिंगसाठीचे परिनियम आलेत का? कोणत्या परिनियमान्वये ही बैठक बोलवली आहे? १९७४ च्या परिनियमातील ६९ प्रमाणे सिनेट मीटिंगबद्दल ४२ दिवस आधी सदस्यांना कळवले पाहिजे. २८ दिवस आधी प्रश्नोत्तरे मागविली पाहिजेत. पण जर हे नियमच तुम्हाला पाळायचे नसतील तर ही मीटिंग illegal आहे. तुम्हाला मनमानी करायची असेल तर ही बैठक illegal आहे असे माझे म्हणणे आहे.

**श्री. संभाजी भोसले:-**

आजची बैठक बेकायदेशीर आहे, म्हणून नव्याने नियमानुसार बैठक बोलविण्यात यावी असे माझे मत आहे.

**श्री. सुनिल मगरे:-**

यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याने याबाबत खुलासा करावा, अशी मी विनंती करतो.

**कुलसचिव:-**

Sir, if you permit me, I would like to answer.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. सुनिल मगरे व अन्य काही सदस्यः-**

मराठीत सांगा म्हणजे आम्हाला समजेल.

**कुलसचिवः-**

ठीक आहे. मी त्याच भाषेत आपल्याशी संवाद साधणार आहे. आम्ही ४५ दिवस आधी आम्ही चान्सलर ऑफिसला पत्र पाठविले. आमच्याकडे पुरावा आहे. त्यांनी १६ फेब्रुवारीच्या पत्राद्वारे २० मार्चला अधिसभा घ्या अशी permission दिली आहे. त्यांचे पत्र २१ तारखेला आपल्याला भेटले, नंतर २२ तारखेला inward होऊन concern section ला पाठविले. त्या महिन्याच्या शेवटी २ दिवस holidays चे होते. महिना २८ दिवसांचा होता. आम्हाला पत्र प्राप्त झाल्यानंतर आम्ही लगेच सदस्यांना ई-मेल केला. आमच्याकडे रेकॉर्ड आहे.

**श्री. संभाजी भोसलेः-**

एकीकडे मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा दिला आहे, आणि एकीकडे काही लोक हे पाळत नाहीत. असे चालणार नाही.

**मा. कुलगुरूः-**

मॅडम, मराठीतून प्रयत्न करा.

**कुलसचिवः-**

मी एवढेसुद्धा मराठी समजू शकत नाही अशी गोष्ट नाही हो. मराठी भाषेबद्दल मलापण अस्मिता आहे, त्यात दुमत आहे. मला काही मराठी माणसांनीच राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित केले आहे. आम्ही चान्सलर ऑफिसला पत्र पाठविले ३ फेब्रुवारीला, आम्हाला त्यांचे उत्तर आले त्या पत्राची दि. आहे १६ फेब्रुवारी, आणि आम्हाला पत्र भेटले २२ फेब्रुवारीला, आणि नंतर लगेच २-३ दिवस सुट्या आल्या. नंतरच्या वर्किंग डे ला आम्ही लगेच ई-मेल, पत्र पाठविले.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदेः-**

हे दुर्दैव आहे. भाऊसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे परिनियमाप्रमाणे कामकाज चालले पाहिजे. तुमच्या सोयीप्रमाणे कामकाज करता. तुम्हाला ते धाब्यावर बसवायचे असते तेव्हा दुसरे उदाहरण देता, असे चालणार नाही. तुम्ही कायदेतज्ज्ञ आहात. तुमच्याकडून तरी अशी अपेक्षा नाही.

**कुलसचिवः-**

आम्ही राजभवनला ३ फेब्रुवारीला पत्र पाठविले. २० मार्चला सिनेटची बैठक घ्या अशी चान्सलर ऑफिसने परमिशन दिली आहे. त्याचा मान सगळ्यांनी ठेवावा. त्यात थोडे उन्नीस-बीस झाले असेल. पण आम्ही हेतुपुरस्सर काही केले नाही.

**श्री. सुनिल मगरेः-**

मॅडम, उन्नीस-बीस म्हणजे काय? आम्हाला नाही समजले. कृपया आम्हाला सांगा.

**श्री. सुनिल मगरे व अन्य काही सदस्यः-**

प्रशासनाचा धिक्कार असो, अशा घोषणा दिल्या.

**कुलसचिवः-**

चान्सलर ऑफिसकडून डेट येण्यासाठी उशीर झाला. मी खोटे सांगत नाही. फक्त मला भाषेचा थोडा problem आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. डोभाळ:-**

आज तुम्ही पाहिजे त्या भाषेत बोला, पण पुढच्या बैठकीवेळेस मराठी भाषेत बोला.

**डॉ. गोविंद काळे:-**

मॅडम, आपल्याला भाषेत काही प्रॉब्लेम आला तर कुलगुरू साहेब आहेतच.

**कुलसचिव:-**

आपकेही मित्र-मंडळीने मुझे हिंदी मे बोलने की permission दी है। अब मैं हिंदी में उत्तर देने का प्रयास करुँगी। हमने ४५ अगोदर चान्सलर ऑफिस को पत्र भेजा था। चान्सलर ऑफिस का पत्र जिस तारीख को आया है तबसे ३ दिन कहाँ होते है? इसलिए date का थोडा adjustment किया है। इसमे हेतुपुरस्सर कुछ भी नही है, intentional कुछ भी नही है। ये विद्यापीठ आप सबका है। हमने democracy के साथ कुछ भी खिलवाड नही किया है।

**श्री. सुनिल मगरे:-**

ज्यांच्याकडून ही चूक झाली आहे त्यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे, अशी आमची विनंती आहे. सभागृहाचे अनुसूचित जातीतून बिनविरोध निवडून आलेले श्री. राहूल म्हस्के हे विद्यापीठात रिफ्रेशर कोर्स करीत आहेत. त्यांनी तेथील अधिकाऱ्याकडे आजच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी परवानगी मागितली. पण त्या अधिकाऱ्याने अतिशय उद्धट वागणूक दिली. त्यांचा मी येथे निषेध करतो. या सभागृहात कोणता business चालतो असे बोलले. या सभागृहाच्या एका दलित वर्गाच्या सन्माननीय सदस्याचा अपमान त्या अधिकाऱ्याने केला. त्या अधिकाऱ्याला त्या पदावरून ताबडतोब काढावे, त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे, असा ठराव मी मांडतो.

**श्री. संजय गायकवाड:-**

श्री. मगरे सरांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री. संभाजी भोसले:-**

हे अत्यंत चुकीचे आहे.

**श्री. राहूल म्हस्के:-**

मी व्यवस्थापन गटातून सिनेटवर बिनविरोध निवडून आलो आहे. मी HRD मार्फत चालणारा Refresher Course करीत आहे. ३ ते २२ यादरम्यान हा कोर्स आहे. आपल्या बैठकीचे पत्र मिळाल्यानंतर मी डॉ. सतीश पाटील यांच्याकडे स्वतःच्या लेटरपॅडवर रीतसर सुटी मागितली. पण सरांनी मला सुटी तर दिलीच नाही, उलट सुटी घेतली तर तुम्हाला पुन्हा कोर्स करावा लागेल असे सांगितले. तिथे जाऊन तेथे तुम्हाला कोणता business करायचा असे बोलले. मी तेथे परीक्षा देऊन या सभागृहात हजर झालो आहे. सिनेटच्या मीटिंगला काही महत्त्व नाही असे त्यांनी कळविले.

**श्री. जितेंद्र देहाडे:-**

त्या अधिकाऱ्याचा खुलासा मागवावा.

**श्री. सुनिल मगरे:-**

हा अनुसूचित जातीच्या सदस्याचा अपमान आहे. Business चा अर्थ काय याचा खुलासा घ्या.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

**डॉ. डोभाळ:-**

कोणत्याही प्रवर्गातून या सभागृहात आलेल्या सदस्यांचा सन्मान झालाच पाहिजे, त्यांना व्यवस्थित वागणूक भेटलीच पाहिजे. एक चौकशी समिती नेमली पाहिजे.

**श्री. सुनिल मगरे:-**

कशाला चौकशी समिती, येथेच निर्णय घ्या. त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झालीच पाहिजे.

**डॉ. डोभाळ:-**

प्रत्येकाला आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे. त्या अधिकाऱ्याला आपली बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे. जर असे घडले असेल तर त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झालीच पाहिजे, पण त्यांना आपली भूमिका मांडू द्या.

**डॉ. एम. बी. धोंडगे:-**

त्या अधिकाऱ्याने आधी सिनेट सदस्य असताना येथे काय business केले हे कळालेच पाहिजे. एका जबाबदार अधिकाऱ्याकडून असे वक्तव्य निघत असेल तर तो सर्व प्रशासनाचा अपमान आहे. त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झालीच पाहिजे.

**डॉ. डोभाळ:-**

प्रत्येकाला आपली बाजू मांडू द्या.

**डॉ. गोविंद काळे:-**

संविधानानुसार प्रत्येकाला आपली बाजू मांडू द्या. नंतर योग्य ती कार्यवाही करा.

**डॉ. भारत खैरनार:-**

ठीक आहे, येथे त्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**डॉ. सतीश दांडगे:-**

एखाद्या अधिसभा सदस्याचा जर अपमान केला जात असेल तर आम्ही सगळे अधिसभा सदस्य त्याचा जाहीर निषेध करतो. अधिसभा हे विद्यापीठ ॲक्टनुसार वरिष्ठ सभागृह आहे. डॉ. बाबासाहेबांनी संविधानात स्वातंत्र्य, समता बंधुता दिली आहे. त्यानुसार संबंधित व्यक्तीची चौकशी केली जावी. चौकशीशिवाय इतक्या ताबडतोब निर्णय घेऊ नये. श्री. राहूल म्हस्के यांच्या तक्रारीतील तथ्य पहावे. आजच्या आज त्यांचे म्हणणे सभागृहासमोर ठेवावे, मग निर्णय घ्यावा.

**श्री. किशोर शितोळे:-**

छत्रपती शिवराय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सभागृहाचे अध्यक्ष कुलगुरू साहेब, सन्माननीय सदस्यांना, मी राज्यपाल नियुक्त सदस्य श्री. किशोर शितोळे, आपणा सर्वांचे स्वागत करतो. मित्रहो, आपले प्रश्न सोडवले गेले पाहिजेत असे मला वाटते. आधी अध्यक्षांना प्रास्ताविक करू देऊ मग बैठक सुरू करू द्यावी. नंतर आपली चर्चा चांगल्या वातावरणात पार पाडावी, अशी मी विनंती करतो. पत्रकार बंधुंचे मी येथे स्वागत करतो. मा. अध्यक्षांनी आता सुरूवात करावी, त्यानंतर सगळ्यांनी आपले प्रश्न मांडावेत.

**डॉ. कमलाकर कांबळे:-**

मी एक विनंती करतो की, आजपासून ९१ वर्षापूर्वी डॉ. आंबेडकरांनी १९ व २० मार्चला महाडला चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता, त्याच दिवशी ही बैठक होत असल्याबद्दल मी कुलगुरूंचे आभार व्यक्त करतो. कुलगुरूंनी त्याचा उल्लेख प्रास्ताविकात करावा एवढीच विनंती करतो.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

**मा. कुलगुरू:-**

मित्रहो, मी प्रथम आपण सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. माझे भाषण सुरू करण्यापूर्वी आपणा सर्वांना भारतीय संविधानाचे पुस्तक व एक फूल देऊन आपले स्वागत करण्याची माझी प्रामाणिक इच्छा आहे. त्याचा आपण स्वीकार करावा.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

ॲक्ट, स्टॅट्युट, ऑर्डिनन्स, अकाऊंअ कोड हे चारही पुस्तके सगळयांना दिले पाहिजेत आणि सदस्यांना विनंती आहे की त्यांनी ते वाचावेत.

**मा. कुलगुरू:-**

श्री. भाऊसाहेब राजळे, आपण सर्वात ज्येष्ठ सदस्य आहात, म्हणून आपल्यापासून मी स्वागताची सुरूवात करतो.

**प्र- कुलगुरू:-**

त्यानंतर सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री. संजय निंबाळकर यांचे स्वागत करतो.

**श्री. संजय निंबाळकर:-**

या सभागृहाचा सर्वात ज्येष्ठ सदस्य मीच आहे, एवढेच मला सांगायचे आहे.

**कुलसचिव:-**

पुढीलप्रमाणे सदस्यांचे स्वागत करण्यात आले.

| No. | Collegium | Seats | Name of Elected Candidates |
|---|---|---|---|
| **Senate** | | | |
| 01 | Principals [Section 28 (2)(o)] | SC-1 | 1. Dr. Kamble Kamlakar Laxmanrao |
| | | ST-1 | 1. Dr. Shirsath Shivdas Zulal |
| | | VJ/NT-1 | 1. Dr. Epper Ramchandra Kishanrao |
| | | OBC-1 | 1. Dr. Vidhate Haridas Gopinath |
| | | WOMEN-1 | 1. Dr. Deshmukh Prapti Devidasrao |
| | | OPEN-5 | 1. Dr. Khandare Bharat Dattarao<br>2. Dr. Ali Zakir Abbas Ali<br>3. Dr. Pandit Ashok Apparao<br>4. Dr. Deshmukh Jaising Shriram<br>5. Dr. Takle Subhash Ramkisan |
| 02 | Representatives of Management [Section 28 (2)(p)] | SC-1 | 1. Shri. Mhaske Rahul Janardhan |
| | | WOMEN-1 | 1. Smt. Tope Manisha Rajesh |
| | | OPEN-4 | 1. Shri. Nimbalkar Sanjay Prakash<br>2. Shri. Akat Kapil Babasaheb<br>3. Shri. Deshmukh Govind Balasaheb<br>4. Shri. Rajale Bhausaheb Babasaheb |
| 03 | University Teachers [Section 28 (2)(s)] | SC-1 | 1. Dr. Dandge Satish Yeduba |
| | | WOMEN-1 | 1. Dr. Awachar Smita Suresh |
| | | OPEN-1 | 1. Dr. Chavan Ramrao Janardhanrao |
| 04 | Teachers [Section 28 (2)(r)] | SC-1 | 1. Dr. Kokate Babasaheb Dagdu |
| | | ST-1 | 1. Dr. Pathan Feroz Khan Saheblal |
| | | VJ/NT-1 | 1. Dr. Salampure Fulchand Bhagirath |
| | | OBC-1 | 1. Dr. Sarkate Sadashiv Haribhau |
| | | WOMEN-1 | 1. Dr. Musande Vijaya Bhaskar |
| | | OPEN-5 | 1. Dr. Dhondge Munja Baburao<br>2. Dr. Dobhal Bhagwan Shivsing<br>3. Dr. Kale Govind Hariba<br>4. Dr. Karpe Rajabhau Narayanrao<br>5. Dr. Shinde Laxmikant Vitthalrao |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

| | | | |
|---|---|---|---|
| 05 | Registered Graduates [Section 28 (2)(t)] | SC-1 | 1. Shri. Magare Sunil Yadavrao |
| | | ST-1 | 1. Shri. Nikam Sunil Pundlikrao |
| | | VJ/NT-1 | 1. Shri. Kalbande Sanjay Sampatrao |
| | | OBC-1 | 1. Shri. Raut Subhash Kishanrao |
| | | WOMEN-1 | 1. Smt. Shital Achyutrao Mane- Sonwane |
| | | OPEN-5 | 1. Dr. Kale Narendra Hiralal<br>2. Shri. Khairnar Bharat Ramdas<br>3. Shri. Shaikh Zahoor Khalid<br>4. Shri. Bhutekar Ramesh Khushalrao<br>5. Shri. Bhosale Sambhaji Shivajirao |

| No. | Detail | By | Name of Nominated Member |
|---|---|---|---|
| 1 | **10 Persons**<br>[04- field of agriculture, social work, co-operative movement, legal, financial, banking and cultural activities<br>01- industry,<br>01 educationist<br>01- scientist<br>01- performing and fine arts or literature or sports<br>01- an organization involved in Environment or Preservation of Nature related tasks<br>01- an organization involved in women's development or senior citizens welfare or communications and media]<br>[Tenure: Full term] | Chancellor [28 (2)(u)] | 1. Shri. Sanjay Gaikwad<br>2. Dr. Ranjan Garge<br>3. Shri. Narhari Shivpure<br>4. Dr. Jitendra Ankushrao Dehade<br>5. Dr. Usha Barwale Zehr<br>6. Adv. Vijay S. Patil<br>7. Shri. Pankaj Bharsakhale |
| 2 | **02 Persons**<br>(Non-teaching<br>1. University 2. College)<br>[Tenure: Full term] | Vice Chancellor [28 (2)(v)] | 1. Smt. Sarwade Sunanda Ravikiran<br>2. Shri. Kachkure Kundalik Kashinathrao |
| 4 | **01 Member**<br>(Legislative Council)<br>[Tenure: 2.5 years] | Chairman [28 (2)(x)] | 1. Shri. Amarsingh Pandit |
| 5 | **01 Member**<br>(Municipal Corporation)<br>[Tenure: 1 year] | Vice Chancellor [28 (2)(y)] | 1. Shri. Danve Bhaskarrao Mukundrao |
| 6 | **01 Representative**<br>(Education Committees of Zilla Parishads within University area)<br>[Tenure: 1 year] | Education Committee [28 (2)(z)] | 1. Shri. Deshmukh Rajesaheb |

**श्री. संजय काळबांडे:-**

पत्रकारांचेही स्वागत करण्यात यावे.

**श्री. शेखर मगर (पत्रकार):-**

आम्हाला स्वागत नकोय, फक्त सन्मानाची वागणूक हवी.

**मा. कुलगुरू:-**

सर्वांच्या विनंतीचा मान ठेवून मी पत्रकारांना येथे हजर राहण्याची परवानगी देतो.

**प्र- कुलगुरू:-**

पत्रकारांचे प्रतिनिधी म्हणून श्री. शेखर मगर यांचे स्वागत करण्यात यावे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. शेखर मगर (पत्रकार):-**

धन्यवाद.

**श्री. सुनिल मगरे:-**

सर, तुम्ही कॅबीनमध्ये सगळ्यांचे स्वागत केले. आमची अशी विनंती आहे की, येथे सगळ्यांचे स्वागत करण्यात यावे.

(तद्नंतर नामनिर्देशित, पदसिद्ध सदस्यांचेही स्वागत करण्यात आले.)

**श्री. सुनिल मगरे:-**

विद्यापीठाची डायरी, कॅलेंडर अजून का आले नाहीत? दरवर्षी जानेवारीमध्ये डायरी निघत असते. मग यावर्षी कशामुळे ही प्रोसेस थांबली याचा खुलासा झाला पाहिजे.

**मा. कुलगुरू:-**

सर्व अधिकार मंडळांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांची नावे असलेली डायरी काढण्यात येईल. त्यासाठी कमिटी नेमलेली आहे. महिनाभरात हे काम पूर्ण होईल. आता मी माझ्या भाषणाची सुरूवात करतो.

जनतेचे राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड आणि भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर, या सर्व महामानवांच्या विचारांना प्रथम अभिवादन करतो आणि आता माझे दोन शब्द सांगतो. मी सर्वप्रथम सर्व सदस्यांचे हार्दिक स्वागत करतो.

आपली सिनेटची निवडणूक लोकशाही पद्धतीने पार पाडली, म्हणून मी आपल्या सर्वांचे आभार मानतो. मित्रहो, २०१८ हे वर्ष हे विद्यापीठासाठी महत्त्वाचे वर्ष आहे कारण यावर्षी विद्यापीठ स्थापनेस ६० वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने थोडक्यात विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा सांगतो. फेब्रुवारी २०१८ मध्ये विद्यापीठ इतिहासात पहिले प्रो-व्हाईस चान्सलर म्हणून प्राध्यापक अशोक तेजनकर यांची निवड केली आहे. ते निष्णात भूगर्भशास्त्रज्ञ आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अनेक जलयुक्त अभियानाच्या सल्लागार कमिटीवर ते आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या कामाची दखल घेतलेली आहे. ते या सभागृहाचे माजी सदस्य आहेत व आज प्र-कुलगुरू आहेत. भविष्यात सर्व सदस्यांना ही संधी मिळावी अशी आशा व्यक्त करतो.

२०१७ मध्ये इंडिया टुडे या राष्ट्रीय मासिकाने भारतातील विद्यापीठांचा सर्व्हे केलेला आहे. भारतातील ८०० विद्यापीठांमध्ये आपल्या विद्यापीठाचा २१ वा क्रमांक लागतो. ही अभिमानाची गोष्ट आहे. द वीक या इंटरनॅशनल मॅगझिनने २०१७ मध्ये केलेल्या सर्व्हेनुसार आपल्या विद्यापीठाचा ८०० विद्यापीठात ३६ वा क्रमांक लागतो. NIRF २०१७ नुसार १०१ उत्तम विद्यापीठात आपला समावेश आहे. २०१८ NIRF साठी आपण माहिती भरलेली आहे. चालू वर्षात आपण पहिल्या ५० मध्ये येऊ असा मला विश्वास वाटतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपण अनेक करार केलेले आहेत. गेल्या दोन वर्षात आपण १५ MoU केलेले आहेत. जपान येथील विद्यापीठाचे विद्यार्थी आपल्या विद्यापीठात ३ महिने राहिले. त्यांनी पदार्थशास्त्र विभागात नॅनो टेक्नॉलॉजी आणि मटेरिअल सायन्समध्ये संशोधन पूर्ण केले. तसेच आपले चार विद्यार्थी जपान येथील विद्यापीठात गेले. अशा पद्धतीने विद्यार्थी व प्राध्यापकांची देवाण-घेवाण होत आहे. भारत सरकारच्या ग्यान २०१७ प्रोग्राम अंतर्गत आपल्या विद्यापीठातील Computer Science विभागाचे डॉ. देशमुख यांनी याचा मान मिळवला आहे. ग्यानचा पहिला वर्कशॉप आपल्या विद्यापीठात झाला. त्यासाठी रशिया येथील विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ आपल्याकडे आले. त्यांना आपण adjunct professor चा दर्जा दिला आहे. जॉन लिंडले यांना आर्किऑलॉजी, हिस्ट्री, सोशिअल सायन्स मध्ये adjunct professor चा दर्जा दिला आहे. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय पातळीवर या विद्यापीठाने घोडदौड केली आहे.

२०१७ मध्ये रुसाने २० कोटी grant दिली. कॉंप्युटर सायन्स डिपार्टमेंट, डीएनए बारकोडिंग, फिजिक्स यांचा त्यात प्रामुख्याने समावेश आहे. २०१८ मध्ये १२० कोटीचे अनुदान आपल्याला मंजूर केले. सध्या ६ कोटी आपल्याला आले, बाकी अनुदान टप्प्या-टप्प्याने मिळणार आहे. आपण ४७ प्रस्ताव मागवून घेतले. त्यातले ४-५ प्रस्ताव शासनाने मान्य केले. मान्य केलेले प्रस्ताव फक्त एका विभागाला मान्य न करता अनेक विभागांमध्ये मिळून मान्य केलेले आहेत. रुसाच्या माध्यमातून आपण मोठे प्रयत्न केलेले आहेत.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

चालू वर्षी श्री. राहूल बजाज यांच्याकडून पावणे दोन कोटी मिळाले आहेत. त्यातून बिल्डिंगचे काम दोन महिन्यात पूर्ण होईल. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. संशोधनावर आधारित उद्योगधंद्याचे जाळे निर्माण होईल. गो-कार्ट यंत्रणेचे नवीन स्टार्टअप माध्यमातून विद्यापीठ पातळीवर सुरू आहे. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठात अशी सुविधा नाही. श्री. राम भोगले यांनीसुद्धा नॅनोटेक्नॉलॉजी व फिजिक्सच्या संशोधनासाठी मोठी मदत केली आहे. University-Industry Interaction च्या ३ परिषदा झाल्यात. चौथी परिषद लवकरच होणार असून त्यांचे आपणा सर्वांना निमंत्रण दिले जाईल. जर्मनीमधील आंतरराष्ट्रीय डेटाबेसचा मी अभ्यास केला आहे. त्यात आपल्या विद्यापीठाचा उल्लेख आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली दखल घेतल्याचा मला खूप आनंद आहे. डॉ. बाबासाहेबांच्या नावाने असणाऱ्या विद्यापीठाचा हा सन्मान आहे.

**यासंदर्भात मा. कुलगुरूंनी PPT द्वारे प्रेझेंटेशन सभागृहासमोर सादर करून त्याचे विश्लेषण केले.**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

**मा. कुलगुरू:-**

नवीन पद्धतीने नॅकला सामोरे जाणारे आपले पहिले विद्यापीठ असणार आहे. नॅकवर आपले फंडिंग अवलंबून आहे. नॅक क्रायटेरियाचे पहिले उद्‌घाटन भारतात प्रथम आपल्या विद्यापीठात झाले. आपण IQAC सेल समृद्ध केला आहे. त्या माध्यमातून आपले अहोरात्र काम सुरू आहे. IQAC हा विद्यापीठाचा आत्मा आहे. आपला अर्थसंकल्प आपण नॅक डोळ्यासमोर ठेवून केला आहे. विद्यापीठातील सर्व प्राध्यापक व प्रशासन यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहे. महामानवाच्या नावाने असणाऱ्या विद्यापीठाचा लौकिक वाढविण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे.

मी आपणा सर्वांचे आभार मानतो. आपण सगळे चर्चेच्या माध्यमातून सगळे प्रश्न सोडवू, अशी विनंती आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

सर, आपण जेव्हा विद्यापीठात जॉईन झालात त्यानंतर पहिल्या अधिसभेसमोर आपण एक खूप छान प्रेझेंटशन सादर केले होते. आपल्या आधीचे कुलगुरू डॉ. पांढरीपांडे यांनी सादर केलेले व्हिजन डॉक्युमेंट बाजूला गेले आणि आपले व्हिजन डॉक्युमेंट आमच्यासमोर आले. आम्हाला आनंद झाला होता. आपण १००० कोटी चार वर्षात विद्यापीठाला मिळवून देईल, केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळवून देईल अशी आपली घोषणा होती. आपण आमच्या हाती संविधान दिले परंतु विद्यापीठात संविधानानुसार काहीच कामकाज होत नाही.

मी एक कटमोशन दिली होती. Statute ५३ व ५४ नुसार आलेले कटमोशन ५ दिवस आधी सदस्यांना मिळायला पाहिजेत. पण ते आम्हाला मिळालेले नाहीत, याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे. जर दखल नाही घेतली तर हे सभागृह पुढे चालणार नाही. प्रश्नोत्तरामध्ये आम्ही सविस्तर खुलासा मागविला होता. परंतु उत्तरात म्हटले की कागदपत्रे सोबत जोडली आहेत. पण आमच्या टेबलवर काहीच सविस्तर कागदपत्रे नाहीत. जर असे असेल तर सभागृह पुढे चालू दिले जाणार नाही.

**कुलसचिव:-**

१५ तारीख को कटमोशन inward हुआ है। Statute ५३ व ५४ नुसार ८ दिवस पहले कटमोशन देना जरुरी है।

**श्री. मगरे:-**

मॅडम, तुम्हीसुद्धा नियम पाळा.

**डॉ. डोभाळ, डॉ. गोविंद काळे:-**

आप उनका कटमोशन ले रहे है पर मै उनसे पहले आकर भी मेरा कटमोशन क्यू नही लिया? मग यांचे कटमोशन का स्वीकारताय? कुणाच्या दबावाखाली काम करताय? एकाला एक वागणूक व दुसऱ्यांना दुसरी वागणूक असे चालणार नाही.

**कुलसचिव:-**

किसी का भी कटमोशन ८ दिन पहले नही आया इसलिए हमने किसी का भी कटमोशन नही लिया है।

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

तुमचे पत्रच उशिरा मिळाले आहे. सिनेटची नोटीस आम्हाला वेळेवर मिळाली का?

**कुलसचिव:-**

इसका clarification पहले ही दिया है। चान्सलर ऑफिस का मीटिंग को permission है। ४५ दिन पहले हमने चान्सलर ऑफिस को permission माँगा था। हम Chancellor Nominees का इंतजार

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

कर रहे थे। उनके १० nominations नही आये थे। पुरी सिनेट गठित हुए बाद ही मीटिंग, इलेक्शन ले सकते थे।

**श्री. संजय निंबाळकर:-**

आपल्या विद्यापीठाला अजूनही राज्यपाल नियुक्त सदस्यांची यादी अद्यापही आली नाही, म्हणून ही परिस्थिती आली आहे.

**श्री. संभाजी भोसले:-**

नांदेड विद्यापीठाची यादी पूर्ण आली नसतानाही त्यांनी इलेक्शन घेतले.

**मा. कुलगुरू:-**

आपण agenda प्रमाणे कामकाज सुरू करू, अशी मी सगळ्या सदस्यांना विनंती करतो.

**श्री. संभाजी भोसले:-**

जे कोणत्याही प्राधिकरणाचे सदस्य नाहीत, अशा लोकांच्या सूचनेने हे विद्यापीठ चालतेय. आपण बेकायदेशीरपणे काम चालू द्यायचे का? सदस्यांना वेळेवर पत्र मिळाली नाहीत म्हणून काही सदस्य बैठकीला आले नाहीत.

**कुलसचिव:-**

आपही बोलते है की नियम से काम करो और आपही नियम का violation क्यूँ करते हो? मैं Statute ५३ और ५४ का violation नही करूँगी। मीटिंग की परमिशन जब आयी तबसे ४२ days थे ही नही इसलिए हमने date के साथ थोडा समझौता किया है।

**प्र- कुलगुरू:-**

आपण act नुसार जाऊ अशी मी सगळ्या सदस्यांना विनंती करतो.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

तुम्ही तुमची सोय होत असेल तर ॲडजस्टमेंट करता.

**प्र- कुलगुरू:-**

आपल्या सर्वांचा विद्यापीठाचे चांगले काम व्हावे असा हेतू ठेवूनच येथे आलात. म्हणून आपण ॲक्टप्रमाणे जाऊ.

**श्री. मगरे:-**

सदस्यांनी मांडलेल्या भावनांचा सन्मान झाला पाहिजे, एवढीच आमची इच्छा आहे. आतापर्यंत तुमचे धकले, आता नाही चालणार.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

आम्ही सह्या करून बैठकीमधून जाऊ, चान्सलरला निवेदन देऊ. तुमच्या सोयीने कायदे दाखवू नका.

**कुलसचिव:-**

हमारा सबसे यही इन्तेजा है की, माननीय Chancellor सर ने २० मार्च की date दिया है। इसका मान रखके आगे proceed होना चाहिए।

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

तुम्ही legally चाला, आम्हीही legally चालू.

**कुलसचिव:-**

हमने किसीका कटमोशन नही लिया है।

**श्री. संजय निंबाळकर:-**

आपण agenda प्रमाणे कामकाज करू.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

आपले नवीन परिनियम आलेले नाहीत. मग विद्यापीठ चालवायचे कसे? ही संपूर्ण मीटिंग illegal आहे. तुम्ही परिनियम, कायदा पाळणार नसाल तर ही मीटिंग सुरू कशाला करता? मी चान्सलर ऑफिसला टीचर भरतीबद्दल पत्र दिले. राज्यपालांचे पत्र येऊन दीड वर्ष झाले तरी आजपर्यंत कोणतीही ॲक्शन झाली नाही. आपण कायदा पाळलाच पाहिजे.

**श्री. संजय निंबाळकर:-**

सर, भाऊसाहेब बोलले ते रास्त आहे. पण आज आपण मा. राज्यपालांच्या आदेशाप्रमाणे बैठक बोलविली आहे. ते आपल्या सर्वांचे हेड आहेत. त्यामुळे आजची मीटिंग पुढे ढकलण्याचा, रद्द करण्याचा विषय येतच नाही. आपण नॅकला सामोरे जाणार आहोत, म्हणून चुका दुरुस्त करा पण आजची बैठक घ्यावीच लागेल.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

ही सिनेट स्टॅट्युटनुसार meeting मध्ये convert करा. वाटले तर त्यासाठी मतदान घ्या.

**डॉ. डोभाळ:-**

बिलकूल नाही, अशा पद्धतीने विद्यापीठास वेठीस धरू नका.

**श्री. सुनिल मगरे:-**

ही बैठक रद्द करता येत नाही या मताशी आम्ही सहमत आहोत. आमची विनंती आहे की, डॉ. लक्ष्मीकांत शिंदे सरांनी कटमोशन संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे, त्यासंदर्भात निर्णय झाला पाहिजे. आम्हाला विद्यापीठाला वेठीस धरायचा उद्देश नाही, आमचा उद्देश फक्त हे विद्यापीठ कायद्यानेच चालले पाहिजे एवढाच आहे.

**मा. कुलगुरू:-**

बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या विद्यापीठाला आहे. उद्या ही सिनेट रद्द झाल्याची पेपरात बातमी आली तर विद्यापीठाची बदनामीच होणार आहे.

**श्री. सुनिल मगरे:-**

कटमोशनबद्दलचे उत्तर द्या.

**मा. कुलगुरू:-**

आज बजेट मंजूर झालेच पाहिजे ही माझी ठाम भूमिका आहे. माझी सर्व सदस्यांना वॉर्निंग आहे की, या विद्यापीठापेक्षा कोणीही मोठे नाही, कुलगुरूसुद्धा मोठे नाहीत, हे लक्षात घ्या. As a Chairman of Senate कटमोशन मला मान्य नाही ही माझी ठाम भूमिका आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

१६ दिवस आधी विषयपत्रिका दिली नाही, म्हणून मी याचा जाहीर निषेध करतो. ॲक्टनुसार ही मीटिंग चालत नाहीये. बजेटबद्दल आपण बोलणारच आहोत. कोर्ट केसेसवर विद्यार्थ्यांच्या घामाचे दहा लाख रुपये आपण खर्च करत आहोत. आम्ही सभागृहाला वेठीस धरत नाहीत. लोकशाही ही बहुमताने चालते. ही सिनेट आपल्याला मीटिंगमध्ये Convert करता येते. हे स्टॅट्युटमध्ये आहे.

**प्राध्यापक वाल्मिक सरवदे:-**

विषयपत्रिकेप्रमाणे कामकाज सुरू करा.

**श्री. सुनिल मगरे, डॉ. फुलचंद सलामपुरे व अन्य काही सदस्य:-**

प्रभारींना बोलायचा अधिकार कुणी दिला? ज्यांना बोलायचे आहे त्यांनी निवडून यावे, मग बोलावे.

**प्राध्यापक वाल्मिक सरवदे:-**

मी सभागृहाचा मेंबर आहे, मला सभागृहात बोलायचा अधिकार आहे.

**मा. कुलगुरू:-**

एकावेळी एकाने बोला, नाहीतर गोंधळ होईल.

**कुलसचिव:-**

चेअरमन सर का मान रखिए।

**श्री. सुनिल मगरे:-**

ज्यांना बोलायचे आहे त्यांनी निवडून यावे, मग बोलावे.

**कुलसचिव:-**

कायदे से सब मेंबर को समान अधिकार है। अब अजेंडा शुरु करेंगे।

| | |
|---|---|
| १ | दिनांक १५-११-२०१७ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत संमत करणे. |

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

माझे असे मत आहे की, आपण कायद्याप्रमाणे चालले पाहिजे. तुम्ही आधीच्या ऑफिसरच्या सिनेट मीटिंगसमोर जे भाषण केले असेल ते कार्यवृत्तांतात का आले नाही?

**मा. कुलगुरू:-**

अधिकारमंडळे पूर्ण अस्तित्त्वात नसल्याने आपण तसे केले नाही.

**श्री. सुनिल मगरे:-**

पहिल्या प्रस्तावातील एक-एक मुद्दा घ्या.

**डॉ. भारत खैरनार:-**

सर्व सदस्यांना सन २०१६-१७ च्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत द्या.

**प्राध्यापक एन. एस. राठी:-**

आपण २०१६-१७ च्या लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती येथे आणल्या नाहीत. लवकरच तुम्हाला available करून देऊ.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad

**डॉ. भारत खैरनार:-**

पत्रासोबतच ऑडिट रिपोर्ट द्यायला पाहिजे होता. आम्ही आता कधी अभ्यास करणार?

**मा. कुलगुरू:-**

मित्रहो आता आपण लंच ब्रेक घेऊयात.

---

**लंच ब्रेक**

---

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

२०१४-१५ ला हे विद्यापीठ १६ कोटी ७४ लाखने surplus होते. २०१५-१६ ला २२ कोटीने surplus होते. २०१६-१७ ला २० कोटीने surplus आहे.

**प्राध्यापक एन. एस. राठी:-**

आपण surplus चा पैसा FD मध्ये convert करत असतो. Monthly ४५ लाख आपण नॅशनलाईज बँकेत FD करत असतो.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

हे सगळे मान्य आहे सर. प्राध्यापक चोपडे विद्यापीठात कुलगुरू म्हणून आल्यानंतर ॲकॅडेमिक लीडरशिप आम्हाला मिळेल असे आम्हाला वाटले. १००० कोटी आम्ही विद्यापीठात आणू असे त्यांनी म्हटले. कुठे आहे तो निधी?

**श्री. सुनिल मगरे:-**

मागच्या तीन वर्षात विद्यापीठाने किती मुदत ठेवी ठेवल्या? किती मोडल्या? याचा खुलासा करावा. भाऊसाहेबांनी मांडलेल्या मुद्याचाही खुलासा व्हावा.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

कुलगुरूंनी मांडलेले व्हिजन पूर्ण होणार आहे का? कोणतेही कुलगुरू हे व्हिजन पूर्ण करू शकणार नाहीत. राठी सर, मी तुमचे अभिनंदन करीन कारण तुम्ही महाराष्ट्र बँकेकडून १ कोटी ७ लाख व्याजाच्या रुपाने मिळवून दिलेत, मी अकाऊंट सेक्शनचेसुद्धा अभिनंदन करील. आपल्याला ८३ लोकांचा स्टाफ हवा असताना फक्त २० लोक कार्यरत आहेत. त्यातही काही लोकांच्या बदल्या केल्या जातात. मध्यंतरी विद्यापीठाचे पूर्ण प्रशासन बदल्यांमुळे डिस्टर्ब झाले होते. कोणाच्या सांगण्यावरून असे विद्यापीठ चालत असेल तर ते बरोबर नाही असे मला वैयक्तिक वाटते. एखाद्या कर्मचाऱ्याची बदली होऊ शकते, पण at a time ३०-३० लोकांच्या बदल्या का होतात? पण शेवटी तुम्हाला त्या-त्या सेक्शनला तेच कर्मचारी घ्यावे लागले. नेटके सरांचे उदाहरण समोर आहे. त्यांनी प्रामाणिक काम करूनही त्यांच्या बदल्या झाल्या.

**श्री. संभाजी भोसले:-**

मुंबई विद्यापीठाने त्यांची दखल घेतली की मग पुन्हा त्यांना आणता.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

लोकांचे appreciation केलेच पाहिजे.

**डॉ. बाबासाहेब कोकाटे:-**

नेटके सरांच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडतो.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. सुनिल मगरे:-**

याला माझे पूर्ण अनुमोदन आहे.

**डॉ. बाबासाहेब कोकाटे:-**

परीक्षा विभाग सुरळीत चालण्यासाठी D-Cas ला पैसे ॲडव्हान्स द्यावे लागतात. राठी सरांनी ॲडव्हान्स देणे बंद केले. तेथे ठोंबरे सरांनी स्वत: पैसे दिले तर तुम्ही पैसे का दिले म्हणून त्यांच्यावर कार्यवाही करायला निघाले. राठी सरांचे म्हणणे आहे की तो पैसा FD मध्ये तो ठेवला तर त्याला व्याज मिळेल. पण FD ऐवजी पैशाचे वाटप झाले तरच परीक्षेचे कामकाज सुरळीत चालेल.

**मा. कुलगुरू:-**

ही सूचना पूर्ण मान्य आहे. येथून पुढे आपण D-Cas साठी ॲडव्हान्स देऊ. मी नेटके सरांच्या पाठीशी आहे.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

२०१७-१८ मध्ये २२ कोटी ॲडव्हान्सेस दिले. त्यावर ८% व्याज घेतले जात नाही. ॲडव्हान्सेस मार्च एंडपर्यंत क्लिअर झाले पाहिजेत. करोडो रुपयाचे नुकसान होत आहे त्यावर कोणाचे लक्ष आहे की नाही? एकतर तुम्हाला अकाऊंटला qualified staff द्यावाच लागेल. गेल्यावेळेस एकदा सिनेटची मीटिंग ॲडव्हान्सची यादी मागविण्यासाठी बंद पाडली होती. नांदेड विद्यापीठातील महाविद्यालयांकडे अजूनही ॲडव्हान्सेस आहेत याचासुद्धा विचार केला पाहिजे. विद्यापीठाचे हित पाहिले पाहिजे एवढीच आमची अपेक्षा आहे.

**मा. कुलगुरू:-**

हा मुद्दा निश्चितच स्तुत्य आहे. लेखा विभाग सक्षम होण्यासाठी मी बी.कॉम. झालेल्या ६ लोकांची आपण ट्रान्सफर करत आहोत. माझ्या ऑफिसचा माणूस मी अकाऊंटला दिलेला आहे. अकाऊंटला आवश्यक ती manpower देऊ.

**प्राध्यापक एन. एस. राठी:-**

भाऊसाहेबांचा मुद्दा आम्हालाही मान्य आहे. पण होते काय की, ॲडव्हान्सेस सेटलमेंट हे होतच नाही. आम्ही circular काढले, एका महिन्यात सेटलमेंट झाले पाहिजे, सप्टेंबरचे बिले आता काल आले. त्यात स्टाफसुद्धा कमी आहे. म्हणून आम्ही सरांना complain केली. असणाऱ्या स्टाफचीसुद्धा कामाची मर्यादा आहे. इतक्या कमी स्टाफमध्ये डिपार्टमेंट चालते. पण त्यातूनही रोष वाढतो. आपण याची दखल घेतली याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

ऑडिट रिपोर्टला २२ कोटी ॲडव्हान्सेस दिसतात, it is not good. Second thing is ज्या लोकांकडे १ रुपया पासून विशिष्ट रकमेपर्यंत ॲडव्हान्सेस आहेत ते राईट ऑफ करण्यात यावेत असा मी ठराव मांडतो.

**प्राध्यापक एन. एस. राठी:-**

Maximum limit किती असावी हे सूचवा भाऊसाहेब. एका विभागातील रुमला काही कारणास्तव सील लावले. त्यात जुन्या नोटा होत्या. त्या राईट ऑफ करण्याची तरतूद अकाऊंट कोडमध्ये नाही. त्याला फायनान्स कमिटी लागते. ५०० च्या ११ नोटा तशाच पडून आहेत. त्याचे काय करावे? स्पेशल बाब म्हणून जुन्या नोटा राईट ऑफ केल्या नाही तर आपल्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील १९९४ पूर्वी असणाऱ्या मेडिकल कॉलेजवरील ॲडव्हान्सेस राईट ऑफ करण्यात यावेत.

**श्री. संजय निंबाळकर:-**

पण त्या महाविद्यालयाची अमाऊंट किती आहे हे आधी बघावे लागेल.

**प्र-कुलगुरू:-**

अडचणी अशा की काही लोक रिटायर, एक्स्पायर झालेले असतात.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

घाटी आणि गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेज यांच्याकडेसुद्धा ॲडव्हान्सेस आहेत. ते राईट ऑफ करावेत किंवा पैसे वसुलीसाठी कमिटी बसवा.

**डॉ. राठी:-**

२००००/- पैकी मी ८०% अमाऊंट दिली. त्यानिमित्ताने ॲडव्हान्स क्लिअर होतील अशी अपेक्षा होती. पण तसे झाले नाही. ॲडव्हान्स मार्च एंडला क्लिअर करू ही सगळ्यांची मानसिकता बदलली पाहिजे. उद्या कॅगने ताशेरे ओढले तर कोणीच समोर येत नाही. फक्त अकाऊंटला फेस करावे लागेल.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

अकाऊंटला नाराजी पत्करावीच लागते, तरच चांगले होईल.

**श्री. संजय निंबाळकर:-**

राईट ऑफबद्दल निर्णय घ्या.

**डॉ. कांबळे:-**

D-Cas बद्दल काय? ते सांगा.

**डॉ. राठी:-**

असेसमेंटचे काम हे ४५ दिवस चालते. काम संपल्यावरच आपण त्याचे पैसे देतो. मग पहिल्यापासूनच त्यांना पैसे का द्यावेत? ही माझी भूमिका आहे. दिलेल्या पैशाचे सेटलमेंट लवकर होत नाही सर. ही गोष्ट कंट्रोल व्हावी शिवाय विद्यापीठाला व्याज मिळावे हीच आमची भूमिका आहे. ठोंबरे सरांनी ७००००/- खर्च केला. अकाऊंट्स कोडच्या नियमाप्रमाणे तुम्हाला रु. १००००/- च्या वर तुम्हाला खर्च करायचा असेल तर administrative approval लागते. त्याबद्दल आम्ही पत्र दिले. आम्ही कुठलीही चूक केली नाही.

**डॉ. कोकाटे:-**

D-Cas साठी CHB वरील प्राध्यापकवर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांना तिकिट, जेवण यासाठी पैसे लागतात. त्यांना पैसे नाही दिले तर पेपर तपासले जाणार नाहीत. मुंबई विद्यापीठासारखे आपले होऊ नये. आतापर्यंत सेटलमेंट व्यवस्थित झालेल्या आहेत, त्यात काहीही fraud होत नाही. मूल्यांकन पद्धतीत सुधारणा करावयाची असेल तर ॲडव्हान्स दिलेच पाहिजेत.

**डॉ. राठी:-**

पंधरा हजार मागणी केल्यास आपण पाच-पाच-पाच हजार असे दिलेच आहेत. यातून विद्यापीठालाही उत्पन्न मिळेल हीच भूमिका आहे, कोणाचीही अडवणूक करण्याची भूमिका नाही.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठासारखी RTGS सिस्टीम राबविता येईल का?

**डॉ. राठी:-**

आपले ९९% पेमेंट हे RTGS ने ऑनलाईन चालले आहे.

**प्र-कुलगुरू:-**

रोजचा पैसा FD मध्ये टाकण्याच्या सिस्टीमचा निश्चितच विद्यापीठाला फायदा झाला आहे. अकाऊंटला स्टाफ कमी आहे त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. मॅनपॉवर कमी असल्यामुळे रिकव्हरी कमी आहे. पुढच्या काळात याबद्दल ते काळजी घेतील. मला असे वाटते की, आता आपण पुढच्या विषयाकडे जाऊ.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

भाऊसाहेबांच्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. १ | **विद्यापीठात लेखा विभागात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावर रु. १/- ते रु. ९९/- इतक्या प्रलंबित अग्रीम रकमांच्या नोंदी राईट ऑफ करण्यात याव्यात, असे ठरले.**<br>**तसेच विद्यापीठाच्या विभागात सील करून ठेवलेल्या रुममधील ५०० च्या ११ जुन्या नोटा आहेत, त्यासुद्धा स्पेशल बाब म्हणून राईट ऑफ करण्यात याव्यात, असेही ठरले.**<br>(सूचक- श्री. भाऊसाहेब राजळे, अनुमोदक- डॉ. लक्ष्मीकांत शिंदे) |

**श्री. सुनिल मगरे:-**

ऑडिट रिपोर्टमध्ये उपस्थित केलेल्या १४ मुद्यांबद्दल येथे खुलासा करण्यात यावा, अशी विनंती आहे.

**डॉ. राठी:-**

आम्ही त्या मुद्यांनुसार काळजी घेत आहोत. १००% ऐवजी ८०% अॅडव्हान्स देत आहोत. मॉडेल कॉलेजचे बांधकामाचे पैसे आपण PWD कडे भरले होते. पण बांधकाम पूर्ण झाले नव्हते. आता त्याचे युटिलायझेशन झाले आहे, गव्हर्नमेंटकडून पैसे आले आहेत.

**डॉ. रमेश भुतेकर:-**

सिनेट सदस्य श्री. राहूल म्हस्केंचा जो अवमान झाला आहे त्याबद्दल संबंधित अधिकाऱ्याला बोलवून खुलासा घ्यावा, नाहीतर कामकाज चालणार नाही.

**प्र-कुलगुरू:-**

संबंधित अधिकाऱ्याकडून लेखी खुलासा घेऊन बैठक संपण्याच्या आत निर्णय होईल.

**डॉ. रमेश भुतेकर:-**

त्यांना येथे ताबडतोब बोलवा.

**डॉ. गोविंद काळे:-**

त्यांचा लेखी खुलासा घ्यावा. त्यांना येथे बोलवणे म्हणजे सभागृहाचा अवमान आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. सुनिल मगरे:-**

सकाळी ठरल्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्याकडून लेखी खुलासा घेऊ, त्यानुसार कार्यवाही करावी. फक्त बैठक संपण्याच्या आत कार्यवाही हीच आमची विनंती आहे.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

पहिली गोष्ट म्हणजे विद्यापीठात आजपर्यंत रेट काँट्रॅक्ट झाला आहे किंवा नाही ही शंकाच आहे, पण माझ्या माहितीप्रमाणे झालेला नाही. म्हणून लवकरात लवकर रेट काँट्रॅक्ट करून घ्यावा. दुसरी गोष्ट म्हणजे फिजिकल व्हेरिफिकेशन करून घेण्यात यावे म्हणजे आपली तुट कमी होईल.

**मा. कुलगुरू:-**

मी डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांच्या मुद्याशी सहमत आहे. लवकरच रेट काँट्रॅक्ट करून घेण्यात येईल आणि योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**प्र-कुलगुरू:-**

विषयपत्रिकेवरचे सगळे विषय वाचत बसले तर आपल्याला सगळा दिवस पुरणार नाही. कोणाला कोणते ऑब्जेक्शन असेल तर त्यावरच बोला. आपल्याला अजून प्रश्नोत्तरे सुरू करावयाची आहेत. म्हणून सगळ्या सदस्यांना वेळ मिळाला पाहिजे.

**श्री. संजय काळबांडे:-**

मी आधी माझा परिचय देतो. मी ॲड. संजय काळबांडे, जालना येथे वकिली करतो. मागच्या काही काळात मी जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. आता मी पदवीधर संघातून सिनेटवर आहे. आम्हाला विद्यापीठासारख्या मोठ्या ठिकाणी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद वाटला. श्री. भाऊसाहेब राजळे, श्री. संजय निंबाळकर यांच्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांसोबत कामाची संधी मिळाली आहे, म्हणून आम्हाला काही गोष्टीत काम करण्याची संधी मिळाली तर आम्हीही खारीचा वाटा उचलू. येथे आलेल्या सर्वांचा उद्देश विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे हित हेच आहे, आणि हाच उद्देश असायला पाहिजे.

बंद करण्यात आलेले मानवलोक कॉलेज पुन्हा सुरू करण्याची गरज आपल्याला का वाटली हा माझा प्रश्न आहे.

पाच वर्षाचा बृहत आराखड्याला अंतिम मंजुरी देण्याचा विषय १८ नंबरवर आहे. नवीन विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ कशी केली जाते याची माहिती आम्हा सर्व सदस्यांना असणे गरजेचे आहे. हा पाचवर्षी आराखडा येथे ठेवायला पाहिजे होता असे आमचे मत आहे. डॉ. बाबासाहेबांची हीच भूमिका होती की समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे. मुंबई-दिल्ली इंडस्ट्रिअल कॉरिडॉर आपल्याकडे येतोय. त्यात मराठवाड्यातील हजारो लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यांना अनेक टेक्निकल हँड्स लागणार आहेत. पण या आराखड्यात काय आहे ते आमच्यासमोर न आल्यामुळे मी याच्यावर आता काही बोलू शकत नाही. आज पोट भरणारे कोर्सेस आवश्यक आहेत. चांगले टेक्निकल अभ्यासक्रम निर्माण झाल्यास येथील लोकांचा फायदा होईल. त्यादृष्टीने मा. राज्यपाल कार्यालयाकडे काहीच सूचना करता आली तर करण्यात यावी, एवढीच विनंती करतो.

**डॉ. कोकाटे:-**

मॉडेल कॉलेज येथे Honours चे कोर्सेस सुरू करण्यासाठी १२ करोडची तरतूद केलेली आहे. हा पैसा शासनाकडून येतो किंवा विद्यापीठाकडून खर्च केला जातोय याची आम्हाला माहिती पाहिजे. दुसरा असा प्रश्न आहे की मॉडेल कॉलेज, घनसावंगी सारख्या ठिकाणी असे कोर्सेस सुरू करण्यामागचे कारण काय आहे हे आम्हाला समजत नाही. या विद्यापीठात ट्रेनिंग स्कूल फॉर एन्टर इन पॉलिटिक्स हा अभ्यासक्रम सुरू करावा अशी मागणी अनेक दिवसापासूनची आहे. डॉ. बाबासाहेबांनी या देशाला एक आदर्श असे संविधान दिले आहे. असे असूनही या संविधानाचा अभ्यास कोणत्याच विद्यापीठात केला जात नाही. बाबासाहेबांची इच्छा होती की अशा प्रकारचे ट्रेनिंग स्कूल सुरू करावेत. बाबासाहेबांनी १९५६ ला एस. एस. रेगे, मधु दंडवते आणि पी.व्ही. कर्णिक,

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

बाळाराम तुळपुरे यांच्या सहकार्याने मुंबई येथील एका महाविद्यालयात ट्रेनिंग स्कूल फॉर एन्टर इन पॉलिटिक्स हे सुरू केले होते. हेच स्कूल आपल्या विद्यापीठात सुरू करण्यात यावे, कारण राजकारणात येणारी पिढी ही संविधानाचा अभ्यास करेल आणि सक्षम भारताच्या निर्मितीचे काम करेल. राजकारणात आज संविधानाचा अभ्यास न करणारी पिढी असल्याने संविधान मलीन करण्याचे काम आज होत आहे. म्हणून या विद्यापीठांतर्गत हा अभ्यासक्रम सुरू करावा. भारतात जी सरकारची खाती आहेत त्याचे शिक्षण येथे दिले जात नाही. मग १२ कोटीची तरतूद इतर अभ्यासक्रमावर केली जात आहे. म्हणून माझी विनंती आहे की, ट्रेनिंग स्कूल फॉर एन्टर इन पॉलिटिक्स हा अभ्यासक्रम सुरू करावा.

**डॉ. डोभाळः-**

रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करावेत अशी आपली एकीकडे भूमिका आहे. परंतु रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांच्या affiliation ची ३ ते ४ लाख फीस आपण घेताय. कशासाठी? बी.ए. सारख्या कोर्ससाठी पन्नास हजार फीस, आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रमासाठी तीन ते चार लाख फीस आहे. म्हणून रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची फीस कमी झाली पाहिजे. गोरगरीब विद्यार्थ्यांना हे परवडत नाही. काही कोर्सेसची फी आपण बी.ए., बी.कॉम. प्रमाणे घेतो व प्रोफेशनल कोर्सेसची फीस आपण एका सेमिस्टरला रु. १६००/- म्हणजे वर्षाला रु. ३२००/- इतकी का घेतो याचा खुलासा करण्यात यावा. ही फीस ठरविण्यासाठी एक समिती गठीत केली पाहिजे, अशी माझी विनंती आहे. २०१६ च्या विद्यापीठ ॲक्टमध्ये याचे provision झाले आहे. यासंदर्भात अनेकदा पाठपुरावा करूनही काही झाले नाही म्हणून याबाबत कार्यवाही झाली पाहिजे, अशी विनंती आहे.

**श्री. जितेंद्र देहाडेः-**

जुलै १९५६ मध्ये मुंबईला बाबासाहेबांनी ज्याप्रमाणे ट्रेनिंग स्कूल फॉर एन्टर इन पॉलिटिक्स हा अभ्यासक्रम सुरू केला त्याचप्रमाणे पुणे येथे एमआयटी विद्यापीठात स्कूल ऑफ गव्हर्नमेंटमध्ये मास्टर प्रोग्राम इन गव्हर्नमेंट हा विषय शिकवला जातो. आपल्याला सांगायला मला आनंद वाटतो की, त्या कोर्सच्या बोर्ड ऑफ स्टडीजचा मी मेंबर आहे. अतिशय सुंदर असा कोर्स आहे. संपूर्ण देशातून ४० विद्यार्थी तेथे हा कोर्स शिकत आहेत. त्यांना त्याची डिग्री दिली जाते. माझी तेथील संचालकांशी चर्चा झाली की आपल्या विद्यापीठात तो कोर्स सुरू करायला असेल तर काय केले पाहिजे? त्यांनी सांगितले की यासाठी वेगळ्याने अपॉईंटमेंट करण्याची गरज नाही. विद्यापीठातील पॉलिटिक्स डिपार्टमेंटमधील शिक्षकांची सांगड घालून एक कमिटी करण्यात यावी. त्या कमिटीने एमआयटीमध्ये हा कोर्स कसा चालतो त्याची माहिती घ्यावी. ते आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन कराया तयार आहेत. म्हणून आता ट्रेनिंग स्कूल फॉर एन्टर इन पॉलिटिक्स हा अभ्यासक्रम सुरू करावा असा मी ठराव मांडतो.

माझी विनंती आहे की, आपण २० लाखाची तरतूद करावी. त्यातून १००० विद्यार्थ्यांचा सर्व्हे करावा. नंतर कोणते अभ्यासक्रम सुरू करायचे हे ठरवले पाहिजे.

**श्री. संजय निंबाळकरः-**

मला एकच विचारायचे आहे की, या अभ्यासक्रमाला काही परवानगी लागते की नाही?

**मा. कुलगुरूः-**

होय, याला परवानगी घ्यावी लागेल.

**श्री. संजय निंबाळकरः-**

मग तुम्हाला शासनाकडे परवानगीसाठी प्रस्ताव पाठवावा लागेल.

**मा. कुलगुरूः-**

आपण मांडलेल्या ठरावाचे मी स्वागत करतो. या अनुषंगाने शासनासोबत पत्रव्यवहार केला जाईल. एमआयटीकडे पाठपुरावा करण्यासाठी समिती गठीत करण्यात येत आहे. त्यात श्री. भाऊसाहेब राजळे, डॉ. बाबासाहेब कोकाटे, श्री. जितेंद्र देहाडे, श्री. संभाजी भोसले, श्री. संजय काळबांडे यांचा समावेश करण्यात येईल.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | |
|---|---|
| **विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. २** | **विद्यापीठात 'ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रन्स इन पॉलिटिक्स' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात यावा, असे ठरले. त्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी, असे ठरले.**<br>**१. श्री. जितेंद्र देहाडे- अध्यक्ष**<br>**२. श्री. बाबासाहेब कोकाटे**<br>**३. श्री. राहूल म्हस्के**<br>**४. श्री. शेख जहूर खालेद**<br>**५. श्री. पंकज भारसाखळे**<br>(सूचक- श्री. देहाडे, अनुमोदक- श्री. कोकाटे) |

| | |
|---|---|
| **विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ३** | **एक हजार विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून विद्यापीठात कोणकोणते अभ्यासक्रम सुरू करावेत यासंदर्भात शिफारस करण्यात यावी, असे ठरले.**<br>(सूचक- श्री. देहाडे, अनुमोदक- श्री. कोकाटे) |

**डॉ. नरेंद्र काळे:-**

एम.व्होक. ॲटोमोबाईल टेक्नॉलॉजी, एम.व्होक. इंडस्ट्रिअल ॲटोमायझेशन या नवीन पदव्यांचा परिनियम २२८ मध्ये समावेश केला आहे. आपल्याकडे हे कोर्सेस चालू केले ही आनंदाची गोष्ट आहे. पण आता महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेबांच्या नावाने टेक्निकल युनिव्हर्सिटी वेगळी झाली आहे. मग अशावेळी या कोर्सेसचे आपल्या विद्यापीठात काय भवितव्य असेल?

**डॉ. डोभाळ:-**

आता हा बृहत आराखडा मंजूर झाला आहे. पण आता पुढच्या वर्षाचा बृहत आराखडा आपल्याला करायचा आहे. त्याची फीस आताच आपल्याला ठरावावी लागेल. त्यासाठी एक समिती नेमावी लागेल.

**प्र-कुलगुरू-**

हा विषय ॲकॅडेमिक कौन्सिलचा आहे.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

आपल्याला नवीन कायद्यानुसार बृहत आराखडा तयार करायचा आहे. एक वाईट गोष्ट अशी की हा आराखडा चार डीन व एक प्रो-व्हाईस चान्सलर या पाच जणांनीच तयार केला आहे. मागच्या कायद्यानुसार वेगवेगळ्या प्राधिकरणातून समितीवर सदस्य येत होते. कमिशनर ऑफिसद्वारे लोकसंख्येचा विचार केला जात होता. डॉ. नरेंद्र जाधव कमिटीचे व्हिजन होते. आता या चार डीनला व एका प्रो-व्हाईस चान्सलरचा या संपूर्ण व्हिजनची माहिती आहे का? नवीन ॲक्ट येताना आम्ही याबद्दल बोललो पण यात दुरुस्ती झाली नाही. कोणत्याही कोर्सची फी ठरविण्याचा अधिकार हा ॲकॅडेमिक कौन्सिलला आहे.

**डॉ. डोभाळ:-**

नवीन ॲक्टनुसार पुढच्या वर्षीच्या कोर्सेसची फीस काय असेल हे तुम्हाला May ending पर्यंत जाहीर करायचे आहे. यासाठीची कमिटी अजून केलीच नाही.

**मा. कुलगुरू:-**

प्राध्यापक सरवदे, तुम्ही उत्तर द्या.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

**प्राध्यापक सरवदे:-**

बृहत आराखडा या वर्षीचा तयार झाला आहे. शासनाला ३० सप्टेंबरपर्यंत पाठवायचा होता. तो आपण पाठवलेला आहे. आपल्याकडे ४७ प्रस्ताव आले होते. पैकी ४२ प्रस्ताव शासनाकडे पाठविले. टेक्निकल डॉक्युमेंट नसणारी ३-४ प्रस्ताव आपण शासनाला पाठविले नाहीत. शासनाकडून आलेल्या जीआर व नोटिफिकेशननुसार आपण शासनाला प्रस्ताव पाठविले. बृहत आराखड्याची प्रत तुम्हाला थोड्या वेळात दिली जाईल.

फीस संदर्भात कमिटीचा मी चेअरमन आहे. तुमचे काही म्हणणे असेल तर माझ्याकडे देण्यात यावे, त्याचा विचार केला जाईल.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर अंतर्गत पाच लाख वेगवेगळ्या प्रकारचे रोजगार उपलब्ध होणार आहेत. डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट सायन्स गेल्या दोन वर्षापासून यावर काम करत आहे. आमचा प्रोजेक्ट तयार झाला आहे. आम्ही विद्यार्थ्यांना, शिक्षकांना मोटिव्हेट केले आहे. त्याचे सर्व डॉक्युमेंट आमच्याकडे तयार आहेत.

**प्र-कुलगुरू:-**

पुढचा विषय घ्या. आता आपल्याला राहिलेले complete करायचे आहे.

**श्री. सुनिल मगरे:-**

आता सरवदे सरांचे अभिनंदन करतो, कारण त्यांनी खऱ्या अर्थाने त्यांची भूमिका मांडली.

**प्र-कुलगुरू:-**

डॉ. नरेंद्र काळे सरांनी मांडलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो. बी.व्होक., एम.व्होक.चे कोर्सेस हे युजीसीकडून इंजिनिअरिंग ऐवजी अकृषी विद्यापीठांना दिले जातात. याचा अभ्यासक्रम तयार करण्याचे सर्व अधिकार विद्यापीठाला दिलेले आहेत. हा कोर्स पूर्ण केल्यानंतर चांगल्याप्रकारे प्लेसमेंट झाल्या आहेत. तसेच रोजगाराभिमुख सहा महिन्याचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत, आणखी त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. इंडस्ट्रीला आपण प्रोजेक्ट सादर करत आहोत, बँकासुद्धा विनातारण कर्ज द्यायला तयार आहेत.

**मा. कुलगुरू:-**

एक आनंदाची गोष्ट अशी की, सबंध भारतात आपल्या विद्यापीठात प्रथम skill development, बी.व्होक. हा कोर्स सुरू केला. गेल्या चार वर्षात युजीसीकडून आठ कोटीचे अनुदान भेटले. १००% प्लेसमेंट, एम.व्होक. अँटोमायझेशन करणारे भारतातील पहिले विद्यापीठ आपले आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. आपला Marathwada is hub for Automation and Automobile. त्याचा फायदा घेऊन आपण collaboration करून इंडस्ट्रीचे सहकार्य घेऊन हा प्रोग्राम सुरू केला आहे.

**श्री. किशोर शितोळे:-**

प्लेसमेंट म्हणजे नोकरी करणे असे न होता उद्योजक निर्माण करण्यावर भर द्यावा, यासाठी आपण प्रयत्न करतोय.

**डॉ. गोविंद काळे:-**

डॉ. डोभाळ सर म्हटल्याप्रमाणे नवीन कायद्यातील कलम १०१ प्रमाणे फीस संदर्भात समिती गठीत करण्यात यावी. त्यात प्राचार्य, संस्थाचालक, पदवीधर, शिक्षक यांचे प्रतिनिधी असावेत. या समितीची वर्षात किमान दोनदा बैठक होईल, आवश्यकतेनुसार आणखी बैठका घेण्यात येतील हे कायद्यात नमूद केलेले आहे. शिक्षण हे गरिबांपर्यंत पोहोचले पाहिजे, त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, त्यानुसार शुल्क ठरविण्यात यावे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**प्र-कुलगुरू:-**

डॉ. काळे यांच्या सूचनेनुसार ॲक्टप्रमाणे समिती गठीत करण्यात येईल. तसेच विविध घटकातील प्रतिनिधींना सल्लागार म्हणून घेण्यात येईल.

**डॉ. जयसिंग देशमुख:-**

प्रत्येक जिल्ह्याचा एक प्रतिनिधी बृहत आराखड्याच्या समितीत असावा, कारण प्रत्येकाला आपल्या जिल्ह्याची भौगोलिक स्थिती माहिती असते.

**डॉ. एम. बी. धोंडगे:-**

एम.ए. बहिस्थचे बरेच कोर्सेस हे दोन वर्षापासून बंद आहेत. ते का बंद आहेत याचा येथे खुलासा व्हावा.

**मा. कुलगुरू:-**

आपण युजीसीला ओपन डिस्टन्स एज्युकेशनसाठी आठ महिन्यापूर्वी पत्र पाठविले आहे. मी स्वत: पाठपुरावा करीत असून दोन महिन्यात कमिटी येणार आहे. त्यांनी परवानगी दिली की आपण सुरू करू. आपण आपल्या विद्यार्थ्यांना परवडेल अशी फीस ठेवू.

**प्राध्यापक सरवदे:-**

आपण सप्टेंबरमध्येच शासनाला बृहत आराखडा सादर केला आहे. शासनाची कमिटी एप्रिल-मे दरम्यान येणार आहे. आपण दिलेल्या कोर्सेसपैकी ९०% कोर्सेस हे skill based courses आहेत.

**श्री. सुनिल मगरे:-**

आम्हाला बृहत आराखड्याची एक कॉपी द्या. त्या समितीने भौगोलिक अंतराचा विचार केला आहे का? त्या समितीने १५ कि.मी.च्या आत दोन महाविद्यालये दिली आहेत. मग याला आम्ही मंजुरी द्यायची आहे का? तीन हजार लोकसंख्या असणाऱ्या गावाला महाविद्यालय दिले आहे, त्याला आम्ही मंजुरी द्यायची का?

**प्र-कुलगुरू:-**

आपण पुढचा विषय घेऊ.

**श्री. किशोर शितोळे:-**

अर्थसंकल्पासारखा महत्त्वाचा विषय अजून राहिला आहे.

**डॉ. भारत खंदारे:-**

बृहत आराखड्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाकडून रु. १०००/- फीस घेतली जाते. परंतु महाविद्यालयांना बृहत आराखड्याची प्रत दिली जात नाही. आम्ही तर म्हणतो की, आमच्याकडून फीसही घेऊ नका, आणि आम्हाला बृहत आराखड्याची प्रतही देऊ नका.

**प्र-कुलगुरू:-**

प्रत्येक महाविद्यालयाला बृहत आराखड्याची प्रत दिली जाईल, याची सोय करण्यात येईल.

**श्री. संभाजी भोसले:-**

अर्थसंकल्पावरचर्चा आणखी बाकी आहे. म्हणून मागे एकदा केले होते तसे अधिसभेची बैठक दोन दिवस घेण्यात यावी.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. भारत खंदारे:-**

बृहत आराखड्याच्या नावाखाली प्रत्येक रु. १०००/- आपण का घेतो? महाविद्यालयाकडून घेतलेले पैसे कुठे जातात?

**प्राध्यापक सरवदे:-**

शासनाकडून आराखडा आल्यास प्रत्येक महाविद्यालयास पाठविण्यात येईल.

**डॉ. भारत खंदारे:-**

आम्हाला बृहत आराखड्याचे पुस्तक नको, आमचे पैसे परत द्या.

कुलसचिव:-

| | |
|---|---|
| १ | **ठराव**<br>**दि. १५-११-२०१७ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत संमत करण्यात यावा, असे ठरले.**<br>**सदर कार्यवृत्तांतातील बृहत आराखड्याच्या प्रस्तावावर आगामी अधिसभा बैठकीमध्ये विस्तृत चर्चा करण्यात यावी, या सूचनेची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| २ | दिनांक १५-११-२०१७ रोजी अधिसभेने घेतलेल्या ठरावावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. |
| | **ठराव**<br>**दिनांक १५-११-२०१७ रोजी अधिसभेने घेतलेल्या ठरावावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संमत करण्यात यावा, असे ठरले.** |

| | |
|---|---|
| ३ | अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व व्यवस्थापन परिषदेतर्फे तयार केलेल्या प्रश्नांची उत्तरे. |

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

प्रश्नोत्तरासाठी अर्ध्या तासाचा वेळ अपुरा आहे. म्हणून फक्त अर्धा तास वेळ दिला तर चालणार नाही. तुम्ही जास्त वेळ देणार असाल तरच प्रश्नोत्तर घेऊ.

**श्री. सुनिल मगरे:-**

प्रश्नोत्तरात असे म्हटले आहे की, कागदपत्रे सोबत जोडली आहेत; परंतु ती आम्हाला दिलेली नाहीत. ही आमची दिशाभूल आहे. असे का केले?

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

प्रश्नोत्तराला वेळेचे बंधन नको.

**श्री. रमेश भुतेकर:-**

प्रशासन जाणून-बुजून आमच्या सूचनांकडे दुर्लक्ष करीत आहे. सोबत कागदपत्रे जोडली आहेत असे म्हटले आहे पण कागदपत्रे जोडली नाहीत. यासंदर्भात जबाबदार अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**कुलसचिव:-**

जो भी प्रश्न के सामने ऐसा लिखा है कि कागदपत्रे सोबत जोडली आहेत उस प्रश्न का उत्तर देनेवाले मेंबर के पास सब डॉक्युमेंट दिए है। वो बहुत सारे पेपर्स है। आपका समाधान हुए तक आपको डॉक्युमेंट दिखाए जायेंगे।

डॉ. स्मिता अवचार यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

समाजकार्य महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संचलित महाविद्यालय आहे की विद्यापीठाचा एक विभाग आहे? त्यामधील कर्मचारी भरती किंवा कर्मचाऱ्यांच्या समस्या इ. बाबी कोण बघतात?

उत्तर :-

समाजकार्य महाविद्यालय हे विद्यापीठ संचलित आहे. याबाबत मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती करून समितीच्या अहवालानुसार सदर महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदोन्नती तथा वेतननिश्चिती बाबतची प्रकरणे आस्थापना विभागाशी संबंधित असल्याने सदर विभागास पत्र दिले आहे. तसेच वित्त व लेखा विभागास पुढील कार्यवाहीसाठी पत्र दिले आहे.

**डॉ. स्मिता अवचार:-**

समाजकार्य महाविद्यालय हे ८ ऑक्टोबर २००२ ला आले. २२-०१-२००३ ला हे महाविद्यालय विद्यापीठाकडे वर्ग झाले. आपण कमिटी नेमली २०१४-१५ ला. याचा रिपोर्ट आला आहे. त्याची कार्यवाही चार महिन्यापूर्वी सुरू झाली आहे. दीड महिन्यात कार्यवाही पूर्ण होईल असे आपल्याला आश्वासन मिळत आहे. २०१७-१८ मध्ये ४० जागांसाठी एक हजार विद्यार्थ्यांनी registration केले होते. Social Science मधील हा एकमेव कोर्स आहे की जो विद्यार्थ्यांना employment पुरवू शकतो. हा आपल्या विद्यापीठ प्रांगणात कोर्स सुरू आहे. त्या महाविद्यालयाची स्वत:ची लायब्ररी आहे. त्यांच्याकडे सहा हजार पुस्तके आहेत. पण एकच लायब्ररी आहे. तिथे नॉन टीचिंग स्टाफची खूप अडचण आहे. तिथले रेकॉर्ड रुम वाळवीने खाल्ले आहे. कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके update नाहीत. बिल्डिंग कोणत्याही क्षणी कोसळू शकते अशी भीती आहे. तिथले प्राचार्य आता रिटायर झाल्याचे पेपरच्या बातमीतून समजले. त्यांना आपण वयाच्या ६२ वर्षापर्यंत ठेवू शकतो पण त्यांच्या पगाराचे उत्तरदायित्व कोणाचे? हा प्रश्न निर्माण होईल. त्यांच्याकडे इतका जुना कॉम्प्युटर आहे की त्यावर टाईप करणेसुद्धा अवघड आहे. या विभागाची जी परवड होत आहे त्याकडे खरंच गांभीर्याने बघण्याची गरज आहे.

**प्राध्यापक सरवदे:-**

तेथील प्राचार्यांच्या मुदतवाढीकरिता आपण शासनाला पत्र पाठविले. नॉन सॅलरी ग्रँट आल्यास बिल्डिंगचेही बघू. समाजकार्यला मी दोन वेळेस गेलो. समाजकल्याण विभागाला आपण काही बाबींसाठी पाठपुरावा केला आहे. शासन पदभरतीला मान्यता देत नाही. समाजकार्य महाविद्यालयाबद्दल विद्यापीठ प्रशासन पॉझिटिव्ह आहे. एप्रिलपर्यंत आपण शासनाच्या पत्राची वाट पाहू. त्यानंतर आपण निर्णय घेऊ.

**श्री. संजय निंबाळकर:-**

शासनाचे पत्र न आल्यास काय करायचे? म्हणून समाजकार्य महाविद्यालयाला विद्यापीठ विभागाचा दर्जा देण्याबाबत आजच आपण निर्णय घेऊन टाकू.

**डॉ. सतीश दांडगे:-**

आपल्या समाजकार्य महाविद्यालयाकडे लक्ष न दिल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. समाजकल्याण विभागाकडून या महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन दोन-तीन महिने येत नाही. एसआरटीएमयू विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाने अशा प्रकारचे महाविद्यालये विभाग म्हणून घेतली आहेत. त्या महाविद्यालयासाठी त्यांनी ऑर्डिनन्स तयार केले आहेत. कॉलेजसाठी जशी लोकल कमिटी असते तशी कमिटी केली आहे, त्यावर विद्यापीठाच्या प्राधिकरणांचे सदस्य घेतले आहेत. आपणही त्यासाठी ऑर्डिनन्स तयार करावा. तसेच आपल्या या बजेटमध्ये किंवा पुढच्या बजेटमध्ये समाजकार्य महाविद्यालयासाठी तरतूद करावी. आपण त्या महाविद्यालयासाठी ऑर्डिनन्स तयार केले तर त्या महाविद्यालयावर आपला कंट्रोल राहील.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. राम चव्हाण:-**

MSW अभ्यासक्रमाला बाजारपेठेत खूप मागणी आहे. टेक्निकल मुद्दे बाजूला सारून विद्यापीठाने हे महाविद्यालय adopt करावे.

**मा. कुलगुरू:-**

मी आपल्या मताशी सहमत आहे. आपल्या बजेटमध्ये या महाविद्यालयासाठी पाच लाखाची तरतूद करू. तसेच या महाविद्यालयासंदर्भात ऑर्डिनन्स तयार करण्यासाठी समिती गठीत करू.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ४ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संचलित समाजकार्य महाविद्यालय, विद्यापीठ परिसर या महाविद्यालयासंदर्भात ऑर्डिनन्स तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी, असे ठरले.**<br>**१. डॉ. संजय साळुंके, अधिष्ठाता - अध्यक्ष**<br>**२. डॉ. स्मिता अवचार - सदस्य**<br>**३. डॉ. सतीश दांडगे - सदस्य**<br>**४. डॉ. एन. एस. राठी - सदस्य**<br>**५. प्राचार्य डॉ. अशोक पंडित - सदस्य**<br>**६. श्री. संजय निंबाळकर - सदस्य**<br>**७. श्री. कचकुरे कुंडलिक - सदस्य** |

**श्री. सुनिल मगरे:-**

आपण पदभरती केली पाहिजे.

**श्री. संजय निंबाळकर:-**

अहो, शासन आदेशाने भरती बंद आहे.

**डॉ. धामणस्कर:-**

नवीन आकृतिबंद मंजूर होईपर्यंत पदभरती शासनाने बंद केली आहे.

डॉ. स्मिता अवचार यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

विद्यापीठाच्या नॉन-टीचिंगच्या कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया जलद गतीने करण्याबाबत विद्यापीठ कोणती कार्यवाही केली.

उत्तर :-

विद्यापीठातील सरळसेवेची रिक्त असलेली गट-अ ते गट-ड मधील ७६ शिक्षकेतर पदे भरण्यासाठी जाहिरात क्र.आस्था/आरओ/०१/२०१४, दि.२०-०२-२०१४ आणि आस्था/आरओ/ ०२/२०१४, दि. ०१-०३-२०१४ प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | गट | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | आस्था/आरओ/०१/२०१४ | अ | ०७ |
| | | ब | ०४ |
| २ | आस्था/आरओ/०२/२०१४ | क | ५७ |
| | | ड | १८ |

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.४१/ अर्थ-१, दि. ०२ जून, २०१५ अन्वये सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकुण संवर्गाच्या ०४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्यात यावीत असे नमुद आहे. सदर तरतुदीनुसार भरतीसाठी पदे उपलब्ध होत नाहीत. **पदे भरण्यास मान्यता मिळण्यात यावी याबाबत शासनास दि. २२-०५-२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

सदर जाहिरातींच्या अनुषंगाने गट-अ आणि गट-ब मधील अर्जांची प्राथमिक छाणणी पूर्ण झाली आहे. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाने आकृतीबंध अंतिम झाल्याशिवाय पदभरती करण्यात येऊ नये असे निर्देश दिले आहेत.

डॉ. राजाभाऊ करपे यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन कुलसचिव यांनी केले.

विद्यापीठ आस्थापनेवरील कनिष्ठ सहायक पदावर कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी मागील २ ते ३ वर्षापासून वरिष्ठ सहायक पदावर पदोन्नती देण्याची मागणी करत आहेत. वरिष्ठ सहायक पदाच्या जागा रिक्त असताना त्यांची अद्याप पदोन्नती का करण्यात आलेली नाही. शासन आदेश निर्गमित असताना, कोणत्या कारणामुळे संबंधितांच्या पदोन्नत्त्या थांबविल्या आहेत?

शासन नियमान्वये पदोन्नतीबाबतची कार्यवाही सहा महिने अगोदर करणे अपेक्षित आहे, दरवर्षी १ जानेवारीला सेवाज्येष्ठता नियमित करून प्रकाशित करणे अपेक्षित आहे. या कामांना वेळ का लागत आहे. संबंधितांचे होणारे आर्थिक नुकसानीस कोण जबाबदार आहेत?

उत्तर :-

**शासन पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र. ३१२ ए/१६-ब,सामान्य प्रशासन विभाग, दि. २९ डिसेंबर, २०१७ अन्वये** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ वर दिनांक ४-८-२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सुचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

१. या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ संदर्भात दि.३०-१०-२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.०४-०८-२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत देखिल कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दि. २५-०५-२००४ मधील तरतूदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना संदर्भाधिन दि. ०२-११-२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

२. सदर प्रकरणी दि. १५-११-२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०४-०८-२०१७ च्या आदेशास स्थगिती देण्याबाबत परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे दि. २७-१०-२०१७ पासून राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रिया पुर्णपणे ठप्प झाली आहे. मा. उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने सर्वच स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रिया स्थगित न ठेवता, खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विविध प्रशासकीय विभाग तसेच खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ अद्याप प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेता, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. त्या विभागाने दि. २८-१२-२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधनिक अडचण नसल्याचे अभिप्रय दिले आहेत. त्यानुसार **तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत.** अशी कार्यवही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते, दि. २५-०५-२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी.

शासन निर्णय दि. ७ एप्रिल, २०११ नुसार शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधातील विवरणपत्र गट-अ ते गट-ड मधील पदांचे सुधारीत पदनामानुसार अ. क्र. ६ सहायक अधीक्षक हे पद कोणत्याही कारणास्तव रिक्त झाल्यास वरीष्ठ सहायक या पदनामाने भरण्यात यावे. शासन निर्णयातील अ. क्र. ७ क १३२, अ. क्र. ८ क ०३ अशी मंजुर पदे दर्शविण्यात आली आहे. त्यामुळे २८ + १३२ + ३ = १६३ अशी एकुण पदसंख्या आहे. ही सर्व पदे प्रमाण संहिता १९८४ च्या पोट नियम ३ (३) (III) नुसार १००% पदोन्नतीने भरावयाची आहेत.

उपकुलसचिव, आरक्षण कक्ष यांनी दि. ३०-१०-२०१७ च्या पत्रान्वये विद्यापीठातील गट-क संवर्गाचे बिंदु नामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी केली आली असुन मा. सहायक आयुक्त (मावक), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे अंतिम तपासणी करिता दि. १८-०१-२०१८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

सन-२०१७ ची अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्याच्या हेतूने तयार करण्यात आलेली तात्पुरती सेवाजेष्ठता यादी परिपत्रक क्र. आस्था/आरओ/०४/२०१७ अन्वये प्रसिध्द करण्यात येऊन सदर परिपत्रकात कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठता यादीस आक्षेप, यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांच्या आत आस्थापना विभागात सादर करण्याविषयी कळविण्यात आले होती. त्यानुषंगाने कर्मचाऱ्यांनी त्यांचे आक्षेप सादर केले होते. कर्मचाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप आणि अनुषंगिक कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी प्राध्यापक एस. टी. गायकवाड, विभागप्रमुख, रसायनशास्त्र विभाग यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. के. एस. पाथ्रीकर, संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ आणि श्री. एस. एस. कवडे, उपकुलसचिव (स्थानापन्न) यांची समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, प्राध्यापक गायकवाड आणि श्री. कवडे यांनी कामाच्या व्यापामुळे सदर समितीवर कार्य करण्यास असमर्थता दर्शविली होती. तद्नंतर **कुलसचिवांनी प्राप्त आक्षेप विचारात घेऊन सन-२०१७ ची सेवाजेष्ठता यादी दि. १२-०३-२०१८ अंतिम केली आहे. सदर यादी विद्यापीठ संकेतस्थळावर दि. १७-०३-२०१८ रोजी प्रकाशित करण्यात आली आहे.**

**सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडुन बिंदु नामावली नोंदवही प्राप्त झाल्यानंतर पदोन्नतीबाबतची कार्यवाही करण्यात येईल.**

अपने को मावक से १७ मार्च को रजिस्टर आया है। ओपन के प्रमोशन के लिए मावक ने परमिशन दिया है।

**डॉ. राजाभाऊ करपे:-**

उत्तराबद्दल प्रशासनाचे आभार. २०० पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत, म्हणून लवकर प्रमोशन द्या.

**श्री. जितेंद्र देहाडे:-**

पदोन्नतीमध्ये मागासवर्गीयांवर अन्याय होऊ नये, याची काळजी घ्या.

**कुलसचिव:-**

नक्कीच. मावकनेही रोस्टर फायनल किया है। जल्द से जल्द प्रमोशन दिये जायेंगे।

डॉ. राजाभाऊ करपे यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन डॉ. राठी यांनी केले.

विद्यापीठ परिसरातील निवासस्थानात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवासभत्ता (एचआरए) अनुज्ञेय नाही आणि तो पगारपत्रकावरसुद्धा दाखविला जातो. पण सन २०१७ पासून निवासभत्ता कपात तर केला जातो आणि पगारपत्रकावरसुद्धा दर्शविला जातो. ज्यामुळे विद्यापीठ निवासस्थानात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्राप्तीकरातून सुट मिळत नाही. निवासस्थान भत्त्याची पुनर्गणना होत असून मिळत नसलेल्या उत्पन्नाचा कर भरून घेतला जात आहे. यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे?

उत्तर:-

विद्यापीठ निवासस्थानात राहणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकात घरभाडे समाविष्ट होत नाही व शासनाकडून सदर घरभाडे भत्ता प्राप्त होत नाही. करिता विद्यापीठ निवासस्थानात राहणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकात घरभाडे समाविष्ट करण्यात येऊन शासनाकडून घरभाडे भत्ता प्राप्त झाल्यानंतर तो संबंधिताच्या वेतनातून कपात करून विद्यापीठ निधीमध्ये जमा करण्यात यावा. जेणेकरून विद्यापीठ निधीमधून देखभाल, दुरुस्ती करणे सोईस्कर होईल. तसेच शासन निर्णयाप्रमाणे Quarter Rent ऐवजी अनुज्ञप्ती शुल्क (Licence Fees) व Service Charge इत्यादीची आकारणी निवासस्थानाचे क्षेत्रफळ लक्षात घेऊन निवासस्थान वाटप करताना आदेशात नमूद करावे, व त्याप्रमाणे वसुली करण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार दि. २३-१०-२०१७ च्या व्यवस्थापन परिषद बैठकीच्या ठरावानुसार शासनाकडून घरभाडे भत्ता प्राप्त झाल्यानंतर तो संबंधिताच्या वेतनातून कपात करून विद्यापीठ निधीमध्ये जमा करण्यात येतो व तो संबंधिताच्या पगारपत्रकावरसुद्धा दर्शविला जातो. प्राप्तीकर संदर्भात आयकर परतावा दाखल करताना संबंधित कर्मचाऱ्याने पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

ज्या कर्मचाऱ्यांना प्राप्तिकरातून सवलतीसाठी HRA चे प्रमाणपत्र पाहिजे त्यांनी फक्त एक साधा अर्ज केला तरी त्यांना ते देण्यात येईल. नंतर त्यांनी ते claim करावे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. सतीश दांडगे:-**

मी विद्यापीठ क्वॉर्टर्समध्ये गेल्या ११ वर्षात राहिलो आहे, म्हणून मला तेथील अडचणींची बारीक-सारीक माहिती आहे. क्वॉर्टर्ससंदर्भात मला कोणतेही नियम पाळल्याचे जाणवत नाही. शिक्षकांच्या क्वॉर्टर्समध्ये नॉन टीचिंग कर्मचारी राहतात. त्यांना एकाच प्रकारची फॅसिलिटी दिली जाते, त्या फॅसिलिटीसाठी शिक्षकांना जास्त पैसे द्यावे लागतात तर नॉन टीचिंगला कमी पैसे द्यावे लागतात. त्यामुळे एक प्रकारचा वाद शिक्षक व नॉन टीचिंगच्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे. क्वॉर्टर्ससाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. शिक्षकांसाठी असणाऱ्या ग्रीन क्वॉर्टरमध्ये कर्मचाऱ्यांना राहण्याची परवानगी दिली आहे. म्हणून शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून सारख्याच प्रमाणात पैसे घेतल्यास हे वाद कमी होतील. पूर्वी २००२-०३ मध्ये आपल्या विद्यापीठात १०% अतिरिक्त अधिभार स्वीकारला जात होता. परंतु आम्ही इतर विद्यापीठांची माहिती घेतली असता तिथे असा अधिभार घेतला जात नव्हता. आम्ही हे निदर्शनास आणून दिल्यानंतर अधिकचा १०% अधिभार घेणे बंद केले. प्राध्यापक व कर्मचाऱ्यांमध्ये क्वॉर्टर्समध्ये जो एक वाद निर्माण झाला आहे त्यावर उपाय म्हणून यासाठी एक कमिटी नेमण्यात यावी.

**डॉ. राठी:-**

या कमिटीमध्ये इस्टेटचे असावेत, म्हणजे आपल्याला हे वाद सोडवता येतील.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ५ | **विद्यापीठातील शिक्षकांसाठीचे क्वॉर्टर्स फक्त शिक्षकांनाच वाटप करण्यात यावेत, तसेच क्वॉर्टरच्या वाटपासंदर्भात निकष व भाडेनिश्चितीसंदर्भात निकष करण्याकरिता एक समिती गठीत करण्यात यावी. सदरील समितीवर कार्यकारी अभियंता यांचा समावेश करण्यात यावा, असे ठरले.**<br>(सूचक- डॉ. सतीश दांडगे, अनुमोदक- श्री. संजय निंबाळकर) |

**डॉ. फुलचंद सलामपुरे:-**

विद्यापीठ गेटच्या बाजूला ड्रेनेजलाईनची समस्या आहे, ती समस्या सोडवावी.

**मा. कुलगुरू:-**

मी स्वतः आयुक्तांकडे पाठपुरावा करीत आहे. मी त्यांना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु कॉर्पोरेशनकडून अजून काही झाले नाही.

**प्र-कुलगुरू:-**

आपण नवीन पाईपलाईन टाकली आहे.

डॉ. दांडगे सरांच्या प्रश्नाचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

| |
|---|
| विद्यापीठाची किती एकर जमीन इतर संस्थांना दिली. त्यापासून विद्यापीठास व विद्यार्थ्यास काय फायदा होत आहे?<br>उत्तर :-<br>विद्यापीठाच्या एकूण ७२४ एकर २३ गुंठे पैकी १७५ एकर जमीन इतर संस्थांना दिली आहे. त्याचा सविस्तर तपशील सोबत जोडण्यात आला आहे. |

साईला आपण मोठ्या प्रमाणावर जमीन दिली आहे. नायलेट सेंटर, यशवंतराव चव्हाण वसतिगृहाला जागा दिली आहे. साईसोबत आपला MoU आहे. त्यानुसार आपल्या कॉन्फरन्ससाठी, खेळाडू विद्यार्थ्यांसाठी आपल्याला जागा वापरायला भेटते. आपण मागे दहा हजार झाडे तेथे लावली. त्यात त्यांची खूप मदत झाली.

**श्री. सुनिल मगरे:-**

तुम्ही कागदपत्रे का प्रश्नासोबत जोडली नाहीत?

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

ही जागा कोणी दिली? याबद्दल सांगा ना काहीतरी.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. सुनिल मगरे:-**

आपण फक्त तीन इन्स्टिट्यूटसाठी नाही तर अकरा इन्स्टिट्यूटसाठी आपण जागा दिली आहे.

**प्राध्यापक सरवदे:-**

आपण फक्त तीन इन्स्टिट्यूटसाठी मोठ्या प्रमाणावर जागा दिली आहे. बाकी छोट्या-छोट्या जागा दिल्या आहेत.

**डॉ. सतीश दांडगे:-**

विद्यापीठाच्या रेकॉर्डप्रमाणे आपण एकूण १४ संस्थांना जागा दिली आहे. १९८६ पासून आपण जागा द्यायला सुरूवात केली आहे. ७०० एकर पैकी २०० एकर जागा आपण संस्थांना दिली आहे. साई संस्था आपल्याला लवकर हॉस्टेल उपलब्ध करून देत नाहीत, त्यांचे मैदान लवकर वापरायला देत नाहीत. ते आता आंतरराष्ट्रीय दर्जाचा स्वीमिंग पूल व हॉकी ग्राऊंड तयार करीत आहेत. ते आपल्या विद्यार्थ्यांना वापरायला मिळणार आहे का? मला त्याचा काही फायदा आपल्याला होईल असे वाटत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे साईच्या पश्चिमेला असणारे वॉल कंपाऊंड तुटले आहे. त्याकडे साई लक्ष द्यायला तयार नाही. साईला दिलेली रिकामी असलेली २५ एकर जागा पुन्हा आपल्या ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. गोपीनाथ मुंडे अध्यासन केंद्रासाठी १०० एकर जागा दिल्याबाबत आम्हाला पेपरमधून समजले. मग असे आपण करत गेल्यास विद्यापीठाला किती जागा शिल्लक राहील? म्हणून मला आता असे वाटते की, यापुढे कोणत्याही संस्थेस जागा देऊ नये असा ठराव मांडतो.

**श्री. सुनिल मगरे:-**

डॉ. दांडगे सरांच्या ठरावाला माझे अनुमोदन आहे. यापुढे विद्यापीठाची जागा कोणत्याही संस्थेस देऊ नये.

**डॉ. बाबासाहेब कोकाटे:-**

विद्यापीठाच्या जागांचा सातबारा आपल्याकडे आहे का?

**डॉ. सतीश दांडगे:-**

विद्यापीठाच्या काही जागांवर अतिक्रमण झाले आहे. ती अतिक्रमणे ताबडतोब काढावीत.

**डॉ. फुलचंद सलामपुरे:-**

आपण आज ज्या सभागृहात बसलो आहोत ती जागा, म्हणजे मेन बिल्डिंग, सोशिअल सायन्स व परीक्षा विभागाच्या जागेचा सातबारा माझ्या वडिलांच्या नावे आहे. २००९ मध्ये मला माहिती अधिकारातून असे समजले की, पोलिस चौकी अतिक्रमित जागेवर आहे.

साईच्या कमिटीवर आपला एक प्रतिनिधी असावा. मी क्रीडा विभागाशी संबंधित आहे. ते आपल्याला सहकार्य करीत नाहीत, उलट इतर संस्थांपेक्षा आपल्याकडून जास्त मानधन घेतात. म्हणून यावरती आपण काहीतरी निर्णय घ्यावा.

**मा. कुलगुरू:-**

मी डॉ. फुलचंद सलामपुरेंच्या मताशी सहमत आहे. आपण तसा ठराव घेऊ.

| | |
|---|---|
| **विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ६** | **यापुढे कोणत्याही संस्थेस विद्यापीठातील जागा देऊ नये. तसेच विद्यापीठातील साई संस्थेला दिलेली पण तिच्यावर बांधकाम न झालेली रिकामी जागा विद्यापीठाने परत घेण्यासाठी प्रयत्न करावेत, असे ठरले. तसेच साईच्या समितीवर डॉ. फुलचंद सलामपुरे यांना नेमावे, असेही ठरले.**<br>(सूचक- डॉ. सतीश दांडगे, अनुमोदक- श्री. सुनिल मगरे) |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. डोभाळः-**

आपल्या अर्थसंकल्पाच्या पेज क्र. ४७ वर शिऊरबंगला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी साडेसात कोटी रुपये तरतूद केलेली आहे. शिऊरबंगला ऐवजी विद्यापीठ हे सेंट्रल प्लेस आहे. विद्यापीठात एवढा परिसर आहे. म्हणून शिऊरबंगला ऐवजी विद्यापीठातच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू झाले पाहिजे. तसेच त्यात मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी तरतूद केली पाहिजे, अशी माझी नम्र विनंती आहे.

**प्राध्यापक सरवदेः-**

एका संस्थेने शिऊरबंगला येथील जागा विद्यापीठाला डोनेट केली आहे. म्हणून आपण तेथे केंद्र ठेवले आहे.

**डॉ. डोभाळः-**

विद्यार्थ्यांना शिऊरबंगला सोईस्कर आहे की औरंगाबाद?

**श्री. सुनिल मगरेः-**

तिथे खेड्यात कोण जाणार आहे?

**डॉ. बाबासाहेब कोकाटेः-**

शिऊरबंगल्याच्या जमिनीचे दानपत्र कोणाच्या नावावर आहे हे सांगा.

**श्री. सुनिल मगरेः-**

तिथे विद्यार्थी कशाला जातील? इथेच केंद्र करा. त्यासाठी साडेसात कोटी तरतूद कशासाठी?

**मा. कुलगुरूः-**

नाही, ते चुकले आहे. फायनान्स ऑफिसर आकडा चेक करा.

**प्राध्यापक राठीः-**

ते पंचाहत्तर लाख आहे.

**मा. कुलगुरूः-**

मित्रहो, मी सांगू इच्छितो की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासाची सोय व्हावी, ग्रंथालयाची सोय व्हावी, पालकांची सोय व्हावी म्हणून सिनेटचे सदस्य सन्माननीय आ. भाऊसाहेब चिकटगावकर यांनी जागा दिली. आपण हा मुद्दा बजेटवेळी घेऊ.

**डॉ. स्मिता अवचारः-**

साई संस्था हॉस्टेलच्या एका रुमसाठी रु. ७००/- भाडे सांगतात. आपण जागा देऊनही आपल्याला heavy charges आकारले जातात. दुसरी बाब म्हणजे आपण बँक ऑफ महाराष्ट्रला जागा दिली परंतु त्यांच्याकडून आपल्याला सोयी-सवलती मिळत नाहीत. साईच्या कमिटीवर आपला एक प्रतिनिधी असावा.

**प्राध्यापक सरवदेः-**

साईच्या मॅनेजमेंट कमिटीवर आपण डॉ. फुलचंद सलामपुरे यांना आता नेमण्याचे ठरले आहे. त्यांच्याशी केलेला MoU पाहूनच आपण पुढील कार्यवाही करू.

**डॉ. स्मिता अवचारः-**

बँक ऑफ महाराष्ट्रकडून आपल्याला prompt service मिळाली पाहिजे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. राम चव्हाण:-**

विद्यापीठातर्फे बँक ऑफ महाराष्ट्रला तंबी देण्यात यावी, तसेच कर्मचाऱ्यांसाठी एक स्वतंत्र काऊंटर असावे.

**श्री. संजय निंबाळकर:-**

जर ते विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सुविधा देत नसतील तर त्यांना जागा खाली करायला लावा.

**प्राध्यापक सरवदे:-**

डॉ. राठी सरांनी यासंदर्भात दोनदा बँकेला पत्र दिले आहे.

**श्री. पंकज भारसाखळे:-**

साईच्या संस्थेवर विद्यार्थ्यांचा एक प्रतिनिधी असावा.

डॉ. दांडगे सरांच्या दुसऱ्या प्रश्नाचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

विद्यापीठातील प्राध्यापकांचे सीपीएफ अकाऊंट का नाही? त्यांचे सीपीएफ का कपात होत नाही?

उत्तर :-

सी.पी.एफ योजना फक्त कंत्राटदारामार्फत आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना लागू आहे.

**डॉ. सतीश दांडगे:-**

फंड व पूर्ण सॅलरीवर असणाऱ्या प्राध्यापकांचा हा ८ वर्षापासूनचा गंभीर प्रश्न आहे. साधारणतः ही रक्कम ७ कोटी आहे. त्यावर आपल्याला पुन्हा व्याज द्यावे लागेल. बऱ्याच प्राध्यापकांचे अकाऊंट नंबरच आलेले नाहीत. यासंदर्भात लवकरच योग्य ती कार्यवाही व्हावी.

**डॉ. राठी:-**

फंडातील प्राध्यापकांची शासनाने liability घेतली पण त्यासंदर्भात अजून निर्णय झालेला नाही. त्यांनी liability घेतली, पण प्रोसेस अजूनही सुरू आहे. प्राध्यापकाची रक्कम व विद्यापीठाची रक्कम त्यात टाकावी लागेल. EPF account बद्दल व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतला तरच हा प्रश्न सुटू शकेल. EPF ची सर्व legal formality पूर्ण होईपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही.

**डॉ. सतीश दांडगे:-**

मला असे वाटते की प्राध्यापकांकडून आपण EPF ची रक्कम घेऊन, एक हेड ओपन करून त्यात ती रक्कम टाकावी.

**डॉ. धामणस्कर:-**

२००५ नंतर लागलेल्या कर्मचाऱ्यांना DCPS योजना लागू आहे. १०% employee चा वाटा तर १०% employer चा वाटा आहे. आता National Pension Scheme ही पाईपलाईनमध्ये आहे. आता DCPS चालू ठेवायची का NPS ह्यावर अजून निर्णय झालेला नाही. ज्या University Teachers चा वाटा आमच्याकडे आला आहे, त्यांना आम्ही नंबर दिला आहे. ज्यांचे प्रस्ताव आमच्याकडे आले आहेत त्यांचेही अकाऊंट नंबर आम्ही लवकरच देऊ. विद्यापीठातून काही आल्याशिवाय आम्ही काहीच करू शकत नाही.

**कुलसचिव:-**

दांडगे सर, आप जो बात कर रहे है वो फंड में से नियुक्त २८ टीचर्स की बात कर रहे है। उस सिलसिले में तीन साल से गव्हर्नमेंट ने फंड की मान्यता दी है। उनके उपर objection थे उसके उपर डॉ. माळी कमिटी appoint की थी। Government की तरफ से जब ये क्लिअर होगा तब उनका EPF, CAS हो जाएगा।

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. सतीश दांडगे:-**

आपण प्रश्न मार्गी लावला नाही तर ते प्राध्यापक कोर्टामध्ये जातील, म्हणून आताच तयारी केली पाहिजे. आपण जर त्यांना नियमित महिन्याला वेतन देत असू तर त्यांचा हिस्सा बाजूला जमा पाहिजे. हा प्रश्न पुढच्या काळामध्ये गंभीर होऊ नये म्हणून लवकरात लवकर याबाबत कार्यवाही करावी.

**कुलसचिव:-**

उनका नाम सेवार्थ मे add होना जरुरी है। आपके मत से मैं सहमत हूँ। ये मानवाधिकार का उल्लंघन है। इसलिए हमसे पॉझिटिव्ह स्टेप उठाने शुरू है। पर लीगल स्टेटस क्लिअर हुए बगैर EPF कपात करना प्रॉब्लेमॅटिक है। इसलिए हम अविरत प्रयत्न कर रहे है।

**मा. कुलगुरू:-**

आता सहा वाजले आहेत. बैठकीला बाहेरगावाहून आलेल्या महिला सदस्यांना जायचे आहे. माझी आपल्याला नम्र विनंती करतो की, आता बजेटचा विषय घ्यावा.

**श्री. सुनिल मगरे:-**

बजेटसंदर्भात आमचे समाधान झाल्याशिवाय मंजूर करणार नाहीत.

**श्री. रमेश भुतेकर:-**

घाई करू नका. श्री. राहूल म्हस्केंच्या मुद्याबद्दल आधी खुलासा करावा. वाटले तर ही बैठक उद्या घ्या.

**मा. कुलगुरू:-**

माझी दिल्लीला नॅकची मीटिंग आहे. मला उद्या सकाळी ६.३० च्या फ्लाईटने दिल्लीला जायचे आहे. आपल्या विद्यापीठाचे नुकसान नको म्हणून माझी सदस्यांना विनंती आहे की, आज कितीही वेळ लागू द्या, पण आजच बैठक पूर्ण करा.

डॉ. दांडगे सरांच्या चौथ्या प्रश्नाचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

पीएच.डी. व्हायवा-व्होस साठी येणाऱ्या विषयतज्ञास वाहन भत्ता का दिला जात नाही?

उत्तर :-

पीएच.डी. व्हायवा-व्होस साठी येणाऱ्या विषयतज्ञास विहित नियमानुसार प्रवास व दैनंदिन भत्ता तसेच मानधन विद्यापीठामार्फत अदा करण्यात येते.

**प्राध्यापक सरवदे:-**

काही व्यक्तींची बिले साठ-सत्तर हजार रकमेची होती. मागील तीन वर्षात ही पद्धत बंद केली.

**प्र-कुलगुरू:-**

पूर्वी एखादा व्यक्ती दिल्ली, कन्याकुमारी, श्रीनगर येथून आला तर ऐंशी ते नव्वद हजाराचे बिल लावायचा. काहींची बिले लाखात येत होती. म्हणून त्यावेळी सभागृहाने असा निर्णय घेतला होता. त्यामुळे आता महाराष्ट्रातीलच व्यक्तींना व्हायवासाठी बोलवले जाते. म्हणून आता आपण अंतराची मर्यादा ठरवू. आपण सुचविल्याप्रमाणे जाणे-येणे सातशे कि.मी. इतकी मर्यादा ठेवू.

**प्राध्यापक सरवदे:-**

आपण विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीचाही विचार करावा.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

आपण रु. १०,०००/- इतकी मर्यादा ठरवावी.

**मा. कुलगुरू:-**

हो, ठीक आहे.

**डॉ. बी. एम. धोंडगे:-**

पीएच.डी. मार्गदर्शकांना TA/DA मिळाला पाहिजे.

**डॉ. बाबासाहेब कोकाटे:-**

ज्या महाविद्यालयामध्ये रिसर्च सेंटर असेल तेथे पीएच.डी. व्हायवा घेण्याची परवानगी द्यावी.

**प्र-कुलगुरू:-**

जरी आपल्याला असे वाटत असेल तरी गुणवत्तेसोबत तडजोड नको. म्हणून आपण फक्त विद्यापीठ आणि सबसेंटर येथेच पीएच.डी. व्हायवा घेऊ.

**डॉ. डोभाळ:-**

पीएच.डी.चा व्हायवा झाला की लगेच नोटिफिकेशन दिले पाहिजे.

**ॲड. संजय काळबांडे:-**

माझी अशी विनंती आहे की, विधी विद्याशाखेमध्ये पीएच.डी. गाईडची संख्या कमी आहे. त्यावर उपाय करण्यात यावा.

**प्र-कुलगुरू:-**

आरआरसी मध्ये मान्यता मिळाल्याशिवाय गाईडशिप देता येत नाही. म्हणून या सभागृहात याबाबत निर्णय घेता येणार नाही.

**प्र-कुलगुरू:-**

आता आपण बजेट घेऊ.

**श्री. सुनिल मगरे:-**

मी आधीच सांगितले की, बजेट मंजूर होणारच आहे. पण आधी बजेटवर पूर्ण चर्चा तर करू द्या.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

बजेटवर पूर्ण चर्चा व्हायला पाहिजे.

**मा. कुलगुरू:-**

कितीही वेळ लागू द्या, पण बजेटवर पूर्ण चर्चा होईल.

डॉ. फुलचंद सलामपुरे यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन वित्त व लेखा अधिकारी यांनी केले.

| |
|---|
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात वर्ग एक ते चार प्रवर्गातील किती पदे फेब्रुवारी २०१८ अखेरीस रिक्त आहेत. जून २०१३ पासून भरती प्रक्रिया झाली नाही. जून २०१३ ते आजतागायत सर्व प्रकारच्या कंत्राटी कर्मचारी यांच्यावर झालेल्या खर्चाची सविस्तर आकडेवारी द्यावी? |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

उत्तर :-

| अ.क्र. | गट | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | ५४ | २८ | २६ |
| २ | ब | ४७ | ३८ | ०९ |
| ३ | क | ४२७ | २७५ | १५२ |
| ४ | ड | २४९ | १७६ | ७३ |
| | एकुण | ७७७ | ५१७ | २६० |

जून २०१३ ते आजतागायत सर्व प्रकारच्या कंत्राटी कर्मचारी यांच्यावर रु. २०.५५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

**डॉ. फुलचंद सलामपुरे:-**

हा प्रश्न विचारण्याचा माझा उद्देश हा होता की मला विद्यापीठातील कंत्राटींची सविस्तर माहिती पाहिजे होती. कारण मला असे समजले आहे की, जे कर्मचारी कामावरच नाहीत त्यांच्या काल्पनिक नावांनी पगार उचलली जाते.

डॉ. फुलचंद सलामपुरे यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

पदव्युत्तर प्रवेशपूर्व परीक्षा फेब्रुवारी अखेरीस सुरू करण्याचे कारण काय? मागील वर्षी पदव्युत्तर परीक्षेच्या माध्यमाने किती प्रवेश झाले व किती रिक्त होते. याची सविस्तर माहिती देण्यात यावी. आजपर्यंत जाहिरातीवर किती खर्च झाला? २०१७-१८ कॉमन सीईटीचा गोंधळ लक्षात घेता यंदा काय सुधारणा केल्या आहेत?

उत्तर :-

पदव्युत्तर प्रवेशपूर्व परीक्षा (सीईटी) फेब्रुवारी अखेरीस सुरू होत असून सदरील परीक्षा ही दि. १६-०४-२०१८ पासून सुरू होत आहे.

मागील वर्षी पदव्युत्तर परीक्षेच्या मानाने महाविद्यालयात प्रवेशित व रिक्त असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या या विभागाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच, विद्यापीठातील शैक्षणिक विभागाची प्रवेशित व रिक्त असलेली माहिती अद्यापपर्यंत शैक्षणिक विभागाने या कार्यालयास कळविलेली नाही.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ला जाहिरातीवर झालेला खर्च रु. ४,३६,२८४/- इतका आहे.

**प्राध्यापक सरवदे:-**

गेल्यावेळेस सारखा गोंधळ होऊ नये यासाठी अनेक बैठका घेऊन सुधारणा केल्या आहेत. पूर्ण महाराष्ट्रभर सात-आठ पेपरला front page वर आपण जाहिरात दिली आहे. आपण संयुक्त कृती समित्या नेमल्या आहेत. प्राचार्य आणि प्राध्यापकांची प्रत्येक सूचना आम्ही विचारात घेतली आहे. विद्यार्थ्यांसाठी पीजी सेल निर्माण केला आहे. त्यांच्या सोयीसाठी संबंधितांचे संपर्क क्रमांक दिले आहेत.

**श्री. सुनिल मगरे:-**

PG CET साठी अनेक घटकांना बोलवले. अनेक सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पण सतीश पाटील यांनी अट्टहास धरला आणि CET घेतली. CET अनिवार्य असल्याबद्दल युजीसीच्या गाईडलाईन्स आहेत असे सांगण्यात आले होते. परंतु माझ्या माहितीप्रमाणे जळगाव, नांदेड विद्यापीठात CET घेतली जात नाही. इथल्या गरीब विद्यार्थ्यांची स्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे. यावर लक्ष न दिल्यामुळे गेल्यावेळेस PG CET चा बोजवारा उडाला. गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागला. त्यामुळे विद्यापीठाची प्रतिमा मलीन झाली. CET द्वारे सगळ्या जागा भरल्या गेल्या नाहीत, अनेक जागा रिक्त राहिल्या. सायन्स अभ्यासक्रमासाठी CET समजू शकतो पण मराठी, इंग्रजी सारख्या विषयासाठी CET कशासाठी? आपण जाहिरातीवर प्रचंड खर्च केला तोच पैसा जर वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी खर्च केला असता तर चांगले झाले असते. सोळा लाख जाहिरातीवर खर्च झाले याचा मी जाहीर निषेध करतो. ग्रामीण भागातील महाविद्यालयांसाठी CET घेऊ नये, असा मी ठराव मांडतो.

**डॉ. फुलचंद सलामपुरे:-**

या ठरावाला माझे पूर्ण अनुमोदन आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

**श्री. संजय निंबाळकर:-**

एक वस्तुस्थिती अशी आहे की, ते विद्यार्थ्यांकडून डोनेशन घेतात. CET बंधनकारक असेल तर जरूर घ्या. इतर विद्यापीठात CET घेतली जाते का हे पहावे.

**डॉ. जयसिंग देशमुख:-**

Intake capacity पेक्षा जास्त demand असेल तरच CET घ्यायला हरकत नाही. Intake capacity पूर्ण होत नसेल तर CET ची गरजच काय? पुण्यातही CET घेतली जात नाही. CET मुळे ग्रामीण भागातील मुली शिक्षणापासून दूर राहतील. विद्यापीठ विभागासाठी CET पाहिजे तर घ्या. पण ॲफिलिएटेड महाविद्यालयांना CET नको.

**श्री. संजय निंबाळकर:-**

उमरग्यासारख्या दूरवर ग्रामीण भागात जेथे पीजी सेंटर आहे तेथे डोनेशन घेतले जाते. त्याचे काय?

**श्री. संभाजी भोसले:-**

जाहिरातीवर एवढा खर्च का?

**डॉ. गोविंद काळे:-**

Science ला CET असावी, Social Science ला CET नको. १९९३ ला मलासुद्धा डोनेशन द्यावे लागले होते. त्यावेळेस तशी परिस्थिती होती तर आतासुद्धा तशीच परिस्थिती असेल. हे वास्तव आहे.

**ॲड. संजय काळबांडे:-**

१२ वी पासनंतर पाचवर्षीय कोर्सेसला CET ची गरज काय?

**प्राध्यापक सरवदे:-**

फक्त PG कोर्सेसला CET आहे. १२ वी नंतरच्या कोर्सेसला CET नाही.

**कुलसचिव:-**

१२ वी के बाद प्री-लॉ के लिए Government of Maharashtra ही CET ले रहा है। अपना विद्यापीठ नही लेता है।

**ॲड. संजय काळबांडे:-**

पण त्याची डिग्री तर विद्यापीठ देते. सरकार जर चुकत असेल तर विद्यापीठाने सरकारला कळविले पाहिजे.

**प्राध्यापक सरवदे:-**

दि. ११ जानेवारी २०१७ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात असे म्हटले आहे की, स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारावर प्रवेश देण्यात येतील. मागासवर्गीयावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये, खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांची पिळवणूक होऊ नये असा उद्देश आहे. आपण फक्त रु. २००/- ओपनसाठी, रु. १००/- मागास वर्गासाठी फीस घेतली जाते. आपण जिल्हानिहाय सात-आठ परीक्षा केंद्रे देणार आहोत. ग्रामीण भागासाठी परीक्षा केंद्र असणार आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारी आल्यास आम्ही लगेच ऑनलाईन उत्तर देत आहोत.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. सुनिल मगरे:-**

महाराष्ट्र शासन राजपत्रात केंद्रीय पद्धतीने CET घ्यावी असा उल्लेख कुठेच नाही. गोरगरीब विद्यार्थ्यांना तुम्ही वेठीस धरू नका.

**प्राध्यापक सरवदे:-**

डोनेशन घेतल्याच्या तक्रारी डिसेंपरपर्यंत आपल्याकडे आल्या आहेत.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

CET घेतल्यामुळे डोनेशन घेतले गेले नाही असे विद्यापीठ खात्रीने सांगू शकते का? Intake capacity व demand बघून CET घ्यावी.

**प्राध्यापक सरवदे:-**

चार महाविद्यालयांनी डोनेशन घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आपण त्यांना नोटीस पाठविल्या. तरी काही झाले नाही. आपण फक्त रु. १००/-, रु. ५०/- असे शुल्क घेतो. प्राचार्यांना विश्वासात घेऊन विद्यापीठाने निर्णय घेतला आहे. प्राचार्यांनीच सांगितले आहे की, ऑनलाईन CET घ्या.

**डॉ. अशोक पंडित:-**

CET घेणे compulsory आहे असे आपण सांगितले म्हणून प्राचार्य तयार झाले. आजही ५० टक्क्यापेक्षा जास्त जागा रिक्त आहेत.

**मा. कुलगुरू:-**

शैक्षणिक गुणवत्ता टिकवणे आपली जबाबदारी आहे. जगाच्या तुलनेत आपल्या विद्यापीठाचे मेरिट खूप खालचे आहे. बऱ्याच ठिकाणी कॉपी चालते.

**श्री. रमेश भुतेकर:-**

आमच्या कॉलेजला कॉपी नाही चालत.

**मा. कुलगुरू:-**

आपले महाविद्यालय आदर्श आहे, पण सगळे महाविद्यालये तसे नाहीत. नॅकचा criteria आहे की, तुम्ही entrance घेता की नाही? त्याला मार्क आहेत. CET न घेणे म्हणजे पायावर धोंडा पाडणे ठरेल. विद्यापीठाचे स्टँडर्ड वाढवण्यासाठी हे आवश्यक आहे. आपण विद्यार्थ्यांना चॉईस दिला आहे. याला प्राचार्यांचा पाठिंबा आहे. मागच्या वेळेस ज्या चुका झाल्या त्या चुका आता पुन्हा होणार नाहीत.

**श्री. सुनिल मगरे:-**

विद्यापीठ विभागात CET घ्यायला आम्ही सगळे तयार आहोत. Social Science व Law ला CET नको.

**मा. कुलगुरू:-**

आपण जिथे PG सेंटर आहे तेथेच आपण CET घेणार आहोत.

**डॉ. लक्ष्मीकांत शिंदे:-**

जाहिरातीवरचा खर्च कमी करावा.

डॉ. गोविंद काळे यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्र-कुलगुरू यांनी केले.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

१९९१ ते २००० दरम्यानच्या बिगर नेट, सेट प्राध्यापकांची सर्वोच्च न्यायालयात सिव्हील अपील क्रमांक १०७५९/२०१३ या याचिकेला सर्व याचिका टॅग झालेल्या आहेत. आपल्या विद्यापीठाअंतर्गत ज्या प्राध्यापकांच्या याचिका दाखल झालेल्या आहेत त्या प्रत्येक याचिकेसाठी विद्यापीठाचे विधिज्ञ म्हणून कोणाची नियुक्ती केली आहे? या सर्व याचिकेबाबत शपथपत्र दाखल केले आहे का? शपथपत्र दाखल केले नसेल तर ते केव्हापर्यंत दाखल करणार?

उत्तर:-

विधिज्ञ एस. एस. चौधरी यांची सदर प्रकरणी विद्यापीठातर्फे नियुक्ती करण्यात आलेली आहे. विद्यापीठातर्फे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी विद्यापीठ नाममात्र (Formal) पार्टी आहे. त्यामुळे आवश्कतेनुसार शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. गोविंद काळे:-**

सन्माननीय अध्यक्ष महोदय, हा अत्यंत गंभीर विषय आहे. महाराष्ट्रात जवळपास ५७०० affected प्राध्यापक आहेत. आपल्या विद्यापीठाअंतर्गत ८३५ affected प्राध्यापकांची संख्या आहे. आपण उत्तरात वापरलेला (formal) नाममात्र पार्टी हा शब्द चुकीचा आहे, तो शब्द वगळावा व विद्यापीठ या याचिकेतली महत्त्वाची (main) पार्टी आहे असा शब्दप्रयोग करावा.

**कुलसचिवः-**

हम direct लिटिगेटेड पार्टी नही है। जो डायरेक्ट पार्टी नही है उसे formal पार्टी बोलते है।

**डॉ. गोविंद काळे:-**

मॅडमजी, या प्रश्नासाठी आम्ही १९९८ पासून आजपर्यंत विद्यापीठ, युजीसी व शासनाकडे सतत संघर्ष करून हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करत आहोत. ५ मे २००८ मध्ये विद्यापीठाकडून प्रत्येकाचे ११ प्रतीमध्ये exemention साठीचे प्रस्ताव युजीसीकडे दाखल करण्यात आले. नेट/सेट संघर्ष समितीच्या माध्यमातून युजीसीकडे पाठपुरावा करून महाराष्ट्रामध्ये पहिलयांदा आपल्या विद्यापीठाकडून पाठवलेल्या प्रस्तावाबाबत युजीसीने नेट/ सेट मधून विनाअट सुट देण्याचा निर्णय दि. ४ नोव्हेंबर २००८ मध्ये घेतला. युजीसीकडून विनाअट सुट आल्यानंतर तत्कालीन कुलगुरू मा. कोतापल्ले सरांनी संबंधित प्राध्यापकांच्या सेवा नियुक्तीदिनांकापासून नियमित केल्या. संबंधित प्राध्यापकांना कॅस कमिटी विद्यापीठे देऊ केली. कॅसअंतर्गत संबंधित प्राध्यापकांना विद्यापीठ व शासनाच्या प्रतिनिधींनी वरिष्ठ व निवड श्रेणी देण्याची शिफारस केली. विद्यापीठाने संबंधित प्राध्यापकांना कॅसअंतर्गत वरिष्ठ व निवड श्रेणी लागू केल्याचे approval सहसंचालकांना दिले. सहसंचालकांनी वेतननिश्चिती करण्यास नकार दिल्यानंतर नेट/सेट संघर्ष समितीच्या उपाध्यक्ष प्रा. आशा बीडकर व इतर यांच्या माध्यमातून मा. उच्च न्यायालयात २०१० मध्ये याचिका दाखल केली. मा. उच्च न्यायालयात २०१० ते २०१३ दरम्यान युजीसीने व आपल्या विद्यापीठाने प्राध्यापकांच्या बाजूने शपथपत्र दाखल केले. अखेर ६५ तारखा होऊन १ ऑगस्ट २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाने प्राध्यापकांची बाजू मान्य करून "विद्यापीठाने ज्या तारखेपासून सेवा नियमित करून वरिष्ठ व निवड श्रेणीचे लाभ देऊ केलेले आहेत, त्या तारखेपासून शासनाने याचिकाकर्त्या प्राध्यापकांची वेतननिश्चिती करून फरकाची देय रक्कम ६% व्याजासहित तीन महिन्याच्या आत देण्यात यावे असा आदेश दिला."

नेट/सेट संघर्ष समितीच्या माध्यमातून १९९८ ते २०१३ असे तब्बल १५ वर्षे सतत विद्यापीठ, युजीसी व शेवटी मा. न्यायालयाचे ६५ खेटे मारुन अथक परिश्रमाने हे यश मिळवले होते. परंतु आम्हीच निवडून दिलेले शिक्षक व पदवीधर आमदारांनी शासनाकडे आमची वकिली न करता केवळ श्रेयासाठी मंत्रालयातील प्रशासकीय मंडळींना हाताशी धरून मिटत आलेला प्रश्न पुन्हा चिघळवला. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात तत्कालीन आघाडी शासनाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १८ नोव्हेंबर २०१३ रोजी शासनाची याचिका दाखल करून घेत प्राध्यापकांच्या बाजूने अंतरिम आदेश दिला. मा. सर्वोच्च न्यायालय अंतरिम आदेश येऊन दोन वर्षे झाले तरी तत्कालीन आघाडी शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाची अंमलबजावणी केली नाही म्हणून आम्ही मा. सर्वोच्च न्यायालयात दि. ११ मे २०१५ रोजी IA दाखल केला. या अर्जाची दखल घेत दि. १ सप्टेंबर २०१५ रोजी पुन्हा मा. सर्वोच्च न्यायालयाने शासनाचा खरपूस समाचार घेत अंतरिम आदेश दिला की, "जे प्राध्यापक नेट/ सेट

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

पास नाहीत परंतु त्यांनी कमीत कमी सहा वर्षे सेवा पूर्ण केलेली असेल अशा प्राध्यापकांना कॅसअंतर्गत वेतननिश्चितीचे फायदे देण्यात यावेत" या आदेशानुसार शासनाने २१ सप्टेंबर २०१५ रोजी परिपत्रक काढून याचिकाकर्त्या प्राध्यापकांची सेवा नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरून वेतननिश्चितीचे लाभ द्यावेत असा आदेश सहसंचालकांना दिला. यानुसार विभागीय सहसंचालकांनी याचिकाकर्त्या प्राध्यापकांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरून वेतननिश्चिती करून सप्टेंबर २०१५ पासून वाढीव वेतन देऊ केलेले आहे.

मा. कुलगुरू महोदयांना विनंती की, सौ. आशा बीडकर व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन या याचिकेमध्ये जे शपथपत्र उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले आहे तसेच शपथपत्र मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये आपल्या विद्यापीठाअंतर्गत जेवढ्या याचिका आहेत त्या सर्व याचिकेसाठी विधिज्ञ द्यावे व शपथपत्र दाखल करावे.

**प्र-कुलगुरू:-**

मीसुद्धा या प्रश्नावर लक्ष देऊन आहे.

**डॉ. राम चव्हाण:-**

या प्रश्नावर सकारात्मक विचार प्रशासनाने करावा.

**कुलसचिव:-**

आम्ही सकारात्मक आहोत.

**प्र-कुलगुरू:-**

यासाठी आपण सीनिअर कौन्सिलर देऊ.

**डॉ. गोविंद काळे:-**

केव्हापर्यंत? याबाबत लवकर पावले उचलली पाहिजेत. आपल्याकडे जेवढ्या याचिका असतील त्या एकत्र करून शपथपत्र सादर करावे. आपण नेमलेल्या सीनिअर कौन्सिलरशी आम्हाला एकदा चर्चा करू द्या.

**प्राध्यापक सरवदे:-**

सर्व Science व Commerce अभ्यासक्रमासाठी CET घेण्यात येईल. बाकी कोर्सेस आणि डिप्लोमाला CET घेतली जाणार नाही.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ७ | **विज्ञान विद्याशाखेशी संबंधित सर्व अभ्यासक्रम आणि वाणिज्य विद्याशाखेशी संबंधित सर्व अभ्यासक्रम यासाठी पदव्युत्तर प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात यावी. तसेच इतर अभ्यासक्रम आणि डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर प्रवेशपूर्व परीक्षा घेऊ नये, असे ठरले.**<br>(सूचक- श्री. सुनिल मगरे, अनुमोदक- डॉ. फुलचंद सलामपुरे) |

श्री. जितेंद्र देहाडे यांच्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्राध्यापक सरवदे यांनी केले.

| |
|---|
| विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी जी प्रवेशपूर्व परीक्षा (सीईटी) घेण्यात येते त्यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांची पिळवणूक होत आहे असे वाटते. तेव्हा सीईटी घेणे व विद्यापीठाचा पैसा व्यर्थ खर्च करणे संयुक्तिक आहे काय?<br>उत्तर :-<br>याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील प्रकरण आठ मधील मुद्दा क्र. ८६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रवेशपूर्व परीक्षा सर्व विद्यापीठांना बंधनकारक केल्यामुळे सी.ई.टी. घेणे विद्यापीठ प्रशासनास बंधनकारक आहे. |
| स्व. विलासरावजी देशमुख अध्यासन केंद्र उभारण्याच्या प्रस्तावास दि. २६-०३-२०१६ रोजी च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने पुढे काय कार्यवाही झाली.<br>उत्तर :-<br>लोकनेते स्व. विलासरावजी देशमुख अध्यासन केंद्र उभारण्यास दि. २६-०३-२०१६ रोजी संपन्न झालेल्या |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| |
|---|
| व्यवस्थापन परिषदेने तत्त्वतः मान्यता दिलेली आहे.<br>तसेच जागा व इतर सुविधा यासंदर्भात समिती गठीत करण्यात येईल व सदर समिती याबाबत अहवाल देईल असा निर्णय पारीत करण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याची कार्यवाही चालू आहे. |

**श्री. जितेंद्र देहाडेः-**

सर्वप्रथम मी व्यवस्थापन परिषदेचे आभार मानतो कारण त्यांनी विलासराव देशमुख अध्यासन केंद्राची तरतूद केली. स्व. विलासराव यांनी शैक्षणिक तसेच अनेक क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. त्यांनी सरपंच ते मुख्यमंत्री असा प्रवास केला आहे. त्यांचे मराठवाड्यावर विशेष प्रेम होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून आपल्या विद्यापीठाने साहेबांना डी.लिट. देऊन गौरविले. विमानतळ, विभागीय क्रीडा संकुल, संत तुकाराम नाट्यगृह हे काम त्यांच्यामुळेच झाले. आपल्या बजेटमध्ये विलासराव देशमुख अध्यासन केंद्रासाठी बजेटमध्ये निधीची तरतूद करावी. गोपीनाथ मुंडे साहेबांच्या संस्थेला जी जागा दिली जाणार आहे त्याच जागेत विलासरावांच्या नावाने अध्यासन केंद्र असावे, कारण ह्या दोघांची खूप मैत्री होती. या दोन संस्थांसाठी निधी आणण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवावी, सोबत २-३ सदस्य द्यावेत, धन्यवाद!

**श्री. नरहरी शिवपुरेः-**

ग्रामीण संशोधनावर भर द्यावा. शहरी व ग्रामीण दरी दूर करावी. श्री. देहाडे यांनी सांगितल्याप्रमाणे निधी पाठपुराव्याचा मी ठराव मांडतो.

**डॉ. गोविंद काळेः-**

याला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. डोभाळः-**

गोपीनाथ मुंडे केंद्रासाठी १५० कोटी निधीसाठी आमदार श्री. सतीश चव्हाण व आमदार श्री. धनंजय मुंडे यांनी मागणी केली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडतो.

**डॉ. गोविंद काळेः-**

माझे अनुमोदन आहे.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ८ | **स्व. गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण संशोधन केंद्रासाठी शासन स्तरावरून १५० कोटी निधी मान्य करण्यासाठी मा. आ. श्री. सतीश चव्हाण व मा. आ. श्री. धनंजय मुंडे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला व शासनाने निधी देण्याचे मान्य केले, याबद्दल या दोघांचेही अभिनंदन करण्यात यावे, असे ठरले.**<br>(सूचक- डॉ. डोभाळ, अनुमोदक- डॉ. गोविंद काळे) |

**डॉ. नरेंद्र काळेः-**

आद्यकवी मुकुंदराज यांच्या नावे अंबाजोगाई येथील एखाद्या महाविद्यालयात अध्यासन केंद्र सुरू करावे.

**डॉ. एम. बी. धोंडगेः-**

याला माझे अनुमोदन आहे.

**श्री. गोविंद देशमुखः-**

याला माझेही अनुमोदन आहे.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ९ | **अंबाजोगाई येथे एखाद्या महाविद्यालयात आद्यकवी मुकुंदराज यांच्या नावे अध्यासन केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.**<br>(सूचक- डॉ. नरेंद्र काळे, अनुमोदक- प्रा. डॉ. एम. बी. धोंडगे, श्री. गोविंद देशमुख) |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. कमलाकर कांबळे:-**

अंबाजोगाई येथे मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करण्यात यावे, असा मी ठराव मांडतो.

**डॉ. नरेंद्र काळे:-**

माझे अनुमोदन आहे.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. १० | **अंबाजोगाई येथे मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करण्यात यावे, यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले.** (सूचक- डॉ. कमलाकर कांबळे, अनुमोदक- डॉ. नरेंद्र काळे) |

**श्री. रमेश भुतेकर:-**

रघुवीर जादूगरची मला आज सभागृहात आठवण होतेय कारण आज सकाळपासून श्री. राहूल म्हस्के यांच्या प्रकरणी खुलासा देऊ असे म्हटले पण अजून संध्याकाळ झाली तरीही काहीही कार्यवाही केली नाही.

**मा. कुलगुरू:-**

डॉ. सतीश पाटील यांनी लेखी खुलासा सादर केला आहे. त्यांनी कळविले आहे की, दि. १९-०३-२०१८ रोजी श्री. राहूल म्हस्के यांनी त्यांना दि. २० च्या अधिसभा बैठकीस उपस्थित राहण्याची परवानगी मागितली. त्यांनी श्री. म्हस्के यांना असे कळविले की, मानव संसाधन केंद्राच्या नियमानुसार त्यांना बैठकीस हजर राहण्यास हरकत नाही. सदर प्रकरणी त्यांनी रजेचा अर्ज केल्याचे संचालकांकडे केल्याचे मला माहिती नव्हते. रजा मंजुरीचे अधिकार संचालकांनाच आहेत, या प्रकरणी त्यांनी कोणतेही गैरभाष्य केलेले नाही असे कळविले आहे.

**श्री. राहूल म्हस्के:-**

मी कार्यालयास पत्र दिले, पण त्यांना माहित नाही, असे कसे?

**श्री. सुनिल मगरे:-**

पाटील सरांना समज द्यावी.

**श्री. राहूल म्हस्के:-**

Business चा अर्थ काय? आम्ही येथे कोणते खोटे धंदे करायला येतो?

**श्री. संजय गायकवाड:-**

पाटील सरांना संबंधित पदावरून हटवा.

**मा. कुलगुरू:-**

मग समिती नेमायची का?

**श्री. संजय निंबाळकर:-**

नको सर, तुम्हीच निर्णय घ्या.

डॉ. गोविंद काळे यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्र-कुलगुरू यांनी केले.

अ) रुसा अंतर्गत युजीसीकडून १२० कोटी प्राप्त निधी पैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबादसाठी किती कोटी रुपये निधी दिला आहे?

उत्तर:-

रुसाकडून १२० कोटी निधीची फक्त तरतूद झालेली आहे. अद्याप रुसाकडून कुठलाही निधी प्राप्त झालेला नाही. तसेच रुसाअंतर्गत १२० कोटी तरतूद निधीपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबादसाठी कुठलाही विशेष उल्लेख नाही.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद परिसरामध्ये नियोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यासाठी निधी वाढवावा व पुतळा उभारण्यासाठी पुतळा उभारणी समिती गठीत करावी.
उत्तर:-
अर्थसंकल्प २०१८-१९ मध्ये नियोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यासाठी रु. ४० लक्ष निधी प्रस्तावित केलेला आहे.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

आतापर्यंत रुसाचे किती पैसे आले? विद्यापीठाने कोणकोणते प्रपोजल युजीसीला पाठवले? १६ कोटी आले की २० कोटी आले?

**प्र-कुलगुरू:-**

आता आलेले १० कोटी वेगळे आहेत, पूर्वी आलेले वेगळे आहेत.

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

रुसाचे जे पैसे आले, equipment च्या purchase committee वरील तीन लोकांनी राजीनामे का दिले?

श्री. देहाडे यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन प्र-कुलगुरू यांनी केले.

ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद परिसरामध्ये नियोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यासाठी निधी वाढवावा व पुतळा उभारण्यासाठी पुतळा उभारणी समिती गठीत करावी.
उत्तर:-
अर्थसंकल्प २०१८-१९ मध्ये नियोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यासाठी रु. ४० लक्ष निधी प्रस्तावित केलेला आहे.

**डॉ. गोविंद काळे:-**

शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी किमान एक कोटी निधी तरतूद करावा, अशी माझी विनंती आहे. त्यासंदर्भात समिती गठीत करून लवकरात लवकर पावले उचलावीत.

**ॲड. विजय सुबुकडे:-**

आपण शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची जागा निश्चित केली आहे का? शिवाजी महाराज आपल्या सगळ्यांचे दैवत आहे. मध्यंतरी पुतळा प्रकरणावरून खूप गोंधळ झाला होता. चाळीस लाखामध्ये शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा शक्य नाही म्हणून निधी वाढवावा व लवकरात लवकर विद्यापीठात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात यावा.

**श्री. दानवे:-**

जर विद्यापीठात पुतळ्यासाठी जागा निश्चित केली असेल तर किती जागा निश्चित केली आहे? जागा acquire केली आहे का? याची माहिती द्यावी.

**डॉ. राजाभाऊ करपे:-**

शिवाजी महाराजांचा पुतळा प्रकरणावरून एका कर्तबगार अधिकाऱ्याचा बळी घेतला, त्यांना निलंबित केले. सहा- सात महिन्यापेक्षा अधिक काळ निलंबित कर्मचाऱ्यांना कामावर घ्या. आधीच विद्यापीठात तीनशे जागा रिक्त आहेत, म्हणून कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण आहे. निलंबित कर्मचाऱ्यांना घरी बसून ७५% पगार देण्यापेक्षा कामावर घ्या. वेरुळ हे शिवाजी महाराजांच्या आजोबांची ही भूमी आहे. म्हणून विद्यापीठात शिवाजी महाराजांचा पुतळा झालाच पाहिजे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. सुनिल मगरे:-**

डॉ. करपे सरांनी मांडलेल्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**श्री. संभाजी भोसले:-**

शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीकडे आजपर्यंत मुद्दाम दुर्लक्ष केले आहे. शिवाजी महाराजांचा पुतळा लवकरात लवकर उभारावा, अशी आमची विनंती आहे. तशीच माझी सभागृहाला विनंती आहे की, पीआरओ संजय शिंदे यांचे निलंबन मागे घ्यावे.

**ॲड. संजय काळबांडे:-**

माझेही अनुमोदन आहे. पुतळा लवकरात लवकर उभारावा.

**मा. कुलगुरू:-**

मला ठराव मान्य आहे.

| | |
|---|---|
| **विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. ११** | **छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासाठी रु. ४० लक्ष ऐवजी रु. १ कोटी इतकी तरतूद करण्यात यावी, असे ठरले.**<br>(सूचक- श्री. गोविंद काळे, अनुमोदक- श्री. संजय काळबांडे) |

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

पुतळा उभारणीसाठी टाईम लिमिट द्या. पूर्वी आम्ही कमिटीत असताना रात्रंदिवस काम केले होते. पुतळा उभारणीसाठी अनेक प्रकारच्या परवानग्या लागतात.

**डॉ. गोविंद काळे:-**

आमदार श्री. अतुल सावे हे कमिटीत असल्याने शासनाकडे पाठपुरावा सोपे होईल.

**डॉ. फुलचंद सलामपुरे:-**

पूर्वीच्या समितीतील काही नावे वगळा.

**ॲड. विजय सुबुकडे:-**

मला आमदारांबद्दल आदर आहे, पण त्यांनी आतापर्यंत पुतळा उभारणीसाठी किती वेळ दिला?

**प्र-कुलगुरू:-**

एकदा नेमलेले सदस्य पुन्हा काढणे शक्य नाही.

**श्री. दानवे:-**

मी स्वत: पुढाकार घेऊन एक वर्षात काम करतो.

**मा. कुलगुरू:-**

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. १२ | **छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीसंदर्भात पूर्वी गठीत केलेल्या समितीत खालील नवीन सदस्यांचाही समावेश करण्यात यावा, असे ठरले.**<br>**१. श्री. भास्करराव दानवे**<br>**२. श्री. सुनील मगरे**<br>**३. डॉ. गोविंद काळे**<br>**४. श्री. संजय गायकवाड**<br>**५. ॲड. विजय सुबुकडे** |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | |
|---|---|
| | ६. श्री. जितेंद्र देहाडे<br>७. श्री. कपील आकात<br>८. श्री. संभाजी भोसले |

**श्री. सुनिल मगरे:-**

PRO हा एक नागरिक आहे, त्याला मत मांडण्याचा अधिकार आहे. त्याचे निलंबन मागे घ्या.

**श्री. संभाजी भोसले:-**

तुम्ही बोरीकर, गौरशेटे यांचे निलंबन मागे घेतले, मग PRO आणि डॉ. चव्हाण यांनी काय गंभीर गुन्हा केला आहे? त्यांचेही निलंबन मागे घ्या.

**मा. कुलगुरू:-**

शिंदेबद्दल मला काही अडचण नाही, पण डॉ. चव्हाण यांच्याबद्दल शासनाचे पत्र आले आहे. त्या पत्राचा विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. राम चव्हाण:-**

डॉ. बी. एल. चव्हाण यांनी काही मोठा गुन्हा केला नाही. त्यांच्यावर झालेली कार्यवाही ही एका माजी अधिकाऱ्याने वैयक्तिक आकसातून केलेली आहे.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय<br>ऐनवेळी संमत<br>ठराव क्र. १३ | **विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्री. संजय शिंदे यांचे निलंबन मागे घेण्यात यावे, असे ठरले.**<br>(सूचक- डॉ. राजेश करपे, अनुमोदक- श्री. संभाजी भोसले) |

**श्री. भाऊसाहेब राजळे:-**

बजेट उद्या घेऊ. मला सविस्तर बोलायचे आहे.

**मा. कुलगुरू:-**

बजेट आता घेऊ, उद्या नको.

**ॲड. विजय सुबुकडे:-**

आता बजेटवर चर्चा घ्या.

**श्री. संभाजी भोसले:-**

आताच भाऊसाहेब सभागृहाबाहेर गेले, त्यांना बजेटवर बोलायचे होते.

**श्री. संजय निंबाळकर:-**

बजेट महत्त्वाचा विषय असल्याने माझी मा. अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की, आताच बजेटवर चर्चा घ्यावी.

**श्रीमती सुनंदा सरवदे:-**

४६४ कंत्राटी कर्मचारी विद्यापीठात चांगल्या पद्धतीने काम करीत आहेत. परंतु तुटपुंज्या पगारात त्यांचे भागत नाही. जसे तुम्ही विद्यापीठ फंडातील शिक्षकांचे दायित्व स्वीकारले तसेच कंत्राटी कामगारांचेही दायित्व स्वीकारावे. कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी वाहनव्यवस्था पुरवावी, तसेच विद्यापीठातील स्पीड ब्रेकर काढावेत.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**कुलसचिव:-**

मॅनेजमेंट कौन्सिल मे स्पीड ब्रेकर निकालने का निर्णय हुआ है। कुछ स्पीड ब्रेकर निकाले है। वाहनव्यवस्था का आपका सुझाव अच्छा है। इसके बारे मे पॉझिटिव्ह विचार किया जायेगा। मॅडम, कंत्राटी कामगारों को देखकर मेरी आँखो से पानी आता है। हम १००% कंत्राटी कर्मचारियों का प्रश्न मार्गी लगाने की कोशिश करेंगे। हम सकारात्मक निर्णय लेंगे।

**श्री. सुनिल मगरे:-**

परमनंट कर्मचारी कमी आणि कंत्राटी कर्मचारी जास्त आहेत. ते परमनंटपेक्षा जास्त काम करतात. पण त्यांना वेतन अतिशय कमी आहे. यावर काहीतरी उपाय करा.

**श्रीमती सुनंदा सरवदे:-**

कंत्राटी कर्मचाऱ्यांना फंडातून घ्या.

**डॉ. बाबासाहेब कोकाटे:-**

सेवानिवृत्त कर्मचारी काढा, कंत्राटींचे वेतन वाढवा.

**मा. कुलगुरू:-**

आपण मिनिमम वेजेस देतो. एक दिवस आपल्याकडे पगार देण्यासाठी पैसे राहणार नाहीत. विद्यापीठ फंडावर प्रचंड बोजा आहे. सगळ्यांनाच घेऊन जमणार नाही, Qualified आहे त्यांनाच घेऊ.

**श्रीमती सुनंदा सरवदे:-**

शिक्षकांना फंडातून इतके वेतन दिले जाते, मग नॉन टीचिंगबद्दल दुजाभाव का?

**मा. कुलगुरू:-**

जाहिरातीत qualified लोकांना आपण नक्की घेऊ.

**श्री. संभाजी भोसले:-**

उपपरिसर येथे बदल्या केलेले कर्मचारी, अधिकारी तेथे पूर्णवेळ काम करीत नाहीत. संचालक डॉ. अरुण खरात यांची निवड दिल्ली येथील विद्यापीठात झाल्यानंतर डॉ. जयसिंगराव देशमुख यांची नियुक्ती केली. तीन महिने त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने काम केले, तेथे शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. पण डॉ. देशमुख यांना कोणतीही पूर्वसूचना न देता दि. २७-१२-२०१७ रोजी विद्यापीठाकडून डॉ. अनार साळुंके यांना उपपरिसराचा संचालक पदाचा कार्यभार सोपविला. डॉ. देशमुख यांना साधा फोन करूनही सांगितले नाही. त्यांना अवमानकारक पद्धतीने पदावरून हटविले. डॉ. अनार साळुंके यांचा मी वैयक्तिक पातळीवर आदर करतो. परंतु त्या उपपरिसराला वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे उपपरिसराच्या विकासासाठी वेळ देणाऱ्या योग्य व्यक्तीची संचालकपदी नियुक्ती करावी.

**श्री. संजय निंबाळकर:-**

या विषयावर सभागृहात चर्चा होणेही योग्य नाही. संचालक नेमणे, काढणे हा विषय कुलगुरूंचा आहे.

**श्री. सुनिल मगरे:-**

मागच्या पाच-सहा महिन्यात याला काढा, त्याला बसवा असा कारभार सुरू आहे. अध्यासन केंद्राचेही संचालक बदलले, कोणाचेही ऐकून असे चालू देऊ नका. यातून हे प्रश्न निर्माण झाले. म्हणून हे कुठेतरी थांबले पाहिजे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**मा. कुलगुरू:-**

मी माझ्या अधिकारांमध्ये हा बदल केला आहे. त्यावर मी ठाम आहे. संचालक पदाची जाहिरात दिली आहे, ही भरती प्रक्रिया एक महिन्यात पूर्ण होईल.

**श्री. सुनिल मगरे:-**

मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये असा ठराव झाला आहे की, सेवानिवृत्त लोकांना कामावर ठेवू नये.

**मा. कुलगुरू:-**

पुणे विद्यापीठामध्ये डॉ. सुखदेव थोरात हे वयाच्या ७२ व्या वर्षी Visiting Professor आहेत. आवश्यकतेनुसार आपण माणसे नेमतो. यात कुठलेही राजकारण आणू नये अशी माझी आपणाला विनंती आहे.

**श्री. सुनिल मगरे:-**

मॅनेजमेंट कौन्सिलच्या ठरावाची अंमलबजावणी होणार की नाही? आपण सेवानिवृत्त व्यक्तीला ५० हजार का देत आहोत? मॅनेजमेंट कौन्सिलच्या ठरावावर आपण ठाम रहा हीच माझी विनंती आहे.

**मा. कुलगुरू:-**

नॅकचे काम फुलटाईम आहे, ते स्टॅटिस्टिक्सचे काम आहे. आपल्याकडे विभागांकडून लवकर रिपोर्ट येत नाही. ही स्थिती गंभीर आहे.

**श्री. सुनिल मगरे:-**

नॅक झाल्यानंतर यावर कार्यवाही करा.

**मा. कुलगुरू:-**

नक्की. या post मानधनावर आहेत. पण नॅक होईपर्यंत तुम्ही थांबा,

**प्र- कुलगुरू:-**

नॅकच्या वेळेस फुलटाईम काम करावे लागते. Working मध्ये असणारा व्यक्ती हे काम करू शकत नाही कारण already त्यांच्याकडे भरपूर काम असते.

| | |
|---|---|
| ३ | **ठराव**<br>**अधिसभा सदस्यांनी लेखी स्वरुपात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे परिनियमानुसार एक तास आधी टेबलवर ठेवण्यात आली, याची नोंद घेण्यात आली.** |

**कुलसचिव:-**

| | |
|---|---|
| ४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम (२९) (जी) अन्वये विद्यापीठाचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अर्थसंकल्पास मान्यता प्रदान करणेबाबत. |

**डॉ. राठी:-**

जागतिक किर्तीचे अर्थशास्त्रज्ञ महामानव विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतीस अभिवादन,

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

मा. कुलगुरु, तथा आजच्या बैठकीचे अध्यक्ष प्रो. बी. ए. चोपडे सर, प्र.कुलगुरु डॉ. तेजनकर सर, कुलसचिव डॉ. साधना पांडे मॅडम तसेच सर्व सन्माननीय नवनिर्वाचीत अधिसभा सदस्य आणि पत्रकार बंधू भगिनींनो.

`` **हे ज्ञानीची पवित्रता ज्ञानिची आथि**`` या ब्रीद वाक्याची प्रेरणा घेऊन आपल्या विद्यापीठाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे.

**सर्व नविन अधिसभा सदस्यांची ही पहीलीच बैठक आहे. आपण सर्वांनी यापुढे वेळोवेळी विद्यापीठाच्या या सभागृहात महत्वाचे निर्णय घ्यावेत, सुचना कराव्यात, चर्चा करावी व खेळीमेळीच्या वातावरणात बैठक पार पाडावी जेणेकरुन प्रशासनास त्याप्रमाणे कार्यपध्दती करणे सोपे होईल अशी मी प्रशासनाच्या वतीने सन्माननीय सदस्यास ग्वाही देतो.**

वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेने शिफारस केलेला हा अर्थसंकल्प विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहापुढे मंजुरीसाठी मांडताना मला अतिशय आनंद होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविल्याबद्दल मी मा. कुलगुरुचे मन:पुर्वक आभार मानतो.

हा अर्थसंकल्प सादर करीत असतांना माझी भूमिका ही प्रसिध्द् लोककवी वामन दादा कर्डक यांच्या

**" माणसा इथे मी , तुझे गीत गावे, असे गीत गावे तुझे हित व्हावे,**

**एकाने हसावे लाखांनी रडावे, असे सारे सारे इथे ना उरावे."**

या कवितेतील कडव्यांसारखी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या कार्यक्षेत्रात औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद जिल्हे येतात, विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे ग्रामीण व शहरी आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात महत्वपुर्ण बदल घडविणे, तंत्रज्ञान क्षेत्रातील बदल व जागतिक स्पर्धा अशी अनेक आव्हाने आजच्या विद्यार्थ्यांसमोर आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या नावाने चालणारे हे विद्यापीठ काळाबरोबर पुढे जात असुन विद्यापीठ प्रशासन अधिकाधिक कार्यक्षम, गतिमान व लोकाभिमुख करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

विद्यार्थ्यांसाठी मुलांचे, मुलींचे व परदेशी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र असे सर्व सोईयुक्त वसतीगृह उपलब्ध करुन देणे, विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव मिळवुन देण्यासाठी स्वतंत्र क्रिडा संकुल उभारण्यास चालना देणे तसेच विविध प्रकारच्या महाविद्यालयीन, आंतरविद्यापीठीय स्पर्धा, अश्वमेधस्पर्धा, युवक महोत्सव, शिबीरे, चर्चासत्रे यांचे आयोजन करणे व यात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, शिक्षण व संशोधनासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या ग्रंथसंपदेत वाढ करण्याच्या दृष्टीने व उपलब्ध ग्रंथसंपदा जतन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे. यासाठी २४ X ७ आभ्यासिका उपलब्ध करुन देणे, शिक्षण व संशोधनात लागणाऱ्या विविध प्रकारच्या यंत्रसामुग्री खरेदी करुन प्रयोगशाळा अद्यावत करणे. विद्यार्थ्यांना सुसज्ज व अत्याधुनिक प्रयोगशाळा उपलब्ध करुन देणे. शिक्षण व संशोधन करतांना आजच्या युगात अत्यावश्यक बनलेला घटक म्हणजे संगणकीकरण, विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय बाबी संगणकीकृत करण्यासाठी टप्याटप्याने प्रशासन प्रयत्नरत आहे. यासाठी संशोधन, शिक्षण, परीक्षा, ग्रंथालय, वेब बेस्ड ई-लर्नींग, प्रशासकीय कामकाज यासर्व बाबी संगणकाच्या माध्यमातुन जोडण्यासाठी संगणकीय प्रणाली मजबुत करणे, विविध शैक्षणिक इमारतीमध्ये, वर्गखोल्यांमध्ये, प्रशासकीय इमारतींमध्ये लागणारे विविध प्रकारचे फर्नीचर, मॉडयुलर फर्निचर उपलब्ध करणे तसेच इमारती, वाहण, रोकड आणि मौल्यवान वस्तु इ. जतन करणे त्यांचा विमा करणे यासाठी तरतुदी केलेल्या आहेत.

शिक्षण हे मानवाच्या आयुष्यातील पवित्र टप्पा असल्याने शिक्षण घेत असतांना या टप्यांत चांगले संस्कार होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण घेत असलेला परिसर हि तितकाच पवित्र व आकर्षक वाटावा यादृष्टीने विविध पाऊले उचलणे आवश्यक आहेत. त्यासाठी विद्यापीठाचा परिसर वनराईने फुलवणे, बागबगीचे निर्माण करणे, वातावरण प्रसन्न व सुशोभीत करणे आवश्यक बनते. यासाठी रस्ते, शाश्वत वीज, पाणीपुरवठा, बागबगीचे व वनराई निर्माण करणे व यातुन प्रसन्न शैक्षणिक वातावरण निर्माण करणे.

मराठवाडा विभागात होत असलेले सामाजिक, औद्योगिक, आर्थिक, शैक्षणिक व भौगोलिक बदल लक्षात घेऊन विद्यापीठ वाटचाल करीत आहे. इतकेच नव्हे तर या सर्व बदलांना एक विधायक दिशा देण्यासाठी

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

विद्यापीठाने सातत्याने प्रयत्न केलेला आहे. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया असतो, हा पाया अधिक मजबुत करण्याची जबाबदारी विद्यापीठाची असते असे मी मानतो. ही जबाबदारी समर्थपणे पेलण्यासाठी शिक्षण पध्दतीत योग्य ते बदल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक पायाभुत सुविधा तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम योग्य पध्दतीने चालविण्यासाठी विद्यापीठ महत्वपुर्ण भूमिका पार पाडीत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नॅक चा `अ` दर्जा प्राप्त केलेले एक विद्यापीठ आहे. त्यामुळे मराठवाडयातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याची तसेच मराठवाडयाचा सर्वांगीण विकास करण्याची विद्यापीठाची मोठी जबाबदारी आहे. सदर बाब लक्षात घेऊन अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे.

महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने महिला सक्षमीकरण व महिला प्रशिक्षण, महिलांसाठी जीम साहीत्य, सॅनीटरी नॅपकीन निर्मिती, महिला कर्मचारी सोई-सुविधा, महिला विकास कक्ष व तक्रार निवारण समिती, बाल संगोपन गृह, `एक कन्या अपत्य कर्मचारी कल्याण योजना`, इ. साठी ३६ लक्ष रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

विद्यापीठाचे नॅक पुढील वर्षी २०१८-१९ मध्ये होणार आहे. त्यासाठी मा. कुलगुरुंच्या निर्देशानुसार नॅकची तयारी चालू आहे. आपण पहिल्या १० मध्ये येऊ अशी मा. कुलगुरु व प्र-कुलगुरुंना आशा आहे. नॅक ला सामोरे जाण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यासाठी इमारती दुरुस्ती परिरक्षण आणि रंगरंगोटी साठी रुपये ३ कोटी व मुख्य प्रशासकीय इमारत सुशोभिकरण यासाठी रुपये ५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**विद्यार्थ्यांसाठी काही योजना तरतुदी. (एकूण रु. १९४१.२५ लक्ष)**

| अ.क्र. | अर्थसंकल्प शिर्षक | तरतुद रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १. | कै.वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा व शिका योजना) | ८५ |
| २. | विदेशी विद्यार्थी वसतिगृह बांधकाम | १५० |
| ३. | मुलांचे वसतिगृह क्रमांक ०५ बांधकाम | ७५ |
| ४. | मुलांचे वसतिगृह (रुसा) बांधकाम | १० |
| ५. | डॉ. बा. आं. १२५ वी शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती समारंभ - ५०० मुलांचे वसतिगृह बांधकाम | ५०० |
| ६. | मुलांचे वसतिगृह बांधकाम - उप-परिसर उस्मानाबाद | १०० |
| ७. | मुलींचे वसतिगृह बांधकाम - उप-परिसर उस्मानाबाद | ५० |
| ८. | विद्यार्थी विरंगूळा केंद्र बांधकाम - पहिला मजला | ५० |
| ९. | होस्टेल इम्प्रुमेंट फॅसीलीटी | ३० |
| १०. | विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतीगृहे (देखभाल) | ३६.२४ |
| ११. | (ग्रीन लाब्ररी) Open Mess | ५० |
| १२. | सेंट्रल वॉटर आर ओ सिस्टीम | २५ |
| १३. | शेतकरी शेतमजूरांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती | १०० |
| १४. | सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती | १०० |
| १५. | शोध निबंध सादरीकरणासाठी सवलतीच्या दराने प्रवास खर्च | ५ |
| १६. | क्रिडा महोत्सव (अश्वमेध) आंतर महाविद्यालयीन क्रिडा सामने, आंतर विद्यापीठ क्रिडा स्पर्धा, बक्षीसे, क्रिडा साहीत्य. | ६० |
| १७. | युवक महोत्सव, इंद्रधनुष्य विविध स्पर्धा, शिबीरे, विद्यार्थ्यांचा विमा. विद्यापीठ विद्यार्थी परीषद, विद्यार्थी सहाय्यता निधी, अविष्कार, आव्हान, सॅनिटरी नॅपकीन निर्मिती इ. | ८७.२५ |
| १८. | नियतकालीके, ग्रंथ खरेदी, स्पर्धा परीक्षा ग्रंथ इ. पुस्तके | १५० |
| १९. | माजी विद्यार्थी मेळावा | २९.६० |
| २०. | विभागातील शैक्षणिक व सांस्कृतीक उपक्रम | ३२.६० |
| २१. | प्रयोगशाळा रसायने व उपभोग्य इ. | १३०.५० |
| २२. | अतिथी व्याख्याते सुविधा | ५९.४५ |
| २३. | विविध व्याख्यानमाला | ७.३१ |
| २६. | विद्यापीठ ओपन डे | ८.३० |
| २७. | सायन्स डे | १० |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा आर्थिक वर्ष २०१८-१९ चा एकुण अर्थसंकल्प पुढीलप्रमाणे आहे.**

| अर्थसंकल्प शिर्षक | अपेक्षित जमा (रुपये कोटीत) | अपेक्षित खर्च (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| वेतन अनुदान | ६३.७३/- | ६३.७३/- |
| साधारण निधी जमा | ११५.४७/- | -- |
| साधारण निधी खर्च आवर्ती | -- | ९१.२४/- |
| साधारण निधी खर्च अनावर्ती | -- | ७९.७०/- |
| स्वतंत्र प्रकल्प योजना व सहयोगी कार्यक्रम निधी व विनिर्दिष्ठ अनुदाने | ८५.४१/- | ८५.४१/- |
| अपेक्षित तुट | ५५.४७/- | -- |
| **एकुण अर्थसंकल्प २०१८-१९** | **३२०.०७/-** | **३२०.०७/-** |

सन २०१८-१९ या वर्षात विद्यापीठास एकुण अपेक्षीत जमा रुपये २६४.६० कोटी आहे. यापैकी वेतन अनुदान प्राप्ती रुपये ६३.७२ कोटी, विकास व स्वतंत्र प्रकल्प योजना व इतर अनुदाने रुपये ८५.४१ कोटी आणि अनुदानाव्यतिरिक्त विद्यापीठाच्या विविध स्त्रोतातुन प्राप्त होणारी रक्कम अंदाजे रुपये ११५.४७ कोटी आहे. खर्चाचा अर्थसंकल्प ३२०.०७ कोटी अपेक्षीत असुन त्यामध्ये अनुदान प्राप्तीतुन वेतनावर रुपये ६३.७२ कोटी आणि विकास व स्वतंत्र प्रकल्प योजनावर रुपये ८५.४१ कोटी तसेच साधारण निधीतुन रुपये १७०.९४ कोटी खर्च अपेक्षित आहे. जमा-खर्चाचा विचार केला असता अर्थसंकल्पातील एकुण तुट रुपये ५५.४७ कोटी अपेक्षित आहे. व हा खर्च विद्यापीठाच्या साधारण निधीच्या रकमेतुन होईल.

**अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे**

**सन २०१८-२०१९ चे अर्थसंकल्पाचे काही ठळक वैशिष्टे**

| क्र. | अर्थसंकल्प शिर्षक | तरतुद रु. (कोटीत) |
|---|---|---|
| १. | ग्रंथालयास पुस्तके नियतकालिके डेटाबेस डिजिटलायझेशन कॉम्पक्टर इ. खरेदी | ६.३५ |
| २. | परीक्षा विभाग महसुली व भांडवली खर्च | २५.४६ |
| ३. | विद्यापीठ कार्यालय संगणक व सॉफ्टवेअर खरेदी | १.०० |
| ४. | ग्रामीण भागातील शेतकरी /शेतमजुरांच्या पाल्यांच्या पीएच.डी. शिष्यवृत्तीसाठी | १.०० |
| ५. | स्पर्धा परीक्षा मागदर्शन केंद्र - शिऊर बंगला | १.०० |
| ६. | सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती | १.०० |
| ७. | इन्स्टीट्युट ऑफ महात्मा फुले - आंबेडकर थॉट ॲन्ड रिसर्च सेंटर | ०.४० |
| ८. | गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था | ९.३३ |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल मेमोरिअल | ३.०० |
| १०. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल लायब्ररी | १.५० |
| ११. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरण | ०.२० |
| १२. | छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा | ०.४० |
| १३. | विद्यापीठ नामविस्तार रौप्य महोत्सव | ०.५० |
| १४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संचलीत संतपीठ पैठण | ०.५० |
| १५. | उपहारगृह व वसतिगृहांचे दुरुस्ती | ०.४० |
| १६. | विद्यापीठ परिसर विकास व फलोत्पादन (फळबाग) | ०.३० |
| १७. | इंडिया रिसर्च ऑन हेरीटेज, आर्ट, कल्चर, सायन्स टेक्नॉलॉजी इ. | १.०० |
| १८. | विद्यापीठ परिसर शैक्षणिक विभाग कार्यालय, वसतिगृहे / अतिथीगृह व उस्मानाबाद | २.७५ |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

| | | |
|---|---|---|
| | उपपरिसर येथे फर्निचर खरेदी | |
| १९. | अतिथीगृह नुतनीकरण व विस्तारीकरण | १.०० |
| २०. | सेंट्रल वॉटर आर ओ सिस्टीम | ०.२५ |
| २१. | विद्यापीठ अध्यापन आणि संशोधन योजना | ९.९७ |
| २२. | इलेक्ट्रॉनिक उपकरणे /सीसी टिव्ही / इ-सूरक्षा इ. | १.०० |
| २३. | कै.वसंतरावजी काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा व शिका योजना) | ०.८५ |
| २४. | विद्यापीठ परिसरातील जलस्त्रोतांचे पूर्नजिवन व अपारंपारीक उर्जा तसेच सोलार ट्री ॲण्ड विन्ड मिल व सौरउर्जा विद्युतीकरण इ. | ०.९० |
| २५. | रस्त्याची बांधणी, डांबरीकरण व परिसर सुशोभिकरण | २.०० |
| २६. | सॅटेलाईट ब्रॉडकॉस्टींग / एफ एम रेडीओ /मल्टी स्क्रिन व्हर्च्युअल क्लास रुम | २.०० |
| २७. | ब्लेड सर्व्हर / डेटा सेंटर | १.०० |
| २८. | डिजीटल स्टुडिओ बांधकाम, विदेशी विद्यार्थी वसतिगृह, विद्यापीठ परीसर सुशोभिकरण, सामाजीक शास्त्र संकुल, गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संशोधन संस्था, शारीरिक शिक्षण विभाग, मुल्यांकन भवन इमारत / लॉ स्कुल, संस्कृत / मानसशास्त्र इमारत, मॉडल महाविद्यालय, मुलांचे वसतिगृह - परिसर व उपपरीसर विद्युतीकरण व इतर बांधकामासाठी | ३६.६० |
| २९. | नॅक / आय क्यु ए सी सेल | ०.७० |
| ३०. | अध्यासने व संशोधन केंद्रे | ०.८७ |

## विद्यापीठ उप-परिसर उस्मानाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उस्मानाबाद उप-परिसर कार्यालय व विभागांसाठी, विवीध आवर्ती व अनावर्ती शीर्षाकांतर्गत **रुपये ७७४ लक्ष** तरतूद करण्यांत आली आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मराठवाडयाच्या ग्रामीण भागात अधिकाधिक प्रमाणात उच्च शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणुन उस्मानाबाद येथे उपकेंद्र स्थापन केले. विद्यापीठाच्या या उपकेंद्राचा अधिकाधिक विकास व्हावा यासाठी संरक्षक भिंत, रस्ते, प्रशासकीय इमारत, पाणीपुरवठा, मुलींचे आणि मुलांचे वसतीगृह व पुरक बाबी म्हणुन फर्निचर, यंत्रसामुग्री, संगणक, पुस्तके, तसेच परिसर विकास व देखभाल या अंतर्गत (आवश्यक त्या तरतुदी करण्यात आलेल्या आहे.)

| अ.क्र. | अर्थसंकल्प शीर्ष | रुपये ( लक्ष ) | |
|---|---|---|---|
| | | आवर्ती | अनावर्ती |
| १ | उप-परिसर कार्यालय | १८८.५५ | २०.०० |
| २ | ज्ञान स्त्रोत केंद्र | ०१.०० | ०५.२५ |
| ३ | रसायनशास्त्र विभाग | ०८.७९ | २०.०० |
| ४ | जल व भूमी व्यवस्थापन विभाग | ०४.५९ | १४.०० |
| ५ | सूक्ष्मजीवशास्त्र विभाग | ०९.४४ | ०५.०० |
| ६ | जैव-तंत्रज्ञान विभाग | ११.९० | ०४.०० |
| ७ | इंग्रजी विभाग | ०३.१९ | ०१.०० |
| ८ | शिक्षणशास्त्र विभाग | ०२.७४ | २.५० |
| ९ | व्यवस्थापनशास्त्र विभाग | ०५.६० | ०६.०० |
| १० | वेतन (साधारण निधी) | ८५.०० | - |
| ११ | बांधकाम | - | ३२५.०३ |
| १२ | फर्नीचर इ. | - | ५०.०० |
| | **एकुण** | **३२०.८०** | **४५२.७८** |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

# असा येईल रुपया

## सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील जमेची टक्केवारी दर्शविणारे प्रारुप (रुपये कोटीत)





- वेतन रु. ६३.७३कोटी ( १९.९१% )
- परीक्षा शुल्क रु.६३.५२कोटी ( १९.८५% )
- शिक्षण शुल्क रु.६.६६कोटी ( २.०८% )
- संकीर्ण आगम रु.१४.१७कोटी ( ४.४३% )
- इतर शुल्क रु.१९.६२कोटी ( ६.१३% )
- विद्यापीठ प्रकाशने,मुद्रणालय, ग्रंथालय व घसारा निधी वर्ग रु.९.२४कोटी ( २.८९% )
- स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमे रु.२.२५कोटी ( ०.७% )
- विद्यार्थी व प्राध्यापक संशोधन अनुदान रु.८५.४१कोटी ( २६.६८% )
- तूट - साधारण निधीच्या रकमेतून जमा रु.५५.४७कोटी ( १७.३३% )

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

# असा जाईल रुपया

## सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील खर्चाची टक्केवारी दर्शविणारे प्रारुप (रुपये कोटीत)




- वेतन रु.६३.७३कोटी ( १९.९१% )
- वेतन व इतर (साधारण निधी) रु.१६.७७कोटी ( ५.२४% )
- विद्यार्थी वसतिगृह व इमारत बांधकाम रु.३६.६कोटी ( ११.४४% )
- परीक्षा व्यय रु.२५.४६कोटी ( ७.९५% )
- शैक्षणिक खर्च रु.२६.९१कोटी ( ८.४१% )
- संशोधन उपकरणे व विकास खर्च रु.३९.८७कोटी ( १२.४६% )
- स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमे रु.१.८कोटी ( ०.५६% )
- विद्यार्थी व प्राध्यापक संशोधन अनुदान रु.८५.४१कोटी ( २६.६८% )
- घसारा निधी रु.७.१५कोटी ( २.२३% )
- संकीर्ण व्यय रु.३.२७कोटी ( १.०२% )
- विद्यापीठ अध्यापन आणि संशोधन रु.९.९७कोटी ( ३.११% )
- विद्यापीठ उप-परिसर उस्मानाबाद रु.३.१४कोटी ( ०.९८% )

आपणा समोर अर्थसंकल्प सादर एवढेच म्हणावेसे वाटते की,

**``माना की गुल को गुलशन न कर सके हम,**

**पर कर जायेंगे जरुर कुछ काटें कम, गुजरेंगे जिस राहसे हम.``**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

अतीशय शांतपणे आणि प्रेमाने आपण माझे अर्थसंकल्पीय भाषण ऐकले मी आपला शतशः आभारी आहे. आणि आपल्या समोर सादर केलेल्या विद्यापीठाच्या या २०१८-१९ च्या अर्थसंकल्पास मी मा. अधिसभा सदस्यांना विनंती करतो की, मांडलेल्या अर्थसंकल्पास मान्यता द्यावी.

पुनश्च मा. सर्व अधिसभा सदस्यांच्या आभार.

**धन्यवाद.**

***

**डॉ. डोभाळः-**

पेज क्र. ४७ वर दर्शविलेले स्पर्धा परीक्षा केंद्र हे विद्यापीठात घ्यावे, असा ठराव मांडतो.

**डॉ. गोविंद काळेः-**

अनुमोदन आहे.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. १४ | **नियोजित स्पर्धा परीक्षा केंद्र हे शिऊरबंगला ऐवजी विद्यापीठातच निर्माण करण्यात यावे, असे ठरले.**<br>(सूचक- डॉ. डोभाळ, अनुमोदक- डॉ. गोविंद काळे) |

**डॉ. डोभाळः-**

पर्यावरणशास्त्र विभागासाठी २०१७-१८ मध्ये १.५ कोटीची तरतूद केली होती. आता २०१८-१९ मध्ये १० लाख तरतूद केली? असे करण्याचा याचा खुलासा व्हावा.

पेज क्र. ८७ वर Central Facility Center साठी २०१७-१८ मध्ये ६ कोटी तरतूद केली होती. २०१८-१९ मध्ये १ कोटी तरतूद का केली? याचा खुलासा व्हावा.

**डॉ. खंदारेः-**

तरतुदी खर्च होतात का यासाठी एक कमिटी नेमावी. तरतुदींचे युटिलायझेशन व्हावे याचा विचार करावा. परीक्षा शुल्क ६३.७३ कोटी इतके आहे. परीक्षेवर खर्च २५.४२ कोटी होतो. म्हणजे ८% खर्च होतोय. परीक्षेची बरीचशी कामे महाविद्यालय पातळीवर होतात. म्हणून आमची विनंती आहे की, महाविद्यालयास परीक्षेसंदर्भात केलेल्या कामाचा वाटा मिळावा. कारण ५० टक्के परीक्षेचे काम हे महाविद्यालय पातळीवर होते. यावर आपण निर्णय घ्यावा. तसेच सुपर लेट फीसचा निर्णय घ्यावा.

**श्री. नेटकेः-**

सर्वप्रथम मी सभागृहाचा आभारी आहे की सभागृहाने माझ्या अभिनंदनाचा ठराव मांडला. फक्त एक विनंती आहे की, माझ्या एकट्याच्या ऐवजी परीक्षा विभागाचाही अभिनंदनाचा ठराव घ्यावा.

| | |
|---|---|
| विषयपत्रिकेशिवाय ऐनवेळी संमत ठराव क्र. १५ | **परीक्षा विभागातील चांगल्या कार्याबद्दल डॉ. दिगंबर नेटके- संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ तसेच परीक्षा विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात यावा, असे ठरले.**<br>(सूचक- डॉ. कोकाटे, अनुमोदक- श्री. सुनिल मगरे) |

डॉ. खंदारे सरांच्या प्रश्नाबद्दल सांगतो. आपण थोडे विद्यापीठालाही सहकार्य करावे. पुढच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीसमोर positive प्रस्ताव मांडला जाईल. त्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर positive प्रस्ताव मांडला जाईल.

**डॉ. गोविंद काळेः-**

नाही, याच सभागृहात निर्णय घ्या.

Dr. Babasaheb Marathwada University * Aurangabad *

**डॉ. खंदारे:-**

महाविद्यालयांना वाटा मिळालाच पाहिजे.

**डॉ. डोभाळ:-**

येथेच निर्णय घ्या.

**श्री. नेटके:-**

हा परीक्षा मंडळ व व्यवस्थापन परिषदेचा अधिकार आहे.

**ॲड. संजय काळबांडे:-**

'प्रकाशने, मुद्रणालय, ग्रंथालये, घसारा निधी' यातून ९.२४ कोटी आपल्याला मिळताय. घसारा निधी हा उत्पन्नाचा स्रोत होऊ शकतो का? याचा खुलासा व्हावा.

**डॉ. राठी:-**

आपण आधी घसाऱ्यासाठी FD करतो, त्यावर व्याज मिळते.

**ॲड. संजय काळबांडे:-**

साधारण निधी हा विद्यापीठाचा आपला पैसा आहे. आपण वेतनावर १६ कोटी खर्च करतो. हा विद्यार्थ्यांच्या फीसचा पैसा आहे. प्रश्नपत्रिकेतील चुका टाळाव्यात, अशी विनंती आहे.

**डॉ. राठी:-**

हा वेतनावरचा खर्च कंत्राटी कर्मचाऱ्यांवरील आहे, तो करावाच लागेल.

**डॉ. राम चव्हाण:-**

बजेटबद्दल डॉ. राठी सरांचे अभिनंदन. सध्या विद्यापीठाच्या उत्पन्नाचे स्रोत कमी होत आहेत. ५५ कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प खोटारडा आहे. माझी विनंती आहे की, नवीन कोर्स सुरू करण्याचा विचार करावा. संशोधनावर भर द्यावा, तसेच बांधकामावर अनावश्यक खर्च केला जाऊ नये.

**डॉ. गोविंद देशमुख:-**

विद्यार्थी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदू आहे. म्हणून १७ वसतिगृहासाठी २० लाख तरतूद आहे, ती तरतूद वाढवावी. 'कमवा व शिका'ची तरतूद वाढवावी, शेतकरी, शेतमजूर पाल्य शिष्यवृत्तीमध्ये वाढ करावी, ही माझी विनंती आहे.

**डॉ. राठी:-**

नॅकचे उद्दिष्ट डोळ्यासमोर असल्याने अर्थसंकल्पात वाढ केली आहे. तरतूद कमी पडली तर re-appropriate करू.

---

**डिनर टाईम**

---

**श्री. जितेंद्र देहाडे:-**

सर्वप्रथम मी राठी सरांचे अभिनंदन करतो. विद्यार्थीकेंद्रित असा हा अर्थसंकल्प आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबद्दल तरतूद केल्याबद्दलही आपले आभार. स्व. विलासराव देशमुख अध्यासन केंद्रासाठी ५० लाखाची तरतूद करावी. प्रशासनाचे आभार मानून थांबतो, धन्यवाद!

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**डॉ. बाबासाहेब कोकाटे:-**

आम्हाला दिलेल्या अर्थसंकल्पाच्या पुस्तिकेत पेज क्र. १३ वर डॉ. बाबासाहेबांच्या रौप्यमहोत्सवी वर्षासाठी तरतूद केलेली दिसत नाही.

पेज क्र. २३ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र शिऊरबंगला यासाठी तरतूद आहे. यावर आधीच चर्चा झालेली असल्याने पुन्हा चर्चा करत नाही.

पेज क्र. २० वर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चासाठी तरतुदीत वाढ करावी.

पेज क्र. २१ वर ज्ञान स्रोत केंद्र २ कोटी १० लाखची तरतूद केली पण त्याचे विवरण दिले नाही.

ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रावर ३ पटीने आवक आहे आणि ८ पटीने खर्च केलेला दिसतो. ५ लाखावरून डायरेक्ट ४० लाखाची वाढ केली आहे, याचे विवरण देण्यात यावे.

विद्यापीठाचे वसतिगृह व अतिथिगृहाची जमा बाजू याचे विवरण देण्यात यावे.

पेज क्र. ३३ वर 'इन्स्टिट्यूट ऑफ महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर थॉट्स अँड रिसर्च सेंटर' यासाठी तरतूद केली त्याबद्दल आपले आभार.

त्याच पृष्ठावर केंद्रीय प्रगत संशोधन व प्रशिक्षण सुविधा केंद्र याच्या खर्चात लक्षणीय कपात केली आहे याचे विवरण देण्यात यावे.

त्याच पृष्ठावरती नववा मुद्दा भारतीय राज्यघटना यातील खर्चात कपात केली आहे, त्यासंबंधात विवरण देण्यात यावे.

गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण संशोधन केंद्राच्या तरतुदीत गेल्या वर्षीपेक्षा भरमसाठ वाढ झालेली दिसून येते. त्याचे विवरण देण्यात यावे.

लघु संशोधन प्रकल्प तरतुदीत प्रचंड मोठी कपात करण्यात आली आहे, ती तरतूद वाढवावी.

संशोधन, चर्चासत्र, प्रदर्शन यात कपात केलेली दिसत आहे. ती वाढवावी.

महाविद्यालयातील प्राध्यापकांना विदेश दौरे यासाठी तरतूद करण्यात यावी.

ग्रामीण शेतकरी, शेतमजूर यांच्या पाल्यांसाठी संशोधन छात्रवृत्ती यात चांगली तरतूद आहे. पण त्याची अंमलबजावणी होते किंवा नाही याचे विवरण आम्हाला देण्यात यावे. संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही ही छात्रवृत्ती देणे गरजेचे आहे.

फिरती मोबाईल प्रयोगशाळा मला दिसली नाही, त्यावर खूप तरतूद केली आहे. त्यावर एवढी तरतूद करण्याची आवश्यकता नाही.

युनिव्हर्सिटी नेटवर्किंग सेंटरवर एवढी मोठी तरतूद का केली याचे विवरण देण्यात यावे.

कुलगुरूंचे निवासस्थान येथील जिम साहित्यावर यावर्षी खूप मोठी तरतूद केली आहे. विद्यापीठ अतिथिगृहावर २० लाख तरतूद केली आहे.

नेट सेट मार्गदर्शन केंद्रची रु. ५००००/- तरतूद आहे, ती वाढविण्यात यावी.

मलशुद्धीकरण प्रकल्पात काहीच तरतूद दिसून येत नाही.

प्रशासकीय इमारतीसाठी काहीच तरतूद केलेली दिसून येत नाही.

यावरून असे दिसते की, हा दिशाभूल करणारा अर्थसंकल्प नसावा. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यावर खर्च झाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी भरीव तरतुदी करण्यात याव्यात.

**डॉ. राठी:-**

हे बजेट म्हणजे फक्त आकड्यांचा खेळ नसून, ज्यावर तरतूद केली नाही त्याचा अर्थ असा आहे की, ते कार्य पूर्ण झाले आहे. परंतु भविष्यात तरतूद करावयाची असेल तर त्यासाठी असे केले आहे. तसेच मागच्या वेळेस तरतूद नाही पण यावर्षी तरतूद केली याचा अर्थ असा आहे की, नॅकचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तरतुदी केल्या आहेत. विद्यापीठ अतिथिगृहासाठी केलेली तरतूद ही नॅक व आव्हान असे कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवून केली आहे.

मेडिकलवरील खर्च वाढवावा अशी आपण विनंती केली आहे. तर हे मेडिकल आपल्याला शासनाकडून reimburse झालेले आहे. ते आपल्याकडे आल्यास आपण पेमेंट करतो.

ताराबाई शिंदे हे एकमेव असे अभ्यास केंद्र आहे की, ज्याला गव्हर्नमेंटची ग्रँट आहे. इतर खर्च हा विद्यापीठातर्फे केला जातो.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

मी आपणास एकच सांगू इच्छितो की, हा अर्थसंकल्प दिशाभूल करणारा नाही तर विद्यार्थीकेंद्रीत अर्थसंकल्प आहे याची मी तुम्हाला ग्वाही देतो.

**श्री. विजय सुबुकडेः-**

मा. अध्यक्ष महाराज, हा अर्थसंकल्प विद्यार्थीकेंद्रित आहे हे मी मान्य करतो. आपण रस्त्यासाठी २ कोटी तरतूद केली आहे. बाबासाहेबांच्या पुतळयाच्या नंतरचा रस्ता अतिशय खराब आहे. शासनाच्या norms प्रमाणे स्पीडब्रेकर बसवावेत. रस्त्यासाठीची तरतूद २ कोटीऐवजी ३ कोटी करण्यात यावी. पुतळयापासून दोन्ही साईडचे रस्ते चांगले करण्यात यावे. तसेच मकबऱ्याकडे जाणाऱ्या रोडचेही काम करण्यात यावे. सिमेंट रोडसाठी जास्त तरतूद लागते म्हणून त्याऐवजी डांबर रोड करण्यात यावा. जर आपण जास्तीची तरतूद करणार असेल तर सिमेंट रोडसाठी काही हरकत नाही, अशी माझी विनंती आहे.

**डॉ. राठीः-**

आपण रोडसाठी PWD ला २ कोटी already दिले आहेत. टेंडरिंगची process सुरू आहे. तसेच आता आणखी २ कोटीची तरतूद आहे. म्हणजे या कामासाठी रु. ४ कोटी आहेत.

**श्री. विजय सुबुकडेः-**

माझी विनंती आहे की, इतरही रोड आताच करून घ्या, कारण रस्त्यांची खूप दुरवस्था झाली आहे. PWD ला पत्र देऊन लवकरात लवकर काम करून घ्यावे. तुम्ही जर इतर रस्त्यांसोबत या कामाचे एकत्रित टेंडर दिले तर आपला खर्चही वाचेल.

**डॉ. फुलचंद सलामपुरेः-**

विद्यापीठाकडून मकबराकडे जाणारा १०० मीटरचा रस्ता चांगला करून घेण्यात यावा.

**श्री. मनोहर शिवपुरेः-**

सर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सव आणि नॅकसाठी आपण भरीव तरतूद केल्याबद्दल आपले अभिनंदन. आपण RO साठी २५ लाख तरतूद केली. विद्यापीठात १७ वसतिगृह असून वसतिगृहातील अनेक विद्यार्थी पाण्यासाठी इकडे-तिकडे भटकतात. आपला परिसर ७२४ एकरचा आहे. जर ६५० मि.मी. पाऊस १८९ करोड लीटर पाणी विद्यापीठ परिसरात असेल. आपण पाण्याच्या बाबत स्वयंपूर्ण झाले पाहिजे. येथे डॉ. तेजनकर सरही आहेत. म्हणून माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, याचा विचार आपण करावा.

विद्यापीठाच्या परिसर संरक्षण व सुशोभित करण्यासाठी शासनाच्या उपक्रमाचीही जोड देता येईल. कंपाऊंड वॉल, वृक्षारोपण, जलस्रोत पुनर्जीवनाचा कार्यक्रम यात विशेष लक्ष घालावे. त्यासाठी तरतूद वाढवावी.

**श्री. शेख जहूरः-**

संस्कृत डिपार्टमेंट के बिल्डिंग के लिए हमने तरतूद की है। उर्दू, पाली और बुद्धिझम ignore क्यूँ किया? उर्दू, पाली और बुद्धिझम के लिए लॅब नही है। आज भी वहाँ के स्टुडंट बोर्ड पे प्रेझेंटेशन करते है। उर्दू, पाली और बुद्धिझम के लिए infrastructure देना चाहिए। उस डिपार्टमेंट के लिए रिपेअर करने के लिए तयार हूँ। इन दो विभाग के लिए मेरी कुछ भी मदद चाहिए तो मैं करने को तैयार हूँ।

**डॉ. स्मिता अवचारः-**

विद्यार्थीकेंद्रित बजेटबद्दल प्रथम आपले आभार.

यात असे दिसते की, उर्दू, समाजशास्त्र विभाग यांना ओपन डे चे बजेट दिले नाही.

परीक्षा खर्चात सांस्कृतिक खर्च एकत्र दिसत आहे. ते वेगळे करण्यात यावे.

Social Science मध्ये स्टडी टूर बंद केली आहे. सायन्स डिपार्टमेंटला त्यासाठी तरतूद आहे. माझी विनंती आहे की, सर्वांना समान न्याय असावा.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विभागांना नोकरीविषयक माहितीपुस्तिका छापण्यासाठी बजेट आहे. माझी विनंती आहे की, सर्व विभागांना नोकरीविषयक माहितीपुस्तिका छापण्यासाठी तरतूद द्या.

महिला कर्मचाऱ्यांच्या सुविधाकडे दुर्लक्ष केले जात आहे. मग महिला कर्मचाऱ्यांनी कामे कशी करावीत, विद्यार्थिनींनी कसे वावरावे? मी एक वर्षापासून वॉश रुमच्या सुविधेबद्दल स्थावर विभागाला पाठपुरावा करीत आहे. म्हणून Basic सुविधा महिला कर्मचाऱ्यांना पुरविल्या पाहिजेत. पुरुष व महिला कर्मचाऱ्यांना डब्बा खाण्यासाठी अजूनही जागा नाही. करिता यासाठी तरतुद केली पाहिजे.

अभ्यागतांसाठी किमान सुविधा पाहिजेत. अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी खर्च केल्या जातील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

इमारत दुरुस्तीसाठी काही तरतूद आहे का असा माझा प्रश्न आहे. Humanities मध्ये पिण्याचे पाणी, वापरायचे पाणी मिळत नाही. म्हणून स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना basic सुविधा मिळाल्याच पाहिजेत याकडे लक्ष दिले पाहिजेत.

आपण या सभागृहात बसलो या सभागृहाची रचना अशी आहे की स्पॉंडिलेसिस नक्कीच होतील. शिवाय महिला सदस्यांसाठी अतिशय गैरसोयीची अशी आसनव्यवस्था आहे. म्हणून यासाठी तरतूद करा आणि सभागृहाचे काम करून घ्या. प्रत्येकाला बोलण्यासाठी माईकची सुविधा द्या.

Humanities चे प्रश्न सोडवावेत आणि पुढची बैठक ही महिलांसाठी सोयीची असेल याची प्रशासनाने काळजी घ्यावी, एवढीच विनंती करेल. माझ्या महिला भगिनी बैठकीपासून वंचित राहिल्या आहेत, असे होऊ नये याचीही काळजी घ्यावी, धन्यवाद!

**श्री. शेख जहूर:-**

विद्यापीठात पाण्याची सुविधा नाही, याकडे लक्ष देण्यात यावे.

**श्री. संभाजी भोसले:-**

अध्यक्ष महोदय, जवळपास १३ तास ही बैठक सुरू आहे. प्रत्येक सदस्याला आपल्या भावना व्यक्त करावयाच्या असतात. बऱ्याच वेळेला असे होते की, सभागृहातील सदस्यांना व्यक्तच होऊ दिले जात नाही. त्यातून असंतोषाचा भडका होण्याची भीती असते. आपण प्रत्येकाला बाजू मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार. चांगल्या अर्थसंकल्पाबद्दल आम्ही बऱ्यापैकी समाधानी आहोत.

युवक महोत्सवातील कलावंतांना पुणे व मुंबई येथील विद्यापीठे व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तीकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळवून देतात, त्यामुळे त्यांना अनेक बक्षीसे राष्ट्रीय स्तरावर मिळतात. परंतु आपल्याकडे प्रचंड प्रतिभा असूनही योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने कमी बक्षीसे मिळतात. म्हणून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आर्थिक तरतूद एक लाख वरून तीन लाख एवढी करावी.

तसेच विद्यापीठ केंद्रीय युवक महोत्सवामध्ये चार हजार विद्यार्थी कलावंतांचा सहभाग असतो. म्हणून चाळीस लक्ष ऐवजी पन्नास लक्ष तरतूद करावी. तसेच उपकेंद्राच्या अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करावी. पाणी व संरक्षक भिंतीसाठी एक कोटी तरतूद कमी वाटते, यामध्ये वाढ करावी. आपले रत्नागिरी येथे समुद्रकिनारी केंद्र आहे. ते गेल्या दोन वर्षापासून बंद आहे. म्हणून त्यासाठी तरतूद करावी. डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी कटमोशन मागे घेतले त्याबद्दल त्यांचे आभार तथा माझी सर्वांना विनंती आहे की, त्यांनी बजेट मान्य करावे.

**श्री. सुनिल मगरे:-**

मा. अध्यक्ष महोदय, आजची बैठक ही मॅरेथॉन बैठक ठरली आहे. विद्यापीठाचे प्रशासन कायद्याने चालले पाहिजे याबद्दल कुणाचेही दुमत नाही. मागे जे झाले ते आम्हीही लावून धरणार नाही, काही लोकांच्या दबावाखाली येऊन निर्णय घेण्यात आले आहेत. म्हणून इथून पुढे आपण decision बदलू नयेत. तुम्हाला काही लोकांनी सांगितले असेल की, काही लोक बजेट मंजूर होऊ देणार नाहीत. पण आम्ही असे नाहीत. आम्ही बजेट मंजूर करू. पण इथून पुढे आम्ही कायद्याप्रमाणे काम करणार. येथे सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना मांडल्या त्यांचे पालन झाले पाहिजे. आपले बजेट चांगल्या प्रकारचे आहे, त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. आता मी बजेट मंजूर करावे असा ठराव मांडतो.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | |
|---|---|
| ४ | **ठराव**<br>**सदरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते काही अर्थशीर्षातील तरतुदीत वाढ करून तसेच काही नवीन अर्थशीर्षांतर्गत खालीलप्रमाणे तरतुदीसह दुरुस्ती करून अर्थसंकल्प २०१८-१९ ला मान्यता देण्यात आली.**<br>**- 'विद्यापीठ नामविस्तार रौप्य महोत्सव'- वाढ रु. २५ लक्ष.**<br>**- छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा- वाढ रु. ६० लक्ष**<br>**- बृहत आराखडा सर्व्हे- रु. २ लक्ष तरतूद (आवर्ती)**<br>**- विलासराव देशमुख अध्यासन केंद्र - रु. २५ लक्ष तरतूद (आवर्ती)**<br>**- रु. २५ लक्ष तरतूद (अनावर्ती)**<br>**- आद्यकवी मुकुंदराज अध्यासन केंद्र, अंबाजोगाई- रु. १ लक्ष तरतूद (आवर्ती)**<br>**- समाजकार्य महाविद्यालय- रु. २ लक्ष तरतूद (आवर्ती)**<br>**- पाली बुद्धिझम व उर्दू विभाग इमारत- रु. १ कोटी तरतूद (अनावर्ती)**<br>**- परीक्षा केंद्र पोलीस संरक्षण- रु. १ लक्ष (आवर्ती)**<br>**तसेच, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र शिऊरबंगला/ औरंगाबाद असा बदल करावा.**<br>**एकूण रु. २.४१ कोटी इतकी वाढ करण्यात येऊन एकूण रु. ५७.८८ कोटी तुटीचा व एकूण रु. ३२२.४८ कोटीच्या अर्थसंकल्पास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.** |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष ०१ जुलै २०१६ ते ३० जून २०१७ या वर्षाचा ६० वा वार्षिक अहवालास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव अधिसभेस सादर. |
| | **ठराव**<br>**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष ०१ जुलै २०१६ ते ३० जून २०१७ या वर्षाचा ६० वा वार्षिक अहवालास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.** |

**श्री. सुनिल मगरे:-**

बृहत आराखडा सोडून आम्हाला प्रस्ताव क्र. १ मान्य आहे. तशी नोंद घ्या. कारण सातपुडा विकास मंडळ, जळगाव या संस्थेला २००१ मध्ये मोहाडी येथे नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी दिली. २००६-०७ मध्ये हे महाविद्यालय बंद पडले. त्यानंतर निघालेल्या दोन्हीही perspective plan मध्ये आपण हे महाविद्यालय घेतले. २०१४ मध्ये ग्रामीण विकास प्रसारक मंडळ यांना पद्मावती कला व विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यासाठी आपण परवानगी दिली. त्यांनी नियमानुसार प्रस्ताव विद्यापीठाला दिला होता. तो प्रस्ताव शासनाला गेला. शासनाने त्याला परवानगी दिली. दहा वर्षापासून बंद पडलेले सातपुडा विकास मंडळ, जळगाव या संस्थेला महाविद्यालय सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने आपल्याकडे अर्ज दिले. ते बंद पडलेले महाविद्यालय सुरू करण्यासाठी आपण एक समिती नेमली. त्या समितीने तुम्हाला पॉझिटिव्ह अहवाल दिला. पेपरला बातमी आली म्हणून आपण ते थांबवले. २०१७ मध्ये पुन्हा आपण एक समिती नेमली. पुन्हा पेपरला बातमी आली की ते प्रकरण आपण थांबवले. नंतर २०१८ मध्ये स्वत: आपण तेथे गेलात आणि बंद पडलेल्या महाविद्यालयाची फीस आपण स्वीकारली. हे नियमबाह्य कशासाठी? आणि जे नियमानुसार सुरू आहे ते महाविद्यालय बंद पाडायचे का? एका लहान गावात दोन महाविद्यालये करायची का? हे सोडून आम्हाला सगळे मान्य आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**श्री. संजय निंबाळकर:-**

या प्रकरणात कायदेशीर बाजू तपासून निर्णय घ्या.

**प्र-कुलगुरू:-**

आपल्या सकाळच्या मांडणीमध्ये आणि आताच्या मांडणीत बराच फरक पडला आहे. आपण चांगल्या दिशेने वाटचाल करीत आहात त्याबद्दल आपले आभार. येणाऱ्या काळात आपल्याला नियमानुसार काम करणार आहोत. आदरणीय व्यासपीठ तसेच सर्व सन्माननीय सदस्यांचे मी आभार मानतो. कायदा व संविधानाप्रमाणे आपण काम करू. आता राष्ट्रगीत होईल. राष्ट्रगीतानंतर बैठक संपन्न होईल असे जाहीर करतो.

अध्यक्षांचे व सदस्यांचे आभार मानण्यात आले. तद्‌नंतर बैठक संपन्न झाली असे जाहीर करण्यात आले.

**कुलगुरू - अध्यक्ष**

Vice-Chancellor
Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad

**कुलसचिव- सचिव**

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad.